## अनुक्रमणिका


१. श्रीगणेश ........................................... १
२. श्रीशारदा ........................................... ३
३. नरदेह ........................................... ५
४. संत साधू ........................................... ११
५. सद्‌गुरु ........................................... १८
६. उपदेश ........................................... २५
७. संसार ........................................... ३१
८. साधन ........................................... ३७
९. ध्यान ........................................... ४३
१०. बध्द ........................................... ४५
११. मुमुक्षू ........................................... ४७
१२. नवविधाभक्ती ................................. ४८
१३. त्रिगुण ........................................... ५७
१४. साधक ........................................... ६३
१५. परमार्थ ........................................... ६६
१६. तुरिया ........................................... ७४
१७. मूळमाया ........................................... ७८
१८. आत्मदेव ........................................... ८२
१९. देव ........................................... ९०
२०. अनुभव ........................................... ९४
२१. सगुण-निर्गुण ..................................... ९८
२२. उन्मनी ........................................... १०१
२३. विपरीतज्ञान/अज्ञान/ज्ञान/विज्ञान ......... १०४
२४. भेदाभेद ........................................... १११
२५. भ्रम ........................................... ११३
२६. ब्राह्मण ........................................... ११६
२७. सिध्द ........................................... १२०
२८. परब्रह्म... ........................................... १२३


।। श्रीगुरुलिंगजंगम प्रसन्न ।।

श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ३६ वे

भक्तांचेनि साभिमानें । कृपा केली दाशरथीनें ।
समर्थकृपेचीं वचनें । तो हा दासबोध ।।

## समर्थ श्रीरामकृपेची वचने

अर्थात

# || तो हा दासबोध ||

अनिलप्रभू रामराय केळकर

• प्रकाशक •
अनिकेत अनिलप्रभू केळकर

आवृत्ती पहिली सांगली इ. स. २०११

# माझी भूमिका ...

'मी कोण' याचा सारासार विचाराने शोध घेताना समर्थ रामदासस्वामींनी सतत एकांतात केलेल्या मंथनातून त्यांचे ठिकाणी समर्थ श्रीरामकृपेने प्रगट झालेले सार चिंतन – आत्मचिंतन म्हणजेच हा दासबोध ग्रंथ होय. 'दासबोध' म्हणजे सतत एकांतात केलेल्या मंथनाने रामरूप झालेल्या समर्थांचे ठिकाणी 'दास म्हणो तरी रामची आहे। राम म्हणो तरी नाम न साहे।।'' ही निर्माण झालेली जाणीव होय. अर्थात या ग्रंथात रामरूप होण्याचा मार्ग – भक्त होण्याचा मार्ग – भक्तिमार्ग स्पष्ट केलेला आहे.

स्वरूपसाक्षात्काराचे एवढे तर्कशुध्द वर्णन इतरत्र क्वचितच आढळते. स्वरूप साक्षात्कार हे जीवनाचे प्रमुख उद्दिष्ट मानणाऱ्या स्वरूप संप्रदायातून दासबोध हा ग्रंथ प्रमाण मानला जातो, हे उघड आहे.

श्रीगणेश, शारदेच्या कृपेने आपणास हा दुर्लभ मानला गेलेला नरदेह प्राप्त झाला आहे. या नरदेहाचे सार्थक व्हावे असे जर आपणास वाटत असेल तर संतसाधूंना सद्गुरुस्थानी मानून त्यांच्या उपदेशाप्रमाणे संसारातच साधन–ध्यान साधावे लागेल. त्रिकाळ साधनाच्या अभ्यासाने बध्दाचा मुमुक्षू होऊन, नवविधाभक्तीचे माध्यमाने त्रिगुणांचा निरास झाला असता, साधकावस्थेत अहर्निशी परमार्थ साधून, महाकारणदेहात तुर्यावस्थेत मूळमायेच्या उपाधीतील देवाच्या – आत्मदेवाच्या साक्षात्काराने–अनुभवाने, सगुणाचे आधाराने अहंकार नाहिसा होऊन, मनाचे उन्मन होऊन, विपरित ज्ञान, अज्ञान, ज्ञान ही त्रिपुटी लय पावून, विज्ञान प्रगट झाले असता, अमंगळ भेदाभेद –भ्रम दूर होऊन, परब्रह्माचे संपूर्ण ज्ञानाने तो जीव ब्राह्मण होतो–सिध्द होतो. निर्गुणस्वरूप परब्रह्मच होतो. हा दासबोधाचा मतितार्थ आहे.

हा दासबोध ग्रंथ निंबरगी संप्रदायात केव्हापासून प्रमाण मानला जाऊ लागला ? आमचे चिमडचे महाराजांना सज्जनगडी प्रत्यक्ष समर्थांचे हातून एकवीसदशकी दासबोधाची हस्तलिखीत प्रत प्राप्त झाली. आजही ही प्रत श्रीक्षेत्र चिमड येथे चिमडमठात अभ्यासूंसाठी अवलोकनार्थ उपलब्ध आहे. चिमडमहाराजांकडे असलेला हा ग्रंथ चिमडचे महाराज श्रीक्षेत्र निंबरगी येथे भ. स. श्रीनिंबरगीकरमहाराजांकडे गेले असता, निंबरगीकरमहाराजांनी पाहिला. त्यांना तो आवडला व येथून पुढे आपण याच ग्रंथावर प्रवचन करू असे सांगितले. अशाप्रकारे दासबोध हा ग्रंथ आमचे संप्रदायात प्रमाण मानला जाऊ लागला.

पुढे भ. स. तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या नित्यकीर्तनाची सुरुवात या दासबोध ग्रंथाचे साक्षीनेच झाली व त्यांनी अखंड २५ वर्षे कीर्तन साधले. आमचे ती.प.पू.मामामहाराज हेपण प्रतिवर्षी माघ वद्य प्रतिपदा ते माघ वद्य दशमी या कालखंडात 'श्रीदासबोध' या ग्रंथाचे पारायण करत. १९२४ साली हे दासबोध पारायण चालू असतानाच माघ वद्य ३ या दिवशी मध्यरात्री बाराचे सुमारास, भ. स. कोटणीसमहाराज यांनी देह ठेवल्यापासून २७ दिवसांनी प्रत्यक्ष प्रगट होऊन, अखंड कीर्तन करण्याची त्यांना अनुज्ञा दिली. त्यांचे आज्ञेप्रमाणे अखंड ३८ वर्षे त्यांनी कीर्तन साधले. इतका हा दासबोध ग्रंथ आमचे दृष्टीने महत्वाचा.

आमचे ती. प.पू. मामामहाराजांनी 'श्रीराम जयराम जयजयराम' या त्रयोदशाक्षरी मंत्राचे३ ।। कोटीचे पुरश्चरण पूर्ण केले व याप्रसंगी मिरजेतील वेणाबाई मठातील मठाधिपती श्रीरामचंद्रबुवा रामदासी यांनी त्यांना झालेल्या अंत:प्रेरणेनुसार अचानकपणे त्यांचेकडे असलेला, श्रीसमर्थांनी स्वहस्ते दगडात कोरलेला व वेणाबाईंचे झोळीत रक्षणार्थ अर्पण केलेला प्रसादमारुती भ. स. तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे ज्येष्ठ चिरंजीव, ती. प.पू. श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराज यांचेसह येऊन ती. प.पू. मामामहाराजांचे स्वाधीन केला. अशाप्रकारे श्रीसमर्थांनी आमचे ती. प.पू. मामामहाराजांचेप्रती असणारे प्रेम व्यक्त केले. या निमित्ताने श्रीसमर्थरामदासस्वामींचे हातचा मारुती आमचे घरी देव्हाऱ्यात प्रतिष्ठित झाला.

समर्थांचा आत्मा असणारा 'आत्माराम' हा ग्रंथ, तर समर्थांना प्राप्त झालेले आत्मसुख व्यक्त करणारा 'सोलिवसुख' हा ग्रंथ, या दोन्ही रामदासस्वामींच्या ग्रंथावर माझे पितृदेव ती. प.पू. दासराममहाराज यांनी केलेले भाष्य रामदास व दासराम यांचा असणारा आत्मसंबंध स्पष्ट करणारेच आहे. असा काही समर्थ रामदासस्वामींचा व आमचा जिव्हाळा असल्याने, प्रेम असल्याने ती .प. पू. मामामहाराजांचे पुण्यतिथीचे निमित्ताने माघ शु. ४ गणेशजयंती पासून माघ वद्य ३ – गुरुतृतीया या पुण्यपर्वकाळात श्रीदासबोध या ग्रंथाचे पारायण माझे ज्येष्ठ व श्रेष्ठ बंधू ती .प. पू. आण्णा आयोजित करतात व त्यायोगे आमच्यासारख्यांना सहजच दासबोध पारायण घडते.

दासबोध हा ग्रंथ गुरु–शिष्यांचा संवाद या स्वरूपाचा असल्याने, आपल्या मनातील शंकांचे निरसन करणारा आहे. अशा माझ्या मनातील शंका दूर करणाऱ्या, मला आवडलेल्या दासबोधातील ओव्या, तसेच ती. प.पू. दासराममहाराज यांचे कीर्तनात विषयाच्या स्पष्टीकरणार्थ वारंवार येणाऱ्या दासबोधातील ओव्या एकत्र करून अर्थानुरूप, विषयानुरूप त्या पुनर्गठीत केल्या, तोच हा 'तो हा दासबोध.'

ओव्यांचे अर्थ ती. प. पू. दासराममहाराजांची कीर्तने डोळ्यासमोर ठेवूनच केलेले आहेत. अर्थ करताना मुकुंदराजांचा विवेकसिंधू, ज्ञानेश्वरमहाराजांची ज्ञानेश्वरी,

नाथमहाराजांचे एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, श्रीमामामहाराजांची अमृतवाणी, दासराममहाराजांची दासरामगाथा आदी ग्रंथ विचारात घेतले आहेत.

विषयांचे स्पष्टीकरणार्थ इतर संतांचीही त्या विषयांचे संदर्भातील मते थोडक्यात एकत्र करणेचा प्रयत्नही केलेला आहे.

'तो हा दासबोध' या ग्रंथातील लिखाणात जे काही चांगले आहे, तुम्हाला आवडणारे आहे, ते सारे ती .प. पू. दादांचे आहे. लिखाणात एखादा शब्द अधिक उणा झाला असल्यास तो दोष सर्वस्वी माझा आहे. 'तरी न्यून ते पुरते। अधिक ते सरते। करूनी घेयावे तुमते। विनवितू असे ।।' या ज्ञानेश्वरमहाराजांचे शब्दात मी आपणास प्रार्थना करीत आहे.

समर्थ श्रीरामकृपेची वचने असणारा हा 'तो हा दासबोध' मी ती .प. पू. आण्णांना दाखविला. त्यांनी तो वाचून माझे लिखाणाचे कौतुकच केले. ती .प. पू. स्वामी स्वरूपानंद यांचे कृपेतील व ती .प. पू. दासराममहाराजांचेवर तितकीच निष्ठा असणारे श्री. भीमराव कोळी यांनाही या ओव्यांचे अर्थ आवडले. बंधुवर्य श्री नारायणराव देशपांडे, श्री रमेशराव लाळे, श्री गणेशराव चव्हाण, श्री मधुकर काटकर यांनीही या लिखाणाचे कौतुक केले.

'तो हा दासबोध' या पुस्तकाचे प्रकाशन करून चि. अनिकेत याचे हातून मोठी समर्थ सेवा घडली आहे असे मला वाटते. 'नातू आणि पणतू परमार्थी व्हावे' ही दासराममहाराजांची इच्छा मामामहाराजांनी मान्य केली आहे. चि. दीपक, चि. सुनिल, चि. अनिरुध्द, चि. अनिकेत हे नातू व चि. सौ. योगिनी, चि. सौ. गीतांजली, चि. सौ. अंजनी, चि. सौ. शारदा या नाती अध्यात्मप्रेमी आहेत. अशीच चढती वाढती सेवा महाराजांनी आम्हा सर्वांकडून पिढ्याननिढ्या करून घ्यावी अशी प्रार्थना श्रीमहाराजांचे पवित्र चरणी करतो.

'तो हा दासबोध' या ग्रंथपठणाने चित्त शुध्द होऊन तोच हा आहे, मी कुणी वेगळा नाही, हा बोध माझे ठिकाणी व आपणा सर्वांचे ठिकाणी ठसावा अशी प्रार्थना भ. स. श्रीसमर्थ रामदासस्वामी, भ. स. श्रीसमर्थ निंबरगीकरमहाराज, भ. स. श्रीमामामहाराज केळकर, भ. स. श्रीदासराममहाराज केळकर यांचे पवित्र चरणी करतो व त्यांचेच कृपेने स्फुरलेला व पूर्णत्वाला गेलेला हा त्यांचाच 'तो हा दासबोध' हा ग्रंथ माझे पितृदेव, ती .प. पू. दादा व माझी आई ती.प. पू. सौ. सीतावहिनी यांचे पवित्र चरणी अर्पण करतो.

सांगली,
दि. ४-८-२०११
दासराममहाराज पुण्यतिथी

**– अनिलप्रभू रामराय केळकर**




• **प्रकाशक :**

**अनिकेत अनिलप्रभू केळकर**
घर क्रमांक ८२७, श्रीराम निकेतन,
श्रीबापूरावजी केळकर वाडा,
गांवभाग, सांगली – ४१६ ४१६
दूरभाष : (०२३३) २३०१९८६
भ्रमणध्वनी : ९८९०२२४१८६

**प्रथम आवृत्ती – इ. स. २०११**

**मुद्रक :**

श्री प्रसाद ग्राफिक्स
तळमजला, चाफळकर कॉम्प्लेक्स,
गावभाग, सांगली.

**प्रसादमूल्य : रु. ५०/–**


**(सर्व हक्क प्रकाशकाधीन)**

## प्रकाशकाचे मनोगत ...

'तो हा दासबोध' हे दासबोधातील सारभूत ओव्यांचा भावार्थ व्यक्त करणारे पुस्तक प्रकाशित करताना मला फार मोठा आनंद होत आहे. दास झाल्यावर 'तोच हा आहे' हा होणारा बोध म्हणजेच हा 'तो हा दासबोध'. अर्थात या पुस्तकात दास होणेसाठी – भक्त होणेसाठी करावे लागणारे साधन व साधनाने 'तोच हा आहे' हा येणारा अनुभव, या संदर्भात दासबोधात असणाऱ्या ओव्या भावार्थासह विषयानुरूप आपणासमोर चिंतनाकरिता ठेवण्यात आल्या आहेत.

ओव्यांचे अर्थ निंबरगी संप्रदायातील साधन मार्ग विचारात घेऊन, माझे आजोबा ती .प. पू. दासराममहाराज केळकर यांनी नित्य ३९ वर्षे केलेल्या कीर्तनातून व्यक्त झालेल्या विचारानुरूप करण्याचा प्रयत्न माझे वडील ती. अनिलप्रभू रामराय केळकर यांनी केला आहे. अर्थात ओव्यांचे अर्थ प्रचलीत अर्थांपेक्षा वेगळे झाले आहेत, हे निश्चित. स्वरूपसाक्षात्कार हे जीवनातील प्रमुख उद्दिष्ट मानणाऱ्या संप्रदायीकांना एक वेगळा विचार यातून मिळणार आहे.

हे पुस्तक निर्दोष स्वरूपात प्रसिध्द व्हावे म्हणून माझे आजोबांचेवर निष्ठा असणारे श्री रमेशकाका लाळे यांनी अपार कष्ट घेतले आहेत. मी त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे. या पुस्तकाचे मुद्रण अत्यंत आपुलकीने व सुबकपणे करण्याचे काम श्री प्रसाद ग्राफिक्सचे श्री प्रसाद पटवर्धन यांनी केले आहे. त्यांना शतश: धन्यवाद!

'तो हा दासबोध' हे पुस्तक वाचून सोहंसाधन साधणेची उर्मी माझे ठिकाणी व आपणा सर्वांचे ठिकाणी होऊन 'तोच हा आहे' हा बोध ठसावा अशी प्रार्थना भ. स. श्रीसमर्थ रामदासस्वामी, भ. स. श्रीसमर्थ निंबरगीकरमहाराज. भ. स. साधुमहाराज, भ. स. रामचंद्रराव यरगट्टीकरमहाराज , भ. स. तात्यासाहेबमहाराज, भ. स. श्री. मामामहाराज केळकर, भ. स. श्रीदासराममहाराज केळकर यांचे पवित्र चरणी करतो व हे चार शब्द माझे आजोबा ती .प. पू. रामराय गोविंद केळकर व माझी आजी ती .प. पू. सौ. सीतावहिनी रामराय केळकर यांचे पवित्र चरणी अर्पण करतो.

**– अनिकेत अनिलप्रभू केळकर**

सांगली
भाद्रपद शु. ४ गणेश चतुर्थी
१–९–२०११



## प्रार्थना ...

आमचा चिमड संप्रदाय हा स्वरूप संप्रदाय आहे. प. पू. समर्थ रामदास स्वामींचा संप्रदाय हा स्वरूप संप्रदाय आहे. स्वरूपाचा साक्षात्कार हे त्यातले खरे वर्म आहे.

स्वरूप संप्रदाय अयोध्या मठ । जानकी देवी रघुनाथ दैवत ।
मारुती उपासना मार्ग नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासी ।।

ही श्री दासबोधातील ओवी माझे पितृदेव ती. प. पू. श्रीदादांचे कीर्तनात आली की यातील जानकी व रघुनाथ या नावांचा उच्चार करताना प. पू. श्री. गुरुनाथमहाराज कोटणीस यांचे पितृदेव प. पू. श्री. रघुनाथ हणमंत कोटणीस तथा श्री दादा महाराज कोटणीस व त्यांच्या प्रथम व द्वितीय पत्नी ती. जानकीवहिनी हे माझ्या डोळ्यासमोर उभे राहतात असे सांगत असत. अशी पाहिजे गुरुभक्ती. तर परमार्थात काही साधेल. अशा या श्रीमद् दासबोधातील श्री दादांच्या कीर्तनात येणाऱ्या ओव्या आणि माझे बंधू व गुरुबंधू श्री अनिलप्रभू रामराय केळकर तथा श्री प्रभूराज यांना भावलेल्या काही ओव्या या एकत्रित करून विवरणासह 'तो हा दासबोध' या नावाचा ग्रंथ निर्माण झाला आहे. तोच हा आहे किंवा हा म्हणजेच तो आहे एवढे खऱ्या अर्थाने कळले की 'तो हा दासबोध' कळेलआणि तसा तो कळण्यासाठी 'उगाच एकांती बैसावे । तेथे हे समजोनी घ्यावे । घ्यावे आणि सांडावे । प्रभंजनासी ।। ' एवढी एकच प्रक्रिया वा साधना माझे व आपले हातून घडावी अशी प्रार्थना भगवान श्री सद्‌गुरु श्री. दादामहाराज केळकर यांचे चरणी करतो.

श्री प्रभूराज यांनी 'तो हा दासबोध' हा ग्रंथ निर्माण करून श्रीमद् दासबोध अभ्यासकांची फार मोठी सोय केली आहे. असेच अध्यात्मिक कार्य त्यांचे हातून यापुढेही सतत होत रहावे व त्यातून आम्हाला आनंद घेता यावा अशी शतश: प्रार्थना भगवान श्री सद्‌गुरू तात्यासाहेब महाराज कोटणीस, माझे आजोबा ती. प. पू. श्री मामा महाराज केळकर व माझे पितृदेव ती. प. पू. श्री. दादामहाराज केळकर या त्रैमूर्तींचे चरणी करीत आहे.

''राजाधिराज सद्‌गुरू महाराज की जय ।।''

''जय जय रघुवीर समर्थ ।।''

**श्री दादांचा कृपाभिलाषी,**
**चंद्रशेखर रामराय केळकर**

सांगली
शनिवार १३–८–२०११,
नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन

## श्रीगणेश

ओंकार हे श्रीगणेशाचे खरे रूप आहे, असे पूर्वापार मानले जाते. ''ओंकारप्रधान रूप गणेशाचे ।।'' असे श्रीगणेशाचे वर्णन श्रीतुकाराममहाराज करतात. या ओंकाराचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराज असे करतात,

**''अकार चरणयुगुल । उकार उदर विशाल ।**
**मकार महामंडल । मस्तकाकारे ।।**
**हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळलें ।**
**ते मिया गुरूकृपा नमिले । आदिबीज ।।''**

या ओंकारातील अकार – शब्दब्रह्माचा प्राण हे त्याचे दोन चरण असून, उकार ही त्या प्राणाची गती, त्याचे विशाल उदर आहे. प्राण व प्राणगती एकत्र आले असता होणारा अनुहातध्वनी हा मकार असून, ते त्याचे मस्तक आहे. हे अकार, उकार, मकार एकत्र आले असता अनुभवाला येणारे आदिबीज शब्दब्रह्म ओंकार हे गणेशाचे खरे रूप आहे. हे दासराम महाराजांचे स्पष्टीकरण सारे काही स्पष्ट करणारे आहे.

अकार – श्वासोच्छ्वास हा शब्दब्रह्माचा प्राण असून, तो प्रणववाचक –प्रणव प्रगट करणारा होणे गरजेचे आहे. **''प्रणववाचक श्वासोच्छ्वास । हाची तारक उपदेश ।।''** हे संतांचे सांगणे येथे लक्षात घेणेजोगे आहे. या श्वासापासून – प्राणापासून प्रणव – ओंकार प्रगट करावा हे ज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात,

**''तैसे चित्त राहिल्यावरी पांडवा । प्राणाचा प्रणवुची करावा ।।**
**मग अनुवृत्तीपंथे आणावा । मुर्ध्निवरी ।।''**

हा प्रणवाचा उच्चार आधारापासून सहस्त्रदळापर्यंत प्रगट करते, म्हणून या शक्तीला ज्ञानेश्वरमहाराज 'प्राण' असे संबोधतात.

**''कंदौनि हृदयवरी । प्रणवाची उजरी ।**
**करिता तेचि शरीरी । प्राणु म्हणिपे ।।''**

या शक्तीचे वर्णन **''आधारी नाभीमुळी तिही एकची तंतू । सहस्त्रदळावरी स्थिर राहे निवांतू ।।''** या शब्दात मुकुंदराजमहाराज करतात.





सहस्त्रदळापासून दक्षिणशिखामार्गाने भ्रुमध्यापर्यंत येणारी प्राणगती ही त्याचे विशाल उदर आहे. या प्राणगतीच्या स्पंदनावरच प्राणाचे कार्य चालते. साधनाच्या अभ्यासाने प्राण–जीवन उर्ध्वगामी होऊन त्याचे प्राणगतीशी मिलन झाले असता सहस्त्रदळी अनुभवाला येणारा अनुहात नाद – मकार हे त्याचे मस्तक आहे. अशारितीने हे अकार, उकार, मकार हे तिन्ही एकत्र आले असता ओंकाराचे खरे रूप अनुभवाला येणारे आहे.

या ओंकाराने ज्याचा निर्देश होतो, अशा स्वसंवेद्य, सकल अर्थ प्रकाशात आणणाऱ्या आत्मरूपास ज्ञानेश्वरमहाराजांनी श्रीगणेश असे संबोधले आहे.

**''ॐ नमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या ।**
**जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।**
**देवा तूचि गणेशु । सकलार्थप्रकाशु ।**
**म्हणे निवृत्तिदासु । अवधारिजो ।।''**

ही ज्ञानेशवचने खरा गणेश स्पष्ट करणारी आहेत. समर्थ श्रीरामकृपेची वचने श्रीगणेशाबद्दल काय सांगतात हे आता पाहू.

१) **ओं नमोजि गणनायेका । सर्वसिध्दिफळदायेका ।**
**अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा ।। १–२–१ ।।**

२) **ऐसा सर्वांगें सुंदरु । सकल विद्यांचा आगरु ।**
**त्यासी माझा नमस्कारु । साष्टांग भावें ।। १–२–२५ ।।**

**– भावार्थ –**

१) ओंकाराने निर्दिष्ट केलेल्या, सर्व सिध्दींचे फळ देणाऱ्या, गणांचा नायक असणाऱ्या, जागृती, स्वप्न, सुषुप्ती या त्रिविध अज्ञानात्मक अवस्थांना जाणणाऱ्या, चौथ्या ज्ञानात्मक तुर्यावस्थेत साक्षीरूपाने राहणाऱ्या, जाणीवरूप आत्मगणेशास मी वंदन करतो.

२) सर्वांग भिंगासारखे पारदर्शक, निर्मळ, सुंदर असणाऱ्या, सकळ विद्यांचे माहेरघर अशा आत्मरूप गणेशास मी साष्टांगभावे प्रणिपात करतो.

卐 卐 卐

## श्रीशारदा

या विश्वाला चालविणारी शक्ती, ती चिन्मय आहे. ही शक्तीच विश्वाची निर्मिती करते व विश्वाच्या नाशालाही तीच कारणीभूत ठरते. सर्व कर्तृत्व या वायुरूप शक्तीचेच आहे.

**'' जो अनंत ब्रह्मांडे घडी । लिला विनोदेचि मोडी ।**
**आपण आदिपुरूषी दडी । मारून राहे ।।''**

हे समर्थवचन स्पष्ट आहे. या शक्तीलाच योगी अरविंद 'आई' असे संबोधतात तर आचार्य 'माहेश्वरी' असे संबोधतात, तर ज्ञानेश्वरमहाराज, समर्थरामदासस्वामी तिला 'शारदा' असे संबोधतात.

समजलेला अर्थ शब्दरूप करणारी शक्ती ही शारदेचेच रूप असून परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी या चारी वाचांच्या माध्यमातून ती व्यक्त होते.

**''परेपासोनी वैखरी। रूप जियेचे चराचरी ।**
**व्यापक सकळांचे अंतरी । शब्दशक्तिरूपिणी ।।''**

असे शारदेचे वर्णन ती.प.पू. मामामहाराज केळकर करतात, तर **'नमू शारदा मूळ चत्वारी वाचा'** या शब्दात तिचे महत्व समर्थ व्यक्त करतात.

**''आता अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थकलाकामिनी ।**
**ते शारदा विश्वमोहिनी । नमिली मियां ।।''**

असे ज्ञानेश्वरमहाराज तिला आराधितात. समर्थ श्रीरामकृपेची वचने शारदेबद्दल काय सांगतात ते आता पाहू.

**१) आता वंदीन वेदमाता । श्रीशारदा ब्रह्मसुता ।**
**शब्दमूळ वाग्देवता । महामाया ।। १–३–१ ।।**

**२) जें जें दृष्टीनें देखिलें । जें जें शब्दें वोळखिलें ।**
**जें जें मनास भासलें । तितुकें रूप जयेचें ।। १–३–२४ ।।**





**३) माया सगुण साकार । माया सर्वस्व विकार ।**
**माया जाणिजे विस्तार । पंचभूतांचा ।। ७–१–५५ ।।**

**– भावार्थ –**

१) सर्व शब्दसृष्टीचे मूळ म्हणून वेदमाता, वाणीची देवता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, शुध्द ब्रह्माचे ठिकाणी कल्पनेने निर्माण झालेल्या, म्हणून ब्रह्मसुता असे ओळखल्या जाणाऱ्या, मूळमायेतील वायुरूप प्रकृतीला – श्रीशारदा देवीला मी नमस्कार करतो.

२) दृष्टीला दिसणारे सर्व, शब्दाने वर्णन करण्याजोगे जे आहे ते सारे किंवा मनाला भासणारे जे जे काही आहे ते सारे, शारदेचे – मायेचे रूप आहे.

३) माया ही गुणासहीत पंचमहाभूतांनी साकारलेली आहे. अर्थात ती विकारलेली आहे – बदलणारी आहे.

卐 卐 卐

## नरदेह

आत्मा हा देह तयार करतो व त्या देहात प्रविष्ट होतो. मग त्या देहाचा, देहात आत्मा असल्याने, जन्म झाला असे होते. असे निरनिराळे ८४ लाख देह त्याला धारण करण्यासाठी उपलब्ध असतात. देह कोणता प्राप्त व्हावा हे त्याने केलेल्या पापपुण्यानुसार ठरते. पाप जास्त झाले तर अधोयोनी – नरक, पुण्य जास्त झाले की उर्ध्वयोनी – स्वर्ग, पापपुण्य समान झाले की नरदेह व पापपुण्य खलास झाले की मोक्षाची प्राप्ती होते.

**''अत्यंत सुकृतें स्वर्गा चढे । अत्यंत पापें अधोगती घडे ।**
**पापपुण्य नि:शेष झडे । तैं आतुडे निजमुक्ति ।। ९–३७३ ।।**
**जैं पापपुण्य समान समीं । तैं मनुष्यदेह आक्रमी ।**
**जन्मपावे कर्मभूमीं । आश्रमधर्मी सुमेधा ।। ९–३७४ ।।''**

ही नाथवचने याला आधारभूत आहेत. हा नरदेह प्राप्त होणे अत्यंत अवघड आहे हे मामामहाराज असे सांगतात,

**'' इहलोकी नरदेह । हा तो दुर्लभची पाहे ।।१ ।।**
**नरदेहीचे भजन । हे तो दुर्लभची जाण ।।२ ।।**
**नरदेही गुरुप्राप्ती । हे तो दुर्लभ निश्चिती ।।३ ।।**
**दासा गुरुनामी प्राप्ती । दावी दुर्लभ प्रचिती ।।४ ।।''**

नरदेह ही परमेश्वराने दिलेली परमात्मप्राप्तीची अमोल संधी आहे, ती वाया घालविता कामा नये. या नरदेहाचे योगानेच ब्रह्मज्ञान होऊन भगवद्रूप होता येते. म्हणून हा नरदेह पाहून भगवंतांना समाधान झाले, इतका हा नरदेह महत्वाचा.

**''देखोनि मनुष्यदेहासी । सुख झालें भगवंतासी ।**
**अधिकार ब्रह्मज्ञानासी । येणें देंहेंसीं मत्प्राप्ती ।।''**

हे नाथवचन स्पष्ट आहे. आहार, निद्रा, भय, मैथून हे सारे सर्व देहात सारखेच





असते. पण मनुष्य देहात असणारे विशेष ज्ञान हे त्या देहाचे वैशिष्ट्य आहे.

**''आहार, निद्रा, भय, मैथून । सर्व योनीसी समसमान ।।**
**मनुष्यदेहींचें ज्ञान । अधिक जाण सर्वांशीं ।।''**

हे नाथवचन यावर प्रकाश टाकते. हा नश्वरदेह म्हणजे 'मी', हा खोटा देहाभिमान बाळगून, देहसंगातच सुख मानणारा मूर्ख, पुन:पुन: गर्भवासास प्राप्त होऊन नरकयातना भोगतो.

**''केवळ नश्वर देह देख । तो मी म्हणोनि मानी हरिख ।**
**देहाभिमानें भोगीं नरक । यापरता मूर्ख कोण आहे ।।**
**देहसंगामाजी सुख । म्हणती ते केवळ मूर्ख ।**
**देहसंग ते केवळ दु:ख । गर्भ नरक भोगवी ।।''**

ही नाथवचने आपल्याला सावध करणारीच आहेत.

नरदेहासारखे विलक्षण सुंदर यंत्र या त्रिभुवनात शोधून सापडणारे नाही. आपल्या देहाचा व त्यामधील शक्तींचा वापर करूनच माणसाने निरनिराळ्या कला, विद्या संपादन केल्या आहेत. अध्यात्मविद्यादेखील या देहाच्या आधारानेच संपादन करता येते. आत्मा सर्वश्रेष्ठ खरा, पण देह नसेल तर तो व्यक्त कसा होणार ? आत्मसाक्षात्कारसुध्दा आत्मा शरीरात असेतोवरच होऊ शकतो. प्रत्यक्ष आत्मसाक्षात्काराचे प्रक्रियेत शरीराचा सहभाग नाही, पण शरीर आत्मसाक्षात्कारासाठी पूरक आहे. शरीर ही आत्मसाक्षात्काराची प्रयोगशाळा आहे. आत्मसाक्षात्कार हा देहात होतो, देहाने नाही. इतका हा नरदेह महत्वाचा. या संदर्भात समर्थ श्रीरामकृपेची वचने काय आहेत हे आता पाहू.

१) **चारी खाणी चारी वाणी । चौऱ्यांसी लक्ष जीवयोनी ।**
**जन्मा आले तितुके प्राणी । मृत्य पावती ।। ३–९–३७ ।।**

२) **नाहीं देहाचा भरंवसा । केंव्हा सरेल वयसा ।**
**प्रसंग घडेल कैसा । कोण जाणे ।। १९–६–२५ ।।**

३) जन्म जिवासी बंधन । जन्म मृत्यासी कारण ।
जन्म हेंचि अकारण । गाथागोवी ।। ३–१–४ ।।

४) जन्म अवघा दु:खमूळ । लागती दु:खाचे इंगळ ।
म्हणोनियां तत्काळ । स्वहित करावें ।। ३–५–५२ ।।

५) पृथ्वीमध्यें जितुकीं शरीरें । तितुकीं भगवंताचीं घरें ।
नाना सुखें येणें द्वारें । प्राप्त होती ।। २०–४–४ ।।

६) पशुदेहीं नाहीं गती । ऐसें सर्वत्र बोलती ।
म्हणोनी नरदेहींच प्राप्ती । परलोकाची ।। १–१०–२१ ।।

७) नरदेहाचें उचित । कांहीं करावें आत्महित ।
यथानुशक्त्या चित्त वित्त । सर्वोत्तमीं लावावें ।।२–४–१३ ।।

८) देहाचें जें थोरपण । तेंचि देहबुध्दीचें लक्षण ।
मिथ्या जाणोनि विचक्षण । निंदिती देहो ।। ७–२–३४ ।।

९) देह मी वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा ।
देहाभिमानें येरझारा । भोगिल्याच भोगी ।। ५–६–५५ ।।

१०) देह पावे जंवरी मरण । तंवरी धरी देहाभिमान ।
पुन्हा दाखवी पुनरागमन । देहबुध्दी मागुती ।। ७–२–३५ ।।

११) हित आहे देहातीत । म्हणोनि निरोपिती संत ।
देहबुध्दीनें अनहित । हेंचि लागे ।। ७–२–३७ ।।

१२) निराकार जाणावा नित्य । आकार जाणावा अनित्य ।
यास बोलिजे नित्यानित्य– । विचारणा ।। १३–६–१५ ।।

१३) देह अनित्य आत्मा नित्य । हाचि विवेक नित्यानित्य ।
अवघें सूक्ष्माचें कृत्य । जाणती ज्ञानी ।। १३–१–२३ ।।

१४) म्हणोनि देहबुध्दी हे झडे । तरीच परमार्थ घडे ।
देहबुध्दीनें विघडे । ऐक्यता ब्रह्मींची ।। ७–२–३९ ।।





१५) देह परमार्थी लाविलें । तरीच याचें सार्थक जालें ।
नाहीं तर हें वेर्थचि गेलें । नाना आघातें मृत्युपंथे ।। १–१०–६१ ।।

१६) धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पाहो ।
जों जों कीजे परमार्थ लाहो । तो तो पावे सिध्दीतें ।। १–१०–१ ।।

१७) मी कोण पाहिजे कळलें । देहतत्व तितुकें शोधिलें ।
मनोवृत्तीचा ठाईं आलें । मीतूंपण ।। १२–३–२३ ।।

१८) सकळ देहाचा शोध घेतां । मीपण दिसेना पाहातां ।
मीतूंपण तत्वता । तत्वीं मावळली ।। १२–३–२४ ।।

१९) दृश्य पदार्थचि वोसरे । तत्वें तत्व तेव्हां सरे ।
मीतूंपण कैंचें उरे । तत्वता वस्तु ।। ।१२–३–२५ ।।

## – भावार्थ –

१) चारी खाणींचे मार्फत – चार वाणींनी युक्त – जाणीवेसहीत ८४ लक्ष जीवयोनींपैकी कुठल्याही योनीत जन्म हा झाला की त्याला मरण हे येणार हे निश्चित.

२) देहाचा भरवसा नाही, कोणत्या वेळी काय प्रसंग बेतेल व केव्हा आयुष्य संपेल, हे कोण सांगू शकेल ?

३) जन्म हे जीवाचे बंधन, मृत्यूचे कारण व जीवाच्या मागे निष्कारण लागलेली कटकट आहे.

४) जन्म हेच साऱ्या दु:खाचे कारण आहे. म्हणून प्राण्याने उशीर न लावता आत्मसुख प्राप्त करून घेऊन स्वहित करावे.

५) पृथ्वीवर जेवढी शरीरे आहेत ती सर्व भगवंताची घरे आहेत. अनंत आत्मसुख दशमद्वारी या शरीरामार्फतच प्राप्त होते.

६) पशूदेहात परमार्थ प्राप्ती नाही. एक नरदेहातच परमार्थ घडला तरच परमार्थाची प्राप्ती होऊ शकते, असे सर्व संतांचे सांगणे आहे.

७) आपल्या कुवतीप्रमाणे चित्त व वित्त भगवंताचे सेवेकडे वेचून काही तरी आत्महित साधण्यातच नरदेहाचे साफल्य आहे.

८) देहालाच महत्व देणे हे देहबुध्दीचे लक्षण आहे. पण ज्यांचे अंतरी ज्ञानच जागते आहे, असे ज्ञानी संत देहाचे खोटेपण – अशाश्वतपण जाणून, त्याला महत्व देत नाहीत.

९) ज्या माणसाला 'मी म्हणजे हा देह' असे वाटते, अशा आत्महत्यारा माणसाला या अहंकारानेच जन्ममृत्यूचे आजपर्यंत भोगलेले फेरे पुन्हा भोगावे लागतील – मोक्षप्राप्ती होणार नाही.

१०) देह मरण पावेतो देहाभिमान बाळगणे व पुन्हा जन्ममरणाच्या चक्रात सापडणे, हे सारे देहबुध्दीनेच घडते.

११) देहात असताना देहाला सुटण्यातच हित असून देहबुध्दीने अकल्याणच होणार असा संतांचा उपदेश आहे.

१२) जे आकारलेले आहे ते सारे विकारलेले आहे – अनित्य आहे. जे निराकार आहे, ज्याला कोणताही विकार नाही, ते नित्य आहे, हे जाणणे याला नित्यानित्य विचार – विवेक म्हणतात.

१३) देह अनित्य व आत्मा नित्य हा सूक्ष्म विचार – नित्यानित्यविवेक, ज्ञानी पुरुष जाणतात.

१४) देहबुध्दी असेल तर चैतन्याशी तादात्म्य कसे होईल? परमार्थ कसा होईल? म्हणून देहबुध्दी कमी झाली तरच हातून परमार्थ घडेल.

१५) या देहात परमार्थ घडला तरच त्या देहाचे सार्थक होईल अन्यथा एके दिवशी हे शरीर नाना संकटांना सामोरे जात मृत्यूपंथे व्यर्थच जाईल.



|| तो हा दासबोध ||

१६) हा नरदेह अत्यंत धन्य आहे. या नरदेहात जो कोणी जीवन अंतर्मुख करून, पश्चिम पंथ आक्रमून अपूर्व अशा परमार्थाची प्राप्ती करून घेईल, त्याला सिध्दी प्राप्त होईल.

१७) 'मी कोण' हे कळावे म्हणून देहातील सर्व तत्वे शोधून पाहिली. तेव्हा असे लक्षात आले की मीतूपणा ही मनोवृत्तीच आहे.

१८) सगळ्या चारही देहांचा शोध घेतला असता, चत्वार देह निरसनाअंती मनोवृत्ती संपूर्णपणे नाहीशी होते व तत्वांचा निरास तत्वांत होऊन मी म्हणून कोणी वेगळा न उरता तोच आहे याचा अनुभव येतो.

१९) डोळ्यातील दृश्य नाहीसे झाले की तत्वांचा निरास तत्वात झाला असे होते. त्याठिकाणी मीतूपणा – द्वैत उरत नाही. 'दास म्हणो तरी रामची आहे' अशी अवस्था होते. तो वस्तुरूपच होतो.

卐 卐 卐

## संत साधू

संतांचीं, साधूंची भेट व्हावी असे आम्हांला वाटते खरे, पण संतांची भेट होणार कशी ? घरावर डॉक्टर, वकील यांची जशी पाटी असते, तशी पाटी संतांचे घरावर असते का ? नाही ना? व जर घरावर संत, साधू अशी पाटी लावली असेल, तर ते संत ठरतील का? मग संत, साधू ओळखायचे कसे ? संत, साधू कसे ओळखायचे याचे वर्णन संतांनीच करून ठेवले आहे. कारण संतच संतांना ओळखू शकतात हेच खरे. संत कसे ओळखावेत हे दासराममहाराज असे सांगतात,

**''संत तो अद्वैती समरस झाले । रंगोनिया गेले भक्तिरसी ।।१ ।।**
**नामसंकीर्तन उरले त्या ठाया । देहभाव लया गेला त्यांचा ।।२ ।।**
**त्रिपुटी ग्रासिली वृत्ती स्थिर झाली । ज्योतीसी मिळाली आत्मज्योती ।।३।।**
**दासराम ऐशा संतासी शरण । वंदितो चरण प्रेमभावे ।।४ ।।''**

तर स्वामी स्वरुपानंद संतांचे वर्णन असे करतात,

**''आणिकांचे सुख देखोनी जो सुखी । होय धन्य लोकी तोचि संत ।।१।।**
**आणिकांचे दु:ख देखोनिया डोळां । येई कळवळा तोचि संत ।।२ ।।**
**आणिकांचे दोष आणिना जो मनीं । गुणांतें वाखाणी तोचि संत ।।३ ।।**
**लोककल्याणार्थ वेंची जो जिवित । संत तो महंत स्वामी म्हणे ।।४ ।।''**

तर तुकाराम महाराज हेच असे सांगतात, **''तुका म्हणे तोचि संत। सोशी जगाचे आघात ।।''** तर निळोबाराय त्यातील वर्म असे सांगतात, **''तेचि संत तेचि संत। ज्यांचा हेत विठ्ठली ।।''** तर समर्थ **''करी वृत्ति जो संत तो संत जाणा ।।''** या शब्दात संतवर्णन करतात. साधू कसा ओळखावा हे नाथमहाराज असे सांगतात,

**'' सर्वाभूती दया । साधू म्हणावे ऐशिया ।।१ ।।**
**जग ब्रह्मरूप जाण । हेचि साधूचे लक्षण ।।२ ।।**





**सर्वाभूती समदृष्टी । तोचि साधू इये सृष्टी ।।३ ।।**
**एका जनार्दनी संत । नित्य साधी आत्महीत ।।४ ।।''**

तर तुकाराममहाराज साधूवर्णन असे करतात,

**''जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।।**
**तोचि साधू ओळखावा । देव तेथेची जाणावा ।।''**

तुकाराममहाराज साधूंचे आणखी एक वैशिष्ट्य असे सांगतात,

**''जागा तेथे साधू राहे । जेथे लोक झोपी जाये ।**
**विषयी सावध जन । तेथे त्याचे भ्रांत मन ।।''**

समर्थ साधूवर्णन असे करतात,

**''जाणावा तो साधू । जया पूर्ण बोधू ।**
**भूतांचा विरोधू । जेथ नाही ।।''**

साधू कसा असतो हे सुभाषितकार असे सांगतात,

**''यथा चित्तं तथा वाच:, यथा वाच: तथा क्रिया: ।**
**चित्ते, वाचि, क्रियायांच, साधूनाम एकरुपता ।।''**

समर्थश्रीरामकृपेची वचने संतसाधूंबद् दल काय सांगतात हे आता पाहू.

१) **धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।**
**जाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें।। १८–६–२० ।।**

२) **जो जनांमध्ये वागे । परी जनांवेगळी गोष्टी सांगे ।**
**ज्याचे अंतरीं ज्ञान जागे । तोचि साधु ।। ६–१–१८।।**

३) **तो जनी दिसतो परी वेगळा । वर्ततां भासे निराळा ।**
**दृश्य पदार्थ त्या निर्मळा । स्पर्शलाचि नाहीं ।। ७–१०–३१ ।।**

४) **बाह्य भलतैसें असावें । परी अंतर स्वरूपीं लागावें ।**
**लक्षणें दिसती स्वभावें । साधुअंगी ।। ८–९–१८ ।।**

५) सदा स्वरूपानुसंधान । हें मुख्य साधूचें लक्षण ।
जनीं असोन आपण । जनावेगळा ।। ८-९-९ ।।

६) सदा स्वरूपानुसंधान । करी द्वैताचें निरसन ।
अद्वय निश्चयाचें ज्ञान । तेचि शुध्द कल्पना ।।७-५-३४ ।।

७) सकळ धर्मांमध्ये धर्म । स्वरूपीं राहणें हा स्वधर्म ।
हेंचि जाणिजे मुख्य वर्म । साधुलक्षणाचें ।। ८-९-५४ ।।

८) साधु दिसती वेगळालें । परी ते स्वरूपीं मिळाले ।
अवघे मिळोन येकचि जाले । देहातीत वस्तु ।। ७-२-३१ ।।

९) स्वरूपीं स्वरूपचि जाला । मग तो पडोनिच राहिला ।
अथवा उठोनि पळाला । तरी चळेना ।। ८-९-१६ ।।

१०) असो ऐसे सकळही गेले । परंतु येकचि राहिले ।
जे स्वरूपाकार जाले । आत्मज्ञानी ।। ३-९-५९ ।।

११) शोकें दुखवावी वृत्ती । तरी ते जाहाली निवृत्ती ।
म्हणोनि साधु आदिअंतीं। शोकरहित ।। ८-९-३७ ।।

१२) जेथें नाहीं दुसरी परी । क्रोध यावा कोणावरी ।
क्रोधरहित सचराचरीं । साधुजन वर्तती ।। ८-९-२७ ।।

१३) सोहं आत्मा स्वानंदघन । अजन्मा तो तूंचि जाण ।
हेंचि साधूचें वचन । सदृढ धरावें ।। ८-८-३३ ।।

१४) म्हणोनी विवेक आणि वैराग्य । तेंचि जाणिजे महद्भाग्य ।
रामदास म्हणे योग्य । साधु जाणती ।। १२-४-२० ।।

१५) निर्विकल्पीं कल्पनातीत । तोचि वोळखावा संत ।
येर अवघेंचि असंत । भ्रमरूप ।।१३-२-२६ ।।

१६) जो जाणेल भगवंत । तया नांव बोलिजे संत ।
जो शाश्वत आणि अशाश्वत । निवाडा करी ।। ६- १-१६ ।।





१७) जें त्रैलोकीं नाहीं दान । तें करिती संतसज्जन ।
तयां संतांचें महिमान । काय म्हणोनि वर्णावें ।। १-५-२४ ।।

१८) माहाराजे चक्रवर्ती । जाले, आहेत, पुढें होती ।
परंतु कोणी सायुज्यमुक्ती । देणार नाहीं ।। १-५-२३ ।।

१९) लोकीं राहावें ते सलोकता । समीप असावें ते समीपता ।
स्वरूपचि व्हावें ते सरूपता । तिसरी मुक्ती ।।४-१०-२४ ।।

२०) निर्गुणी अनन्य असतां । तेणें होय सायुज्यता ।
सायुज्यता म्हणिजे स्वरूपता । निर्गुण भक्ती ।। ४-१०-३० ।।

२१) मोक्षश्रिया आळंकृत । ऐसे हे संत श्रीमंत ।
जीव दरिद्री असंख्यात । नृपती केले ।। १-५-२१ ।।

२२) उदंड मुलें नानापरी । वडिलांचे मन अवघ्यांवरी ।
तैसी अवघियांची चिंता करी । महापुरुष ।। १९-४-२४ ।।

२३) येंक बळाचे निवडले । ते पोहतचि उगमास गेले ।
उगमदर्शनें पवित्र जाले । तीर्थरूप ।। ११-७-१० ।।

२४) ज्ञानी मुक्त होऊन गेले । त्यांचे सामर्थ्य उगेंचि चाले ।
कां जे पुण्यमार्गें चालिले । म्हणोनियां।। १०-७-११ ।।

## - भावार्थ -

१) धर्मसंस्थापना करणारे पुरुष हे ईश्वराचे अवतारच असतात. असे अवतार हे मागेपण झाले, आता आहेत व पुढेही होणार आहेत. असे पुरुष अवतरणे हे ईश्वराचे देणेच आहे.

२) आपल्यासारखाच त्याचा व्यवहार असतो, पण त्याचे विचार मात्र आपल्यापेक्षा वेगळे असतात. त्याचे अंतर्यामी ज्ञानच जागते असते. ज्ञानाचे ठिकाणी तो जागा असतो. अशा महात्म्याला साधू म्हणतात.

३) तो दिसताना आपल्यासारखाच देही दिसतो, पण तो देहाला सुटलेला असतो. त्यामुळे त्याचे वागणे, बोलणे हे निराळे असते. त्याच्या दृष्टीला सृष्टी येत नसल्याने दृश्य पदार्थाचा त्या निर्मळ स्वरूपाकार व्यक्तीवर कोणताही परिणाम होत नाही.

४) बाह्यत: कोणतीही परिस्थिती असो, स्वरूपाचे ठिकाणी असणारे अनुसंधान न सुटणे, हेच स्वाभाविक दिसणारे साधूलक्षण आहे.

५) जे सदा आहे अशा स्वरूपाचे अनुसंधान सतत असणे हे साधुंचे मुख्य लक्षण आहे. म्हणून साधू हे आपल्यातच वावरत असून, आपल्यापेक्षा वेगळे असतात.

६) सदा स्वरूपानुसंधानाने द्वैताचे निरसन होऊन, अद्वितीय ब्रह्माचे निश्चयात्मक ज्ञान होणे, हीच शुध्द कल्पना.

७) स्वरूपी राहणे हा स्वधर्म सगळ्या धर्मामध्ये श्रेष्ठ असून, त्याचे आचरण – पालन जो करतो, तो साधू . साधूला ओळखण्याचे हेच एक मुख्य लक्षण आहे.

८) साधू हे देहाने वेगवेगळे दिसले तरी ते सर्व, देहातीत असणाऱ्या वस्तुशी तादात्म्य पावून, एकच स्वरूपाकार झालेले असतात.

९) स्वरूपाकार झाल्यावर तो देहाने एके ठिकाणी पडून राहिला काय किंवा उठून पळाला काय, त्याची स्वरूपाचे ठिकाणी असणारी बैठक ढळत नाही.

१०) जन्माला आलेले सगळेच मरतात, पण जे स्वरूपाकार झालेले आहेत, असे आत्मज्ञानी साधूसंत मरणाला मारून अमर होतात.

११) साधूंचेपाशी वृत्तीच उरलेली नसते – ते निवृत्ती असतात, मग त्यांचे ठिकाणी शोकाची, दु:ख देणारी वृत्ती कशी निर्माण होणार ? म्हणून साधू हे सुरुवातीपासून शेवटपर्यंत शोकरहित असतात.





१२) साधूला सर्व जग साधूच दिसते – सर्वत्र तो एक चैतन्यच पाहतो, वेगळेपणा हा जाणवतच नाही, मग कोणावर रागवायचे ? म्हणून चराचरामध्ये साधू क्रोधरहित वागतात.

१३) जन्ममरणरहित स्वानंदघन असा सोहं – आत्मा, तो तूच आहेस हे साधूवचन चित्तामध्ये बळकट धरावे.

१४) विवेकयुक्त वैराग्य हेच महद्भाग्य, हे खरे साधूच जाणतात असे रामदासस्वामी निश्चयपूर्वक सांगतात.

१५) जो स्वत: कल्पनातीत होऊन, निर्विकल्प ब्रह्माचे ठिकाणी लीन होतो तोच संत, बाकीचे सारे ब्रह्माची कल्पना करणारे, मायेच्या कक्षेतील भ्रमरूप असंत समजावे.

१६) जो शाश्वत आणि अशाश्वत यांची छाननी करून, भगात राहणारा – विवरस्थानी राहणारा – भगवान जाणतो, तो संत.

१७) जे दान त्रैलोक्यात कोणी देणार नाही, असे सायुज्यमुक्तीचे दान हे सज्जनसंत करतात. त्या संतांचे वर्णन शब्दाने करता येईल का ?

१८) मोठे मोठे महाराज, चक्रवर्ती पूर्वी होऊन गेले, आता आहेत, पुढे होणार आहेत, पण कोणी सायुज्यमुक्ती देणार नाही.

१९) त्या देवाच्या लोकात राहावे ही सलोकता, त्या देवाच्या जवळ राहावे ही समीपता, तर त्या देवासारखे रूप प्राप्त होणे ही सरूपता मुक्ती होय.

२०) निर्गुणाचे ठिकाणी अनन्य होऊन, निर्गुण होणे ही सायुज्यता. सायुज्यता म्हणजे निर्गुण भक्तीने प्राप्त होणारी निर्गुणता होय.

२१) ज्यांनी मोक्षश्री धारण केलेली आहे, अशा या श्रीमंत संतांनी, जन्म हेच दारिद्र्य असणाऱ्या असंख्य जीवांना अद्वैताची वाट दाखवून, जन्ममरणाच्या चक्रातून सोडवून, परमार्थी केले– राज्यधारी नृपती केले.

२२) नाना प्रकारची नाना स्वभावाची मुले असतात, पण त्या सर्वांवरच वडिलांचे सारखेच लक्ष असते. त्याप्रमाणे महापुरुष सर्वांचीच सारखीच चिंता वाहतात.

२३) प्रवाहाच्या विरुध्द पोहत उगमाकडे जाणे, हे सर्वांना साधत नाही. असा एखादाच बलवान निपजतो, जो अंतर्मुख होऊन, जे या चराचराचे मूळ आहे, जेथून हे सर्व उगम पावले आहे, त्या उगमापर्यंत जातो. त्या उगमाच्या दर्शनाने पवित्र होतो – तीर्थरुप होतो.

२४) पुण्याईच्या मार्गाने शुध्द पुण्य प्राप्त करून, ज्ञानरूप झालेले ज्ञानी, मुक्त होऊन गेले की मग त्यांचे सामर्थ्य त्यांच्या मागे सहजच उगेपणाने अनुभवता येते.

卐 卐 卐





## सद्‌गुरु

संतांनी केलेल्या संतवर्णनानुसार, आपल्या प्रकृतीला अनुरूप असा संत, साधू दैववशात जर आपणाला भेटला, तर त्यापरते भाग्य ते कोणते ? अशा संतांकडून – साधूंकडून आपल्या इच्छेनुसार जर आपणास देहभाव नष्ट करणारे, इंद्रियदमन सहज घडविणारे, मन सुखरूप शांत करणारे, निर्विकल्पी रत करणारे, सोहं साधन जर प्राप्त झाले, तर 'अधिकस्य अधिकं फलं'. साधन प्राप्त होणे हा अनुग्रह मिळाल्यावर, गुरु–शिष्याचे एक नाते निर्माण होते. हा अनुग्रह प्राप्त झाला की सारे काही झाले का ? नाही. तो अनुग्रह साधन साधून आपण सत्य करावा लागतो. आपण जर साधन साधले नाही तर अहंकार कसा जाणार? गुरूंचे ठिकाणी असणारे देवत्व कसे अनुभविणार ? 'गुरू हा प्राणविसावा माझा' हा अनुभव कसा येणार ? मग 'नुरोनिया ठेला' अशी आपली अवस्था न झाल्याने, साधुबोध आपणाला झाला की नाही यावर प्रश्नचिन्ह निर्माण होते. नाथमहाराज म्हणतात,

**''जे गुरूसी मनुष्य मानिती । ते मिथ्या गुरूभक्ती ।**
**त्यासी कल्पांती नोहे विश्रांती । उपदेश भ्रांती मनुष्यत्वे ।''**

निजत्वाचा अनुभव न देता, तोंडी मंत्र देऊन अनुग्रह करणारे गुरू गल्ली–गल्लीला आहेत .पण जे शिष्याला सद्‌वस्तुरूप करतात, तेच खरे सद्‌गुरु.

**''मंत्रतंत्र जे सांगती । ते तोंडीचे तोंडी उपदेशिती ।**
**नाही अंतरी निजप्रतीती । उपदेश भ्रांती मुख्यत्वे ।।''**
**''मंत्र तंत्र उपदेशिते । घरोघरी गुरू आहेत आइते।**
**जो शिष्यासी मेळवी सद्‌वस्तूते । सद्‌गुरू त्याते श्रीकृष्ण मानी ।।''**

ही नाथवचने यावर प्रकाश टाकतात. सद्‌गुरू कसे असतात याचे वर्णन नाथमहाराज असे करतात,

''जो स्वरूपी करी समाधान । तोचि सद्‌गुरू सत्य जाण ।
यावेगळें सद्‌गुरुपण । होआवया कारण असेना ।।''
''ब्रह्म सर्वांचे प्रकाशक । सद्‌गुरू तयाचाही प्रकाशक ।
एवं गुरूहूनि अधिक । नाही आणिक पूज्यत्वें ।।''

तर मुकुंदराज सद्‌गरूवर्णन असे करतात,

''जे संसारासि वेगळे । ज्ञान वैराग्येंसि आगळे ।
ब्रह्मरसें आनंदले । ते सद्‌गुरु जाणावें ।।''
''म्हणौनि दुर्लभू तो सद्‌गुरू । जो परब्रह्मेंसिं करी साक्षात्कारू ।
जेयांचेनि हेळामात्रे संसारू । निरसौनि जाये ।।''

सद्‌गुरू वर्णन समर्थश्रीरामकृपेची वचने कशी करतात हे आता पाहू.

१) असो जयासी मोक्ष व्हावा । तेणें सद्‌गुरु करावा ।
सद्‌गुरुविण मोक्ष पावावा । हें कल्पांती न घडे ।। ५–१–४४ ।।

२) जन्ममृत्यापासून सुटला । या नांव जाणिजे मोक्ष जाला ।
तत्वें शोधितां पावला । तत्वता वस्तु।। ८–७–५७ ।।

३) बीज अग्नीनें भाजलें । त्याचें वाढणे खुंटलें ।
ज्ञात्यास तैसें जालें । वासनाबीज ।।१५–१०–२८ ।।

४) याकारणें ज्ञाता पाहावा । त्याचा अनुग्रह घ्यावा ।
सारासार विचारें जीवा । मोक्ष प्राप्त ।। ६–१–३१ ।।

५) गाईत्रीमंत्राचा उचारु । सांगे तो साचार कुळगुरु ।
परी ज्ञानेंविण पैलपारु । पाविजेत नाहीं।। ५–२–८ ।।

६) आपली माता आणि पिता । तेहि गुरुचि तत्वता ।
परी पैलपार पावविता । तो सद्‌गुरु वेगळा ।। ५–२–७ ।।

७) जे यातीचा जो व्यापार ।सिकविती भरावया उदर ।
ते ही गुरु परी साचार । सद्‌गुरु नव्हेती ।। ५–२–६ ।।





८) येवं पोट भरावयाची विद्या । तयेसी म्हणो नये सद्विद्या ।
सर्वव्यापक वस्तु सद्या । पाविजे तें ज्ञान ।। ६–१–२३ ।।

९) रोग्यापासीं रोगी गेला । तेथें कैंचें आरोग्य त्याला ।
निर्बळापासीं निर्बळाला । पाठी कैंची ।। ६–१–२६ ।।

१०) देहापासीं गेला देही । तो कैसेनि होईल विदेही ।
म्हणोनि ज्ञात्यावांचून नाहीं । ज्ञान प्राप्त ।। ६–१–३० ।।

११) देहींच विदेह होणें । करून कांहींच न करणें ।
जीवन्मुक्तांची लक्षणें । जीवन्मुक्त जाणे ।। ६–९–३३ ।।

१२) शिष्यास न लाविती साधन । न करविती इंद्रियदमन ।
ऐसे गुरु अडक्याचे तीन । मिळाले तरी टाकावे ।।५–२–२१ ।।

१३) जेथें दिसती विशेष गुण । तें सद्‌गुरूचें अधिष्ठान ।
या कारणें तयासी नमन । अत्यादरें करावें ।। ४–६–९ ।।

१४) वासनानदी महापुरीं । प्राणी बुडतां ग्लांती करी ।
तेथें उडी घालूनि तारी । तो सद्‌गुरु जाणावा ।। ५–२–१३ ।।

१५) जो ब्रह्मज्ञान उपदेसी । अज्ञान अंधार निरसी ।
जीवात्मया शिवात्मयासी । ऐक्यता करी ।। ५–२–९ ।।

१६) सद्‌गुरुसी काय पुसावें । हेंहि कळेना स्वभावें ।
अनन्यभावें येकभावें । दोनी गोष्टी पुसाव्या ।। १२–३–३ ।।

१७) दोनी गोष्टी त्या कोण । देव कोण आपण कोण ।
या गोष्टींचे विवरण । केलेंचि करावें ।। १२–३–४ ।।

१८) जेचि क्षणीं अनुग्रह केला । तेचि क्षणीं मोक्ष जाला ।
बंधन कांहीं आत्मयाला । बोलोंचि नये ।। ८–७–५९ ।।

**१९) मुख्य सच्छिष्याचें लक्षण । सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण ।**
**अनन्यभावें शरण । त्या नांव सच्छिष्य ।। ५-३-१९ ।।**

**२०) येक गुरु येक देव । कोठें तरी असावा भाव ।**
**भावार्थ नस्तां वाव । सर्व कांहीं ।। १०-७-१५ ।।**

**२१) सद्गुरुहून देव मोठा । जयास वाटे तो करंटा ।**
**सुटला वैभवाचा फांटा । सामर्थ्यपिसें ।। ५-३-४० ।।**

**२२) गुरु-देवास बरोबरी । करी तो शिष्य दुराचारी ।**
**भ्रांति बैसली अभ्यंतरीं। सिध्दांत नेणवे ।। ५-३-४३ ।।**

**२३) म्हणोनि सद्गुरु वर्णवेना । हे गे हेचि माझी वर्णना ।**
**अंतरस्थितीचिया खुणां । अंतर्निष्ठ जाणती ।। १-४-३१ ।।**

**२४) प्रगट तें जाणावें असार । आणी गुप्त तें जाणावें सार ।**
**गुरुमुखें हा विचार । उमजों लागें ।। ६-२-२१ ।।**

**२५) गुप्त तेंचि प्रगटवावें । असाध्य तेंचि साधावे ।**
**कानडेंचि अभ्यासावें । सावकास ।। ६-२-२३ ।।**

**- भावार्थ -**

१) ज्याला मोक्ष हवा असेल, त्याने सद्गुरुंचा अनुग्रह घ्यावा. सद्गुरुशिवाय मोक्षप्राप्ती कधीच घडत नाही.

२) तत्वांचा तत्वांमध्ये निरास करून, तत्वत: सद्वस्तुरूप होणे - जन्ममृत्युपासून सुटका होणे म्हणजेच मोक्ष प्राप्त होणे होय.

३) बीज अग्नीने भाजले असता त्याचे वाढणे खुंटते, त्याप्रमाणे वासनेचे बीज नष्ट झाले असता, ज्ञात्याचे जन्ममरण खुंटते.

४) म्हणून आत्मज्ञानी संत पाहावा, त्याचा अनुग्रह घ्यावा. मग सारासार विचाराने जीवाला मोक्ष प्राप्त होतो.





५) गायत्रीमंत्राचा उपदेश करणारे कुलगुरु हे गुरुच, पण सद्गुरु नव्हेत. कारण गायत्रीच्या मंत्रोच्चाराने गायत्री भेटत नाही - गायत्रीचे ज्ञान होत नाही, संसारसागरातून परपार होता येत नाही.

६) आपले आई वडील हेही गुरुच. पण भवसागरातून परपार करणारा सद्गुरु वेगळा.

७) ज्या यातीचा जो उद्योगधंदा असेल, तो पोट भरण्यासाठी वडीलमाणसे शिकवतात, ते ही गुरुच. पण ते सद्गुरु नव्हेत.

८) पोट भरायला शिकविणारी विद्या ही काही सद्विद्या नव्हे. सर्वव्यापक परमात्मवस्तु - चराचराचे मूळ - शुध्दस्वरूप प्राप्त करून देणारी अध्यात्मविद्या - अध्यात्मज्ञान ही खरी सद्विद्या.

९) एखादा रोगी जर औषध घेण्यासाठी दुसऱ्या रोग्याकडेच गेला, तर त्याला कसे आरोग्य प्राप्त होइल ? तो कसा बरा होईल ? किंवा एखादा दुबळा आपले संरक्षण व्हावे या हेतूने दुसऱ्या दुबळ्याकडे गेला, तर त्याचे कसे संरक्षण होईल ?

१०) देही माणसाचा अनुग्रह घेवून विदेहता कशी प्राप्त होणार ? जो स्वत:च विदेही नाही, तो दुसऱ्याला काय विदेही अवस्था प्राप्त करून देणार ? म्हणून आत्मज्ञानी सद्गुरुंच्या अनुग्रहाशिवाय ज्ञानप्राप्ती होणार नाही हे निश्चित.

११) देहामध्येच असताना विदेहपणा भोगणे, सर्व काही क्रिया निर्हेतुकपणे करणे म्हणजे करून काहीच न करणे,ही जीवनमुक्तांची लक्षणे जो जीवनमुक्त असेल तोच जाणतो.

१२) जे शिष्याला मन सुखरुप शांत होणारे बरवे साधन करण्यास सांगत नाहीत, अर्थात मन शांत न झाल्याने इंद्रियदमनही त्याला साधत नाही, असले गुरु दमडीला तीन मिळाले तरी त्यांच्या नादी लागू नये.

१३) जेथे जेथे त्रिगुणाचे पलिकडील विशेष असा अहर्निशी परमार्थ घडविणारा चौथा गुण – शुध्द सत्वगुण आढळेल, दिव्यत्वाची प्रचिती येईल, तेथे तेथे सद्‌गुरुंचे वास्तव्य आहे. म्हणून त्याठिकाणी अत्यादराने नमन करावे.

१४) मनामध्ये असणाऱ्या वासनानदीला आलेल्या महापुरात गटांगळ्या खाताना गयावया करणाऱ्या सामान्य जीवाला, तेथे उडी घालून जो तारतो – वासनेपासून मुक्त करतो, तो सद्‌गुरु.

१५) जो ब्रह्मज्ञानाचा उपदेश करून अज्ञानाचा अंध:कार नाहीसा करतो, जीवाशिवाची भेट घडवितो, तो सद्‌गुरु.

१६–१७) सद्‌गुरुंना काय विचारावे ? हे कित्येकांना सहसा कळत नाही. सद्‌गुरुंशी अनन्य होऊन, एकभावाने त्यांना दोन गोष्टी विचाराव्यात, एक देव कोण ही, तर दुसरी मी (भक्त) कोण ही, या गोष्टींचा खुलासा पुन:पुन्हा करून घ्यावा.

१८) ज्या क्षणी साधूंचा 'तो' बोध होतो–'तोच मी आहे, मी कोणी वेगळा नाहीच आहे' असा अनुभव येतो, त्या क्षणालाच तो मुक्त होतो. आत्म्याला कांही बंधन उरतच नाही.

१९) सद्‌गुरुवचनावर पूर्ण विश्वास असणे व सद्‌गुरुंना अनन्यभावाने शरण जाणे – भावाशी अनन्य होऊन जाणे, ही सच्छिष्याची प्रमुख लक्षणे आहेत.

२०) जो एक देव सर्वत्र भरून राहिला आहे, तो एक देव व तो एक देव शिष्याला दाखविणारे एक गुरु, यांचे ठिकाणी बळकट भाव हवा. हा असा भाव नसेल तर सारे काही व्यर्थ आहे. पन्नास देव व पन्नास गुरु नसावेत.

२१) मायेच्या पलिकडे असणाऱ्या सद्‌गुरुंपेक्षा, मूळमायेने युक्त असणारा देव ज्याला मोठा वाटतो, तो करंटा होय. देवाच्या ठिकाणी असणारी





शक्ती प्राप्त करून घेण्याच्या नादात तो खऱ्या परमार्थापासून बाजूला होतो व वैभवाच्या मागे लागतो.

२२) सद्‌गुरुंपेक्षा देव मोठा तर राहोच, सद्‌गुरुंच्या बरोबरीने देवास कोणी शिष्य मानील, तर तो शिष्य दुराचारी होय. त्याच्या अंत:करणात भ्रांती घर करून बसल्याने त्याला वेदोक्त सिध्दांताचे आकलन होत नाही.

२३) सद्‌गुरुस्वरूप हे मायेच्या पलिकडे आहे, म्हणून त्याचे वर्णन शब्दात करता येत नाही, हेच त्याचे वर्णन. ह्या आतल्या खुणा अंतरंगात प्रवेश केलेल्यांना अनुभवाने जाणता येतात.

२४) जे इंद्रियांना जाणता येते असे उघड, ते सारे असार व जे इंद्रियांना जाणता येत नाही असे जे गुप्त आहे, ते सारे सार. हा विचार गुरुंच्या सान्निध्यात त्यांच्या सहज उपदेशाने उमजू लागतो.

२५) जे अनाकलनीय – कानडे आहे, अशा परमात्मस्वरूपाच्या निरंतर सावकाश अभ्यासाने, उपाधीमध्ये गुप्त असणारे सारभूत चैतन्य प्रगट होणे, ही असाध्य गोष्ट साध्य होते.

卐 卐 卐

## उपदेश

संत महात्मे शिष्यांची संख्या वाढावी, संप्रदाय वाढावा, या हेतूने उपदेश करत नाहीत. हा आपला शिष्य आहे, याला मी उपदेश दिला आहे हे त्यांच्या गावीही असत नाही. दासराममहाराज सांगायचे, ''शिष्य शिष्यत्वाला विसरला, गुरु गुरुत्वाला विसरला, दोघे एकाच पातळीत आले, तरच खरा उपदेश होतो.'' पातळी वर खाली झाली तर सत्य अनुग्रह होत नाही. अहो अनुग्रह – उपदेश होण्यासाठी हृदयाला हृदय मिळावे लागते. मनाला मन मिळावे लागते. उपदेश कसा करावा हे तुकाराम महाराज असे सांगतात, **''मेघवृष्टीने करावा उपदेश । परी गुरुने न करावा शिष्य ।।''** आपल्यासारखे वासनेच्या महापुरात गटांगळ्या खाणारे जीव, त्रिविध तापाने किंवा संसार दु:खाने होरपळलेले जीव पाहून संतांना कळवळा येतो व त्यांच्या मुखातून सहजच हिताच्या गोष्टी बाहेर पडतात, तो आपणासाठी उपदेश असतो इतकेच. **''बुडता हे जन न देखवे डोळा । म्हणोनी कळवळा येतो मज ।।''** व **'' सहज बोलणे हितोपदेश । करोनी सायास शिकविती ।। ''** हे तुकोपनिषद हेच स्पष्ट करते. पण आपण गुर्वाज्ञेप्रमाणे साधन – नामस्मरण न साधल्याने, अहंकार नाहीसा होऊन आत्मसुख–सर्वसुख प्राप्त व्हावे, हा उपदेश घेण्यामागचा हेतू कितपत साध्य होतो हा प्रश्नच आहे. **''साधुबोध झाला तो नुरोनिया ठेला''** या ज्ञानेशवचनाचा अनुभव त्याला येतो कां ? नाही ना! उपदेश घेताना बरें वाटते पण अहंकार जात नाही, याचे काय करायचे ? **''मुख्य ते गळाली पाहिजे अहंता । उपदेश घेता सुख वाटे ।।''** ही तुकोक्ती साधकांना अंतर्मुख करणारी आहे. उपदेश घेण्यामागचा हेतू सर्वांनाच साध्य का होत नाही ते नाथमहाराज असे सांगतात,

**''शिष्या चित्ती विषयासक्ती । गुरुपदेशे नव्हे परमार्थ प्राप्ती ।**
**तो उपदेश जाय व्यर्थ अंती । करी विपरीतार्थी ज्ञानगर्वे ।**
**जे गुरुसी मनुष्य मानीती । ते मिथ्या गुरुभक्ती ।**





**त्यासी कल्पांती नव्हे विश्रांती । उपदेश भ्रांती मनुष्यत्वे ।**
**मंत्र तंत्र जे सांगती । ते तोंडीचे तोंडी उपदेशिती ।**
**नाही अंतरी निजप्रतिती । उपदेश भ्रांती मुख्यत्वे ।।''**

समर्थश्रीरामकृपेची वचने उपदेश काय करतात हे आता पाहू.

१) **निद्रा आळस दुश्चितपण । हेंची मूर्खांचे लक्षण ।**
**येणेंकरितां निरूपण । उमजेचिना ।।८–६–३६ ।।**

२) **सांडूनियां जगदीशा । मनुष्याचा मानी भर्वसा ।**
**सार्थकेंविण वेची वयसा । तो येक मूर्ख ।।२–१–५४ ।।**

३) **मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीस सादर व्हावें ।**
**मरोन कीर्तीस उरवावें । येणें प्रकारें ।।१२–१०–१३ ।।**

४) **येच क्षणीं मरोनी जासी । तरी रघुनाथीं अंतरलासी ।**
**माझें माझें म्हणतोसी । म्हणोनिया ।।३–१०–५० ।।**

५) **आपणास आहे मरण । म्हणोन राखावें बरेंपण ।**
**कठिण आहे लक्षण । विवेकाचें ।।१२–२–२६ ।।**

६) **आधीं राखावा आचार । मग पहावा विचार ।**
**आचारविचार पैलपार । पाविजेतो ।।१७–१०–२५ ।।**

७) **बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें ।**
**तयांची वचनें प्रमाणें । मानिति जनीं ।।१२–१०–३९ ।।**

८) **जो बहुतांचें सोसीना । त्यास बहुत लोक मिळेना ।**
**अवघेचि सोसितां उरेना । महत्व आपुले ।।११–५–१८ ।।**

९) **राखावीं बहुतांचीं अंतरें । भाग्य येतें तदनंतरें ।**
**ऐसीं हीं विवेकाचीं उत्तरें । ऐकणार नाहीं ।। १९–३–१८ ।।**

१०) **जगामध्यें जगमित्र । जिव्हेपासीं आहे सूत्र ।**
**कोठें तरी सत्पात्र । शोधून काढावें ।। १९–२–१९ ।।**

११) जो बहुतांस मानला । तो जाणावा शाहाणा जाला ।
जनीं शाहाण्या मनुष्याला । काय उणें ।। १५–३–२६ ।।

१२) भूमंडळीं सकळांसी मान्य । तो म्हणों नयें सामान्य ।
कित्येक लोक अनन्य । तया पुरुषासी ।। १५–६–२९ ।।

१३) जितुकें कांहीं आपणासी ठावें । तितुकें हळुहळू सिकवावें ।
शाहाणें करूनि सोडावे । बहुत जन ।। १९–१०–१४ ।।

१४) जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ।।१९–९–१६ ।।

१५) सकळ अवगुणांमध्यें अवगुण । आपले अवगुण वाटती गुण ।
मोठें पाप करंटपण । चुकेना कीं ।।१९–८–८ ।।

१६) मिळोन जाऊन मेळवावें । पडी घेऊन उलथावें ।
कांहींच कळों नेदावें । विवेकबळें ।। १५–६–१६ ।।

१७) दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे ।
सज्जनापरीस आळवावे । महत्व देऊनी ।। १९–९–२३ ।।

१८) धटासी आणावा धट । उध्दटासी पाहिजे उध्दट ।
खटनटासी खटनट । अगत्य करी ।। १९–९–३० ।।

१९) कांही उपाधी करूं नये । केली तरी धरूं नये ।
धरिली तरी सांपडों नये । उपाधीमध्यें ।।१४–१–३० ।।

२०) जो अन्न देतो उदरासी । शरीर विकावें लागे त्यासी ।
मां जेणें घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ।। ३–१०–५५ ।।

२१) वेष धरावा बावळा । अंतरी असाव्या नाना कळा ।
सगट लोकांचा जिव्हाळा । मोडूं नये ।। १५–१–३१ ।।

२२) धड मळिण नेसों नये । गोड अन्न खाऊं नये ।
दुराग्रह करूं नये । प्रसंगें वर्तावें ।। १४–१–९ ।।





२३) कोणास कांहींच न मागावें । भगवद्भजन वाढवावें ।
विवेकबळें जन लावावें । भजनाकडे ।।१९–६–११ ।।

२४) अखंड येकांत सेवावा । अभ्यास करीतचि जावा ।
काळ सार्थकचि करावा । जनासहित ।।११–१०–१७ ।।

२५) विरक्तें असावें विरक्त । विरक्तें असावें हरिभक्त ।
विरक्तें असावें नित्यमुक्त । अलिप्तपणें ।।२–९–३५ ।।

**– भावार्थ –**

१) निद्रा, आळस, दुश्चितपणा अंगी असणे हेच मुर्खाचे लक्षण होय. हे तीन गुण अंगी बाणलेल्या माणसावर उपदेशाचा काय परिणाम होणार ?

२) 'जन नोहे अवघाची जनार्दन' अशी अवस्था असताना, जो माणसात जनार्दन न अनुभवता जनच अनुभवतो, तो मूर्ख, आपले आयुष्य (श्वास) अनुभवाशिवाय – आयुष्याचे सार्थक न करता फुकट घालवितो.

३) आपणास मरण आहे याची जाणीव जर सतत राहील तरच हरीभक्ती घडेल व याप्रकारे मरणास मारुन, जन्ममरण नुरवून अमर होईल.

४) हे माझे, ते माझे म्हणून सगळे गोळा करतो आहेस हे खरे, पण याच क्षणी जर मरण आले तर हे सर्व वाया जाईलच व रामही प्राप्त होणार नाही.

५) आपणास एक दिवस हे जग सोडून जायचे आहे, हे ध्यानात घेऊन लोकांशी प्रेमाचे संबंध ठेवावेत. हा विचार सतत उरी बाळगणे अवघड पण तितकाच महत्वाचा.

६) आधी आपल्या आचरणात आणावे. आचरणा पाठोपाठ येणारा विचार हा आपल्याला आचारी का विचारी करत नाही. आचार व विचार यांच्यात साम्य असेल – एकरूपता असेल, तरच पैलपार होता येते.

७) जे आधी आचरणात आणतात व मग उपदेश करतात किंवा ज्यांचे बोलण्या–प्रमाणे वागणे असते, त्यांचा उपदेश वाया जात नाही – परिणामकारी होतो.

८) जो सगळ्यांचे सगळे सोसतो, त्यालाच लोकांचे पाठबळ लाभते. म्हणून जर त्यांनी काहीही केलेले आपण सोसले, तर आपलीही किंमत राहात नाही.

९) बहुत जे दृश्य आहे, त्याच्या अंतरंगाकडेच लक्ष द्यावे. जगदंतरी अनुसंधान असावे, कोणाचेही अंत:करण दुखवू नये म्हणजे भाग्य प्राप्त होते, हा शहाणपणाचा विचार ज्यांना कळत नाही, ते करंटे.

१०) जगामध्ये जगमित्र होण्याचे मुख्य सूत्र आपल्या जिव्हेपाशीच आहे. चांगली सज्जन माणसे हुडकावीत व त्यांच्याशीच संवाद साधावा.

११) ज्याचा शरीरभाव उणा झाला आहे, ज्याच्या अंतरी ज्ञानच जागे आहे. म्हणून ज्या माणसाला सर्वजण मानतात, अशा माणसाला शहाणा, ज्ञानी समजले जाते.

१२) जो जगामध्ये वंदनीय समजला जातो, त्याला सामान्य म्हणू नये. कित्येक लोक त्याची आज्ञा शिरसावंद्य मानतात.

१३) जितके काही आपल्याला माहिती आहे, तितके लोकांना सावकाश शिकवावे. अशा रितीने सर्व लोक शहाणे – ज्ञानी होतील असे पहावे.

१४) जो स्वत:चे काम दुसऱ्यावर सोपवतो, त्याचे काम बिघडते. जो स्वत:च कष्ट करून कार्य तडीस नेतो, त्यालाच भलेपणा प्राप्त होतो.

१५) आपले अवगुण, गुणच आहेत असे वाटणे हा अवगुण आपल्याजवळ असणे, हे आपल्या दुर्दैवाचे लक्षण असून, आपल्या हातून होणारे मोठे पापकृत्य या गुणामुळे चुकविता येत नाही. म्हणून हा अवगुण सगळ्या अवगुणाहून मोठा आहे.

१६) लहानात लहान व्हावे, मोठ्यात मोठे व्हावे. सर्वांत मिळून मिसळून त्यांची मने जिंकावीत. आपल्या मनाचा थांगपत्ता लागू न देता आपल्याकडे कमीपणा घ्यावा व वेळ आली की आपले कसे बरोबर आहे हे पटवून द्यावे.





१७) दुर्जन माणसे ओळखावीत, पण तसे बोलून दाखवू नये. उलट त्यांना सज्जनांपेक्षा अधिक मोठेपणा देऊन राजी ठेवावे.

१८) दांडग्यासमोर दांडगा उभा करावा, उध्दटाला उत्तर देण्यासाठी उध्दट उभा करावा, तर दुष्ट, भांडखोर दुर्जनाला तसाच दुष्ट भांडखोर आणून अगत्य भिडवावा.

१९) कोणतीही उपाधी करू नये. समजा केली तर तिची आसक्ती धरू नये. समजा आसक्ती धरली तर तिच्यात गुरफटून जाऊ नये.

२०) जो आपल्याला उदरनिर्वाहापुरते अन्न देतो, त्याच्याकडे घाणवट रहावे लागते. मग ज्याने (परमेश्वराने) जन्मास घालून – श्वासोश्वासाची पुंजी देऊन हा अमोलिक देह प्राप्त करून दिला, त्याला कसे विसरावे ?

२१) बाह्यत: वेष साधा असला तरी, अंतरात मात्र विविध प्रकारचे ज्ञान– नाना कळा असाव्यात. जेणेयोगे सर्व लोकांचे प्रेम संपादन करता येईल.

२२) मलिन वस्त्र धडके  असले तरी नेसू नये, गोड अन्न खाणे टाळावे. याकरिता आग्रही असावे पण दुराग्रह असू नये. प्रसंग पाहून वागावे.

२३) विवेकबळाने जन – इंद्रियवृत्ती चैतन्याकडे वळवाव्यात, साधनाच्या अभ्यासाकडे – भजनाकडे वळवाव्यात व अंत:करणातील सर्व इच्छा नाहीशा करून, सदा समाधान हे भगवद्‌भजन वाढवावे.

२४) ''घ्यावे आणि सांडावे। प्रभंजनासी ।।'' हा समर्थ साधन अभ्यास करून, ज्यात आदि आणि अंत होतो अशा आत्मरूपाचा अखंड अनुभव – अखंड एकांताचा अनुभव लोकांमध्ये राहूनच घ्यावा व काळाचे सार्थक करावे.

२५) विरक्ताने अलिप्तपणे वागून वैराग्यसंपन्न असावे, व सदा हरीशी तादात्म्य पावून – हरिभक्त होऊन नित्यमुक्त असावे.

卐 卐 卐

## संसार

या जगात असार म्हणून जितके आहे, त्याला संसार म्हणतात. या जगात असार काय आहे हो ? त्रिगुण व त्रिगुणातून निर्माण झालेले सारे असार आहे व तोच संसार आहे. हा संसार सोडून राहणारे निर्गुण परब्रह्म तेवढे सार आहे. **''त्रिगुण असार निर्गुण हे सार । सारासार विचार हरीपाठ ।।''** हे ज्ञानेशवचन, **''फळकट हा संसार । येथ सार भगवंत ।।''** ही तुकोक्ती, **''संसार समस्त त्रिगुण। यांमाजीं मी अवघा निर्गुण। हे तुज कळावया निजखूण। गुणनिरुपण म्यां केलें ।। ''** हे नाथवचन, ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत.

हा त्रिगुणात्मक असार संसार कसा ओळखायचा ? नाथ महाराज सांगतात,

**''मनें कल्पोनि निजसत्तें । उपजवी नाना वृत्तींतें ।**
**त्याचि त्रिगुणा होती येथें । गुणविभागातें गुणवृत्तीं ।।''**
**''देखिजे अथवा ऐकिजे । कां मनें जें जें चिंतिजे ।**
**तें तें अवघेंचि जाणिजे । मायागुणकाजे त्रिगुणात्मक ।।''**

इंद्रियांना जाणवणारे सारे व आपल्या कल्पनेत येणाऱ्या साऱ्या विविध मनोवृत्ती त्रिगुणात्मक असून तोच खरा संसार आहे.

संसार हा स्वप्नाप्रमाणेच काल्पनिक आहे. म्हणून संसाराचे वर्णन जगद्गुरु शंकराचार्य **'' संसारस्वप्नसंकाशं यौवन कुसुमोपमं ।। विद्युच्चलमिवायुष्यं तस्माज्जागृहि जागृहि ।।''** या शब्दांत करतात. तर नाथमहाराज संसाराचे वर्णन असे करतात, **''जेवीं का स्वप्नभोग जाण । स्वप्नीं सत्य मानी आपण । तेवीं संसार हा दीर्घस्वप्न । मायिक जाण मिथ्यात्वें ।।''** स्वप्न हे काल्पनिक असले तरी स्वप्न हे स्वप्न पाहताना खरेच वाटते, ते आपण जागे झाल्यावर खोटे ठरते. तद्वत संसार हा सुध्दा आपण स्वरूपाचे ठिकाणी जागे झाल्यावर खोटा ठरणारा आहे. आपण पाहतो ते स्वप्न जास्तीत जास्त सात सेकंदाचे असते, तर





संसार हे सर्वसाधारण सत्तर वर्षांचे दीर्घस्वप्न आहे असे दासराममहाराज सांगत.

स्वप्न ज्याप्रमाणे क्षणभंगूर असते, त्याप्रमाणे हा संसार सुध्दा क्षणभंगूर आहे हे मुक्ताबाई असे सांगतात,

**''क्षणभंगूर संसार याचा भरवसा नाही ।**
**नरतनू गेल्या बारे मग तू पडशील पस्ताई ।।''**

चंचळ वायूरुप आत्म्याच्या ठिकाणी स्वभावत: असणाऱ्या जाणीवेमुळे संसरण – श्वसन हा संसार सुरू होतो व आत्मा संसारी होतो. **''जे क्षेत्र–क्षेत्रज्ञ योगें । होईजें येणें जगें । आत्मा गुणसंगें । संसारिया ।।''** हे ज्ञानेशवचन याला प्रमाण आहे. ही जाणीव सर्वसाधारणत: सात्विक, राजस, तामस या तीन प्रकारात मोडते. जशी जाणीव असते त्यानुसार श्वसनगती (निश्वास) खाली येण्याचे प्रमाण असते. तामसी वृत्ती निर्माण झाली – क्रोध निर्माण झाला की ५६ अंगुळे निश्वास खाली येतो, तर निर्विकल्प अवस्थेत श्वासोच्छ्वास थांबलेला असतो. याचा अर्थ असा, आत्म्याच्या ठिकाणी जाणीव – कल्पना निर्माण झाली की श्वसन चालू होते. श्वास आत घेणे हा जन्म, श्वास खाली सोडणे हे मरण व श्वास – उच्छ्वास या मधील काळ – स्थिती हे चालू होते. हे कल्पनेने पुन:पुन्हा प्राप्त होणारे जन्म मरण हाच खरा संसार आहे. नाथमहाराज म्हणतात,

**''देहासी जन्म स्थिती मरण । यांसी मनचि गा कारण ।**
**मन:कल्पित संसार जाण । तेंचि श्रीकृष्ण सांगत ।।''**

तर शंकराचार्य हे असे सांगतात,

**''पुनरपि जननं पुनरपि मरणं ।**
**पुनरपि जननीजठरे शयनं । इह संसारे ।।**

म्हणजे जोवर कल्पना आहे, तोवर जन्ममरण आहे, श्वासोच्छ्वास आहे, संसार आहे. म्हणजे त्रिगुणात्मक कल्पनेमुळे असणारे संसरण हाच खरा संसार आहे. **''संसरण हाचि पाहता संसार। बारे सोडणार तुझा तुचिं ।।''** ही

मामामहाराजांची अमृतवाणी व **''म्हणती संसार सुटला। श्वासोच्छ्वास तों चालिला।''** ही संतोक्ती याला प्रमाण आहे.

म्हणजे मनात येणाऱ्या त्रिगुणात्मक विचारांवर श्वसनांची गती अवलंबून आहे किंवा श्वसनगतीवर हा त्रिगुणात्मक विचार – त्रिगुणात्मक संसार अवलंबून आहे.

इंद्रियांची विषयभोगलालसा मनाच्या अधीन असून, मन हे श्वसनगतीवर अवलंबून आहे. साधनाच्या अभ्यासाने – श्वासोच्छ्वासाच्या अभ्यासाने पवनविजय साधला असता इंद्रियांवर स्वामित्व व मनावर अंकुश ठेवणे सहजशक्य होणारे आहे, हे नाथमहाराज असे सांगतात, **''विषय ते मनाअधीन। मन पवनासी वश्य जाण। अभ्यासें वश केला पवन। सहजें मन स्थिरावें।।''** तर ज्ञानेश्वर महाराज असे सांगतात, **''बळियें इंद्रिये येती मना। मन एकवटे पवना। पवन सहजें गगना। मिळोचि लागे।।''** अर्थात या त्रिगुणात्मक संसाराचा डोलारा या श्वसनगतीवर अवलंबून आहे.

या श्वासोच्छ्वासाच्या अभ्यासाने, साधनाच्या अभ्यासाने श्वसनगती सूक्ष्म होऊन त्रिगुणात्मक विचार लोपले असता, जीवनातील असार संसाराचा भाग नाहिसा झाला असता, मन सुखरूप झाले असता, देहाचा मनाचा लय झाला असता, राहणारे श्वसन म्हणजे बरवे साधन. **''असारा संसारा त्यजूनी। बरवे साधन करी।।'' हे समर्थ वचन व ''बरवे साधन सुखशांत मन। क्रोध नाही जाण तिळभरी।।''** ही तुकोक्ती, 'बरवे साधन' म्हणजे काय हे स्पष्ट करणारी आहे.

हे साधन बरवे होऊन, 'बरवे साधन' साधले असता, निवृत्ती अवस्थेत स्मरण राहिले असता, विनासायास 'सोहं तेही अस्तावले' ही अवस्था प्राप्त होते. श्वास आत घेणे हा जन्म व श्वास सोडणे हे मरण, ही जन्ममरणाची परंपरा खंडित होते. ''पुनरपि जननं पुनरपि मरणं। पुनरपि जननी जठरे शयनं। इह संसारे।।'' हा आचार्यांनी निर्देश केलेला संसार नाहिसा होतो. हे नाथमहाराज असे सांगतात,





**''तेथ सोहंहंसाची बोळवण। न करिताची जाहली जाण।**
**येणें पळालें जन्ममरण। पडलें शून्य संसारा।।''**

समर्थ श्रीरामकृपेची वचने संसाराबद्दल काय सांगतात ते आता पाहू.

१) **स्वप्नीं स्वप्नाचा विचार। तो तूं जाण हा संसार।**
**येथें तुवां सारासार। विचार केला।। ६–१०–५१।।**

२) **संसार म्हणजे सवेंच स्वार। नाहीं मरणासी उधार।**
**मापीं लागलें शरीर। घडीनें घडी।। ३–९–१।।**

३) **परम मूर्खामाजीं मूर्ख। जो संसारीं मानी सुख।**
**या संसारदु:खाऐसे दु:ख। आणीक नाही।। २–१०–४०।।**

४) **जो संसारदु:खे दुखावला। जो त्रिविधतापें पोळला।**
**तोचि अधिकारी जाला। परमार्थासी।। ५–३–३४।।**

५) **सर्व भूतांचेनि संयोगे। सुखदु:ख उपजों लागे।**
**ताप होतां मन भंगे। या नाव आधिभौतिक।। ३–७–२।।**

६) **देहामधून जें आलें। इंद्रियें प्राणें दु:ख जालें।**
**तें आध्यात्मिक बोलिलें। तापत्रई।। ३–६–१४।।**

७) **शुभाशुभ कर्मानें जना। देहांतीं यमयातना।**
**स्वर्ग नर्क भोग नाना। या नांव आधिदैविक।। ३–८–२।।**

८) **सांडून आपली संसारवथा। करीत जावी देवाची चिंता।**
**निरूपण कथा वार्ता। देवाच्याचि सांगाव्या।। ४–८–७।।**

९) **जेणें संसारी घातलें। अवघें ब्रह्मांड निर्माण केलें।**
**त्यासी नाहीं वोळखिलें। तोचि पतित।। ६–१–१४।।**

१०) **संसारा आलियाचें सार्थक। जेथें नित्यानित्यविवेक।**
**इहलोक आणी परलोक। दोनी साधिले।। १७–१–२१।।**

**११) मन ठेवून ईश्वरीं । जो कोणी हरिकथा करी ।**
**तोचि ये संसारीं । धन्य जाला ।। १४–५–३७ ।।**

**१२) येचि जन्में येचि काळें । संसारीं होईजे निराळें ।**
**मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ।। ६–९–२९ ।।**

**– भावार्थ –**

१) निश्चळ परब्रह्माने कल्पनेने पाहिलेले स्वप्न म्हणजे हा चंचळ वायुरूप आत्मा. या वायुरूप आत्म्याजवळ निर्माण झालेल्या जाणीवेमुळे हा आत्म्याचा संसरणात्मक संसार सुरू होतो. म्हणजे हा आत्म्याचा संसार म्हणजे परब्रह्माने स्वप्नात पाहिलेले स्वप्न होय. या संसारात तू सारासार – नित्यानित्य विवेक केलास.

२) जीवाच्या जन्मापाठोपाठ त्याचा मृत्यू जन्मास आलेला असतो. मरणाला उधारी नाही. जन्मापाठोपाठ मरण व मरणापाठोपाठ पुन्हा जन्म– श्वासोच्छ्वास,हे माप शरीरास लागले आहे. हे पुन:पुन्हा प्राप्त होणारे जन्ममरण–श्वासोच्छ्वास हाच जीवाचा संसार आहे.

३) या संसारदु:खासारखे तापदायक दुसरे दु:ख नसताना, जो या दु:खरूप संसांरात सुख मानतो, तो अगदी मूर्खातला मूर्ख होय.

४) संसारदु:खाने गांजलेला व त्रिविधतापांनी पोळलेला जो असेल तोच परमार्थाचा अधिकारी होतो.

५) सगळ्या पंचमहाभूतांच्या संयोगाने अथवा प्राणिमात्रापासून जे सुखदु:ख उत्पन्न होते व मन बेचैन होते, त्या तापसंतापाला आधिभौतिक ताप म्हणतात.

६) जे दु:ख देहातून निर्माण होते व इंद्रिये आणि प्राण यांच्याद्वारे भोगावे लागते, त्या दु:खाला त्रिविध तापांपैकी अध्यात्मिक ताप असे संबोधतात.





७) आपल्या चांगल्या वाईट कर्माप्रमाणे, आपण मेल्यावर ज्या यमयातना किंवा स्वर्गनरकादी नाना भोग भोगावे लागतात, त्यांना आधिदैविक ताप म्हणतात.

८) संसारात असणारा मोह हीच संसारव्यथा असून त्या मोहापासून बाजूला होऊन, देव कसा भेटेल, याची काळजी घ्यावी. डोक्यात इतर कांही न घेता, देवाचेच चिंतन सतत असावे.

९) ज्या परमेश्वराने आपणास जन्मास घातले, हे सर्व विश्व निर्माण केले, त्याला जो ओळखत नाही, तोच पतित.

१०) नित्यानित्य विवेकाने प्रपंच व परमार्थ हे दोन्ही साधले म्हणजे संसाराला आल्याचे सार्थक होते.

११) मन ईश्वराला अर्पण करून – नमन करून, जो कोणी उर्ध्ववाहिनी हरिकथा साधतो, तोच या संसारात परमार्थ साधून धन्यता प्राप्त करून घेतो.

१२) याच जन्मात याच घटकेला संसारातून वेगळे होऊन – गुणातीत होऊन – चंचळत्व नाहीसे होऊन, निश्चळत्व प्राप्त झाल्याने – निश्चळ स्वरूपाशी तादात्म्य झाल्याने मोक्ष प्राप्त होतो.

卐 卐 卐

## साधन

आपले आयुष्य ज्या साधनाने मोजले जाते, त्या श्वासोच्छ्वासाच्या आधारानेच आपल्याला सच्चिदानंद पदवी प्राप्त होणार आहे. ''**आयुष्याच्या या साधने । सच्चिदानंद पदवी घेणे ।।**'' ही तुकोक्ती हे स्पष्ट करणारी आहे. हे श्वासोच्छ्वास साधनीभूत करूनच आपले मन शुध्द होणे – मनातील अनित्य भाग नाहीसा होणे, हे साध्य होणार आहे. इतके हे साधन महत्वाचे आहे. आपल्याला साधनाचे ठिकाणी मन मुरल्यानंतर जे उरते, त्याचा अनुभव घ्यायचा आहे. ''**मन मुरे मग जे उरे ।ते तू कारे सेविसी ना ।।**'' असा प्रश्न ज्ञानेश्वर महाराज आपणास करीत आहेत. हे मन मुरण्यासाठी – घटण्यासाठी साधनाचा अभ्यास होणे गरजेचे आहे. साधनाचे ठिकाणी – प्राणापानाचे ठिकाणी मन हे लीन होत असल्याने ''**साधनी मन घटवी बा रे साधनी मन घटवी ।।**'' अशी विनंती आमचे मामामहाराजांची अमृतवाणी आपणास करीत आहे. ही बलिष्ठ इंद्रिये व त्यांचे विषय यांचेवर स्वामित्व मिळविणेसाठी, मन ताब्यात येणेसाठी, मनोजय साधणेसाठी अभ्यासाने पवनविजय साधणे गरजेचे आहे. ''**बळियें इंद्रिये येती मना। मन एकवटे पवना। पवन सहजें गगनां। मिळोंचि लागे ।।**'' हे ज्ञानेशवचन व ''**विषय ते मनाअधीन । मन पवनासी वश्य जाण । अभ्यासें वश केला पवन । सहजें मन स्थिरावें ।।**'' हे नाथवचन, हे स्पष्ट करणारे आहे. या साधन अभ्यासाने पवनविजय साधून हे मन शुध्द झाले असता – मनातील जडाचा अंश नाहिसा झाला असता, देहातीत होऊन – चत्वार देहाचा निरास होऊन, वस्तूची ओळख होत असल्याचे तुकाराममहाराज असे सांगतात, ''**शुध्द करा मन व्हारे देहातीत । ओळखा वस्तूते तुका म्हणे ।।**'' या साधनाचे महत्व नाथमहाराज असे सांगतात,

**''हें स्थान पावावयासाठीं । योगी झाले महाहटी ।**
**अभ्यास करितां अतिसंकटी । तेही शेवटीं न पावती ।।**





**हें पावावया माझें स्थान । अतिगुह्य आहे अनुष्ठान ।**
**सोहंहंसाचे साधन । सावधान जो साधी ।।**
**प्राणाचेनि गमनागमनें । सोहंहंसाचेनि स्मरणें ।**
**सावधानें जो साधूं जाणे । तेणें पावणें हे स्थान ।।**
**त्यासीचि पवनजयो घडे । तोचि आज्ञाचक्रामाजी चढें ।**
**तेथूनिही मार्ग काढी पुढें । अति निवाडें अचूक ।।''**

हा नाकावाटे आत बाहेर करणारा प्राण जो स्वभावत: बारा अंगुळे बाहेर वाहतो आहे, त्याच्या अभ्यासानेच आत्मारामाचा अनुभव येणार आहे. अभ्यासाने या प्राणाचे बाहेर येण्याचे प्रमाण जसजसे कमी होते, तसतसा अनुभव वाढत जातो. ''**स्वभावे प्राण अंगुळे बारा । निर्गमागमे संचारा । अखंड पीडे नासीके द्वारा । तेणे रघुवीरा सेविलें ।।**'' हे नाथवचन व ''**नासापुटौनि वारा । जो जातसे अंगुळे बारा । तो गचिये धरुनि माघारा । आंतु घाली ।।**'' हे ज्ञानेशवचन, या दोन वचनांचे आधारे हाच निष्कर्ष निघतो. ती. प. पू. दासराममहाराज यांनी आपुले करता, नि:श्वास १५ अंगुळे खाली आला तर येणाऱ्या अनुभवापासून, नि:श्वास खाली येणे बंद होईपर्यंत येणारे अनुभव स्वानुभवाने एका अभंगात नोंदले आहेत. तो अभंग असा,

**''सर्वसाधारण अठरा ते वीस । अंगुळे नि:श्वास गती वाहे ।। १ ।।**
**क्रोधाग्नी संतापे होता बेसुमार । छप्पन्नाचे वर गती वाहे ।।२ ।।**
**पंधरा अंगुळे नि:श्वास वहाता । तरी ये स्थिरता सहजेची ।।३ ।।**
**द्वादश अंगुळे साधनी नि:श्वास । समता चित्तास प्राप्त होय ।।४ ।।**
**एकादश अंगुळे जरी होय वहाती । तरी काव्यस्फूर्ती आत्मयाची ।। ५ ।।**
**दशम अंगुळे नि:श्वास वहाता । अक्षरे देखता दृष्टीपुढे ।। ६ ।।**
**नवांगुळापासूनी साधी अष्टसिध्दी । असे त्याचा अवधी द्वयांगुळी ।। ७ ।।**
**एकची अंगुळे वहाता नि:श्वास । होय नादघोष सुस्वरेसी ।। ८ ।।**
**जरी होय बंद ऐसा हा नि:श्वास । दरवळे सुगंध चहू ठायी ।। ९ ।।**

उर्ध्वमुख होता देखे साक्षात्कार । दासराम स्थिर अलक्ष्यातु ।। १० ।।''

आपल्याला येणाऱ्या अनुभवानुसार आपले साधन किती झाले आहे याची कल्पना या अभंगाद्वारे साधकांना निश्चितच येईल.

समर्थ श्रीरामकृपेची वचने साधनवर्णन काय करतात, ते आता पाहू.

**१) आयुष्य हेचि रत्नपेटी । माजीं भजनरत्नें गोमटीं ।**
**ईश्वरीं अर्पूनिया लुटी । आनंदाची करावी ।। ३–१०–२७ ।।**

**२) भजन साधन अभ्यास । येणें पाविजे परलोकास ।**
**दास म्हणे हा विश्वास । धरिला पाहिजे ।।१६–१०–३१ ।।**

**३) नाडिद्वारा धांवे जीवन । जीवनामध्यें खेळे पवन ।**
**त्या पवनासरिसा जाण । आत्माहि विवरे ।। १३–९–१३ ।।**

**४) येकवीस सहस्त्र साहशे जपा । नेमून गेली ते अजपा ।**
**विचार पाहातां सोपा । सकळ कांहीं।। १७–५–१ ।।**

**५) धरितां सो सांडिता हं । अखंड चाले सोहं सोहं ।**
**याचा विचार पाहतां बहु । विस्तारला ।। १७–५–११ ।।**

**६) येकांतीं उगेंच बैसावें । तेथें हें समजोन पाहावें ।**
**अखंड घ्यावें सांडावें । प्रभंजनासी ।। १७–५–६ ।।**

**७) येकाग्र करूनियां मन । बळेंचि धरावें साधन ।**
**यत्नीं आळसाचें दर्शन । होऊंच नये ।। १८–३–१२ ।।**

**८) येकांती मौन धरून बैसे । सावध पाहातां कैसें भासे ।**
**सोहं सोहं ऐसे । शब्द होती ।। १७–५–७ ।।**

**९) उच्चारेंविण जे शब्द । ते जाणावे सहजशब्द ।**
**प्रत्यया येती परंतु नाद । कांहींच नाहीं ।। १७–५–८ ।।**

**१०) ते शब्द सांडून बैसला । तो मौंनी म्हणावा भला ।**
**योगाभ्यासाचा गल्बला । याकारणें ।। १७–५–९ ।।**





**११) येकांती मौन धरून बैसला । तेथें कोण शब्द जाला ।**
**सोहं ऐसा भासला । अंतर्यामीं ।। १७–५–१० ।।**

**१२) आणीक येक समाधान । मीपणेंविण साधन ।**
**करूं जाणे तोंचि धन्य । समाधानी ।। ७–७–५३ ।।**

**१३) तत्वीं वेटाळून घेतला । प्राणी संशयीं बुडाला ।**
**आपणांस आपण भुलला । कोहं म्हणे ।। ६–३–३४ ।।**

**१४) तत्वी गुंतला म्हणे कोहं । विवेक पाहातां म्हणे सोहं ।**
**अनन्य होतां अहं सोहं । मावळलीं ।।६–३–३५ ।।**

**१५) नाहीं भक्तीचें साधन । नाहीं वैराग्य ना भजन ।**
**क्रियेवीण बोले ब्रह्मज्ञान । तो येक पढतमूर्ख ।। २–१०–२३ ।।**

**– भावार्थ –**

१) आपले आयुष्य ही एक रत्नपेटी असून, तिच्यामध्ये ज्याच्यावर आपल्या आयुष्याची गणना होते असे आयुष्याचे साधन – अनमोल श्वासोच्छ्वास – ही भजनरत्ने आहेत. ही रत्ने ईश्वराला अर्पून स्वानंदाची लूट करावी.

२) नित्य साधनाचा अभ्यास हे भजन, सानुरागे साधल्याने परलोकाची प्राप्ती होते हा विश्वास धरला पाहिजे.

३) अध्यात्मदृष्टीने इडा व पिंगला या दोनच नाड्या महत्वाच्या आहेत. त्या कार्यरत असतील तरच इतर नाड्या कार्यरत राहतात. या दोन नाड्यातून ज्याच्यावरुन आपले अस्तित्व जाणवते असे श्वासोच्छ्वास वाहात असतात. या श्वासोच्छ्वासात वायू हा प्रधान घटक असून पंचमहाभूतांपैकी इतर चार महाभूते कमी प्रमाणात असतात. साधनाच्या अभ्यासाने जीवनातील पृथ्वी, आप, तेज या जड तत्वांचा निरास झाला

असता, स्थूल व सूक्ष्म देहांचा निरास झाला असतां, उच्छ्वास खाली येण्याचे प्रमाण कमी होते व राहिलेल्या वायू व आकाश या तत्वांमार्फत आत्मा स्पष्ट होऊ लागतो.

४) दिवसाच्या चोवीस तासात मनुष्य प्राण्याचे २१६०० श्वासोच्छ्वास होतात. यांचेकडे नियमाने, एकाग्रतेने लक्ष देऊन त्यांचे नियमन करणे हाच तो अजपाजप असून, विचार करून पाहिले असता यात कठीण असे काही नाही.

५) श्वास घेताना स: व सोडताना अहं असा सहजशब्द सोहं अखंड सुरु असतो. याचा विचार केला असता हा सोहंनाद, बहुत जे दृश्य आहे त्या ठिकाणी भरून राहिला आहे – विस्तारला आहे, असे ध्यानात येईल.

६) उगेपणात येऊन – कांही न बोलता, चालता, काहीच न करता स्तब्ध होऊन – 'कांहीच न करूनी प्राणी' या अवस्थेत, एकांतात अखंड वायू सारखा आत घेणे व बाहेर सोडणे, या अनैच्छिक क्रियेकडे जाणीवपूर्वक समजून पहावे.

७) मनोवृत्तीचा निरोध साधून श्वासोच्छ्वास हे परमात्मप्राप्तीचे साधन बळकट धरावे, नि:श्वास खाली येण्याचे प्रमाण कमीत कमी व्हावे, हे साधण्यासाठी मात्र आळस न करता प्रयत्न केला पाहिजे.

८ व ९) एकांतामध्ये अंतर्बाह्य मौन धरून, सावधपणाने श्वासोच्छ्वास या क्रियेकडे पाहिले असता, उच्चाराशिवाय नादरहित असा सहजशब्द 'सोहं' अनुभवास येतो.

१०) ज्याच्या रवी , शशी या जीवनाच्या गती मावळल्या आहेत, सोहं हे अस्तावले आहे, तो भला मौनी समजावा–त्याने खरे मौन साधले आहे हे ओळखावे. हे साधणेसाठी योगाभ्यास, तादात्म्य होणेचा अभ्यास, पवनविजय साधणेचा अभ्यास, साधन साधणे गरजेचे आहे.





११) एकांतामध्ये साधनाच्या अभ्यासाने देहाचा, मनाचा, प्राणाचा लय झाला असता, सोहं हे अस्तवले असता – खरे मौन अनुभवले असता 'मी अमुक आहे' हे स्फुरण हृदयदेशी शिल्लक राहते, ते अंतर्यामी भासणारे सोहं – आत्मरूप होय.

१२) आयुष्याची वाटचाल ज्या साधनाने – श्वासोच्छ्वासाने करतो, ते श्वासोच्छ्वास – जीवन, चत्वार देहांचा निरास करून अहंकारविरहित – मीपणा विरहित करणे जो जाणतो, तोच जीवनात समाधानी होऊन धन्यता प्राप्त करून घेतो.

१३ व १४) जीव हा पंचमहाभूते व त्यांचे देह यातच गुरफटून गेला. त्यामुळे आत्मा आहे की नाही, असा संशय निर्माण झाला. चैतन्याचा विसर झाला आणि 'कोहं' म्हणजे 'मी कोण ?' असे विचारू लागला. नित्य अनित्य यांची छाननी करून जीवनातील पृथ्वी, आप, तेज ही अनित्य तत्वे नाहिशी झाली असता, 'मीच ब्रह्म – सोहं' ही उर्मी उठते व निर्गुण ब्रह्माचा अनुभव आला असता – निर्गुणाशी समरस – अनन्य झाला असता, मीची जाणीव संपूर्णपणे नाहिशी होऊन, तोच आहे हे जाणवते.

१५) ज्याच्या अंत:करणातील इच्छा गेलेली नाही – ज्याची क्रिया हेतूपर्वक आहे, अर्थात जो भक्तीचे साधन – परमेश्वराशी एकरूप होण्याचे साधन – भजन आचरत नाही, निर्हेतूक सत्क्रिया न आचरता जो ब्रह्मज्ञान बोलतो, तो पढतमूर्ख.

卐 卐 卐

## ध्यान

कुणाला कशाचे, कुणाला कशाचे, प्रत्येकाला कोणते ना कोणते ध्यान हे लागलेलेच असते. आमच्यासारख्यांना दुःखास कारणीभूत ठरणारे कांचनाचे ध्यान, दृश्याचे ध्यान लागलेले असते. ''**कांचनाचे ध्यान परस्त्री चिंतन। दु:खासी कारण हेची दोन्ही।**'' हे समर्थवचन हे स्पष्ट करणारे आहे, तर संतमहात्म्यांना जीवनाचे सार्थक करणारे आत्मारामाचे ध्यान लागलेले असते. ''**ध्यान लागले रामाचे। सार्थक झाले जन्माचे।।**'' ही संतोक्ती व ''**आत्मया रामाचे ध्यान लागले मज कैसे। क्रियाकर्मधर्म अवघे येणेची प्रकाशे।।**'' हे नाथवचन हेच स्पष्ट करते.

सोहं हंसाचे ध्यान करण्याची पध्दत ही पूर्वापार चालत आलेली आहे. नाथमहाराज सांगतात,

**''पूर्वील कृतयुगींचे लक्षण। तैं नव्हते गा चारी वर्ण।**
**बहुशाखा वेदपठण। कर्माचरण तैं नाहीं।।**
**तैं सकळ मनुष्यांसी जाण। 'सोहं हंसा'चें अखंड ध्यान।**
**यालागी 'हंस' हा एकचि वर्ण। सर्वांसही जाण ते काळीं।।''**

ध्यान कुणाचे करावे, कसे करावे हे नाथमहाराज असे सांगतात,

**'' करोनि आळसाची बोळवण। धरूनि निजवृत्ती सावधान।**
**त्यावरी करावें माझें ध्यान। एकाग्र मन राखूनी।।''**

ध्यान करता करता ध्याता हा ध्येयरुप होतो, हे ध्यानामागचे वर्म नाथमहाराज असे सांगतात,''**त्याचे करू जाता ध्यान। ध्येय ध्याता होय शून्य। ध्यानेची चैतन्यघन। त्यासी माझे नमन अनन्यत्वें।**'' ध्येय, ध्याता, ध्यान ही त्रिपुटी लय पावणे हे खरे ध्यान हे ज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ''**ध्येय,ध्याता,ध्यान त्रिपुटीवेगळा। सहस्त्रदळी उगवला सूर्य जैसा।।**''





ध्यानासंदर्भात समर्थ श्रीरामकृपेचीवचने काय आहेत ते आता पाहू.

१) **फुटक मन येकवटिलें। तेणें तुटक ध्यान केलें।**
**तेथें कोण सार्थक जालें। पाहाना कां।। १४-८-३६ ।।**

२) **देवास देहधारी कल्पिती। तेथें नाना विकल्प उठती।**
**भोगणें त्यागणें विपत्ति। देहयोगें।।१४-८-३२ ।।**

३) **जगदंतरीं अनुसंधान। बरें पाहाणें हेंचि ध्यान।**
**ध्यान आणी तें ज्ञान। येकरूप।। २०-४-१२ ।।**

४) **ध्यान धरितें तें कोण। ध्यानीं आठवितें तें कोण।**
**दोनींमध्ये अनन्यलक्षण। असिलें पाहिजे।।१४-८-३८ ।।**

**- भावार्थ -**

१) सगळीकडे हिंडणारे चंचळ मन, प्रयत्नाने एकाग्र करण्याचा प्रयत्न केला तर जे तुटके ध्यान लागेल, त्या ध्यानाने सार्थक होणार नाही, दुरीत जाणार नाही हे लक्षात घ्या.

२) देवास देहधारी कल्पून जर ध्यान केले - काल्पनिक देवाचे जर ध्यान केले तर कल्पना कमी होण्याच्या ऐवजी वाढतच जातात. त्याबद्दलचा संकल्प विकल्प वाढतो, मग तो नि:संदेह, निर्विकल्प कसा भेटणार ? संदेह न गेल्याने - देहयोगाने भोगणे, त्यागणे, निरनिराळ्या विपत्ती अटळ ठरतात.

३) जगाचे अनुसंधान न ठेवता, जगदंतरी अनुसंधान ठेवणे - उपाधीमध्ये गुप्तरूपाने असणाऱ्या चैतन्याचे अनुसंधान ठेवणे, हेच ईश्वराचे ध्यान होय, हेच ईश्वराचे ज्ञान होय. आत्मध्यान व आत्मज्ञान हे दोनी एकरूपच आहेत.

४) ध्यान करताना जो ध्यान करतो तो आणि ज्याचे ध्यान धरले जाते तो, हे वेगळे नाहीत, याचा अनुभव येणे, हेच खरे ध्यान.

卐 卐 卐

## बध्द

स्वस्वरूपाच्या विस्मरणाने विषयासक्ती वाढून, मनात संशयाने थैमान घालणे, भवचक्रात सापडणे हेच बध्दाचे लक्षण आहे. नाथमहाराज म्हणतात, **''स्वस्वरुपाचे विस्मरण। तेणें विषयासक्ती दृढ जाण। संकल्प विकल्प अति गहन। तेंचि लक्षण बध्दाचे।।''** वस्तुत: मुक्त असणारा जीव, मी आणि माझे यात अडकून बध्द होतो. **''मुक्त होता परी बळे झाला बध्द। घेवोनिया छंद माझे माझे ।।''** ही संतोक्ती हेच स्पष्ट करते. जीव हा सप्तपाशी जखडला आहे. या सप्तपाशाचे वर्णन नाथमहाराज असे करतात,

**''काळपाश, कर्मपाश। धर्मपाश, ब्रह्मपाश।**
**मायापाश, मोहपाश। जन्मपाश सातवा ।।**
**काळपाश तो आयुष्यघातू। कर्मपाश तो अनैश्वर्यवंतू।**
**धर्मपाश तो आश्रमगतू। वेदविहितार्थ ब्रह्मपाश ।।**
**देहममता तो मोहपाश। मुख्यमाया तो आशापाश।**
**कनककांता हा जन्मपाश। सप्तपाशी जीव बध्द ।।''**

वासना शांत होणे म्हणजे मुक्ती असून, वासना निर्माण होणे हेच बध्दाचे लक्षण आहे हे नाथमहाराज असे सांगतात,

**''सकळ वासनेची शांती। या नाव मुख्य मुक्ती।**
**विषयवासना उत्पत्ती। बध्दता निश्चिती या नाव ।।''**

बध्द नेमके कुणाला म्हणावे हे मामामहाराज केळकर असे सांगतात,

**''तोची जाणावा बांधला। कामक्रोधे गुंडाळला ।। १ ।।**
**तोची जाणावा बांधला। अहंभाव युक्त झाला ।।२ ।।**
**तोची जाणावा बांधला। मी माझे न सुटे ज्याला ।।३ ।।**
**दास म्हणे तो बांधला। नेणे आपण बध्द झाला। ।४ ।।**





समर्थ श्रीरामकृपेची वचने बध्दाचे वर्णन काय करतात ते आता पाहू.

**१) न कळे भक्ति न कळे ज्ञान। न कळे वैराग्य न कळे ध्यान।**
**न कळे मोक्ष न कळे साधन। या नांव बध्द ।।५-७-१२ ।।**

**- भावार्थ -**

१) ज्याला भक्ती म्हणजे काय हे माहित नाही, ज्ञान झालेले नाही, वैराग्य कसले असते हे माहित नाही, ध्यान म्हणजे काय हे माहित नाही, मोक्ष काय असतो, मोक्षाप्रत नेणारे साधन कसले असते हे माहित नाही, तो बध्द.

卐 卐 卐

## मुमुक्षू

आपण बंधनाने बांधलेले आहोत हे ज्याला समजते व या बंधनातून मुक्त होण्याची इच्छा जो करतो, तो मुमुक्षू. हे मुमुक्षुत्व कधी प्राप्त होते हो ? जो त्रिकाल साधन साधतो त्याला हे मुमुक्षुत्व प्राप्त होते. **''तीन साधने साधिता । मुमुक्षुत्व येई हाता ।।''** हे मामामहाराजांचे वचन येथे लक्षात घेण्याजोगे आहे. त्रिकाळ साधनाने अंतरातील सर्व आशा, इच्छा नाहिशा झाल्या असता, जी अंतरात इच्छा उरते, तिला मोक्षाची इच्छा म्हणतात. म्हणजे सर्व आशा, इच्छा ज्याच्या नाहिशा झाल्या आहेत, तो मुमुक्षू होय. **''सद्‌गुरुंनी खरे नैराश्य साधिले । जें सर्व आशा निरसोनी अंतरी उरले । उरले त्यासी नाम दिधले । मोक्षो मे भूयात इतिच्छा ।।''** ती.प.पू.मामामहाराज केळकर यांनी साधन मार्गाला धरुन भगवान सद्‌गुरु तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे लिहिलेले चरित्र 'श्री हनुमद्‌गुरुचरित्र – बोध – सार'' या ग्रंथातील त्यांच्या अनुग्रहापूर्वीच्या अवस्थेचे वर्णन करणारी ही ओवी, त्यांचा पारमार्थिक अधिकार अधिक स्पष्ट करणारीच आहे. या मुमुक्षूचे वर्णन ज्ञानेश्वर महाराज असे करतात,**''पैं भवस्वर्गा उबगले । मुमुक्षु योगज्ञाना वळधले । पुढती न यों इया निगालें । पैजा जेथ ।।''** तर मुकुंदराज असे करतात, **''देहादिक प्रपंचु । जिवासी मानिलासी सांचू । तो मुमुक्षें उंचनिंचु । निरसावा गा ।।.''**

समर्थ श्रीरामकृपेची वचने मुमुक्षूबद्दल काय सांगतात, ते आता पाहू.

**१) अहंता सांडूनि दूरी । आपणास निंदी नानापरी ।**
**मोक्षाची अपेक्षा करी । या नांव मुमुक्षु ।।५–८–४१ ।।**

**– भावार्थ –**

१) अहंकार टाकून स्वत:कडे जो कमीपणा घेतो व मोक्षाची अपेक्षा करतो तो मुमुक्षू.

卐 卐 卐





## नवविधा भक्ती

परब्रह्मापासून विभक्त असणाऱ्यांना भक्त होण्यासाठी करावे लागणारे आचरण म्हणजे भक्ती होय. भक्ती म्हणजे काय हे संत शिवराम असे सांगतात, **''विषय इंद्रिये जड ओळखणे या नाव विरक्ती । चैतन्याकडे वृत्ती वळविणे या नाव भक्ती ।।''** तर तुकाराम महाराज हे असे सांगतात, **''भक्ती ते नमन । वैराग्य तो त्याग ।''** तर नाथमहाराज भक्तीचे वर्णन असे करतात, **''अहर्निशीं माझी कथा । अहर्निशीं माझी वार्ता । अहर्निशीं मातें ध्याता । भक्ति तत्वतां ती नांव ।।''** ही एकच भक्ती नऊ प्रकाराने व्यक्त होते. म्हणून तिला नवविधा भक्ती असे म्हणतात. ही भक्ती जरी नवविधा असली तरी तिचा हेतू मात्र एकच, परमेश्वराशी एकविध होणे हा आहे. **''गोविंद म्हणे पेरी अनेक । परी ऊस बोलिंजे एक ।''** ही मामांची अमृतवाणी नवविधा भक्तीतील एकविधता दाखविणारी आहे. या नवविधा भक्तीचे वर्णन ज्ञानेश्वरमहाराज असे करतात, **''श्रवण कीर्तन विष्णु:स्मरण पादसेवन भले । अर्चन वंदन दास्य सख्य निवेदन झाले ।।''** या नवविधा भक्तीचे महात्म्य तुकाराममहाराज असे सांगतात. **''तुका म्हणे नवविध । भक्ती जाणे तोचि सिध्द ।।''** व ही नवविधाभक्ती संतजनांनी मला प्राप्त करून द्यावी ही आपली आंतरीक तळमळ तुकाराममहाराज अशी व्यक्त करतात, **''नवविधा काय बोलियेली भक्ती । द्यावे माझे हाती संतजनी ।।''** समर्थ श्रीरामकृपेची वचने नवविधा–भक्ती कशी वर्णितात ते आता पाहू.

**१) विभक्तपणें नसावें । तरीच भक्त म्हणवावें ।**
**नाहींतरी व्यर्थचि सिणावें । खटाटोपें ।११–८–१३ ।।**

**२) मी भक्त ऐसें म्हणावें । आणि विभक्तपणेंचि भजावें ।**
**हें आवघेंचि जाणावें । विलक्षण ।।४–९–४ ।।**

**३) भक्तें जें मनीं धरावें । तें देवें आपणचि करावें ।**
**तेथें वेगळें भावावें । न लगे कदा ।। १०–७–२३ ।।**

४) नाहीं वैकुंठीचा ठाईं । नाहीं योगियांचा हृदईं ।
माझे भक्त गाती ठाईं ठाईं । तेथें मी तिष्ठतु नारदा ।।१-८-२ ।।

५) भक्तांचेनि साभिमानें । कृपा केली दाशरथीनें ।
समर्थकृपेचीं वचनें । तो हा दासबोध ।।२०-१०-३० ।।

६) ग्रंथा नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद ।
येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ।।१-१-२ ।।

७) आतां श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तत्काळ ।
तुटे संशयाचें मूळ । येकसरां ।।१-१-२८ ।।

८) जेथें नाहीं नित्यश्रवण । तें जाणावें विलक्षण ।
तेथें साधकें येक क्षण । क्रमूं नये सर्वथा ।। ७-८-४४ ।।

९) सेविलेंचि सेवावें अन्न । घेतलेंचि घ्यावें जीवन ।
तैसें श्रवण-मनन । केलेंचि करावें ।। ७-८-४७ ।।

१०) ऐसें हें अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधून घ्यावें ।
असार तें जाणोनि त्यागावें । या नांव श्रवणभक्ती ।।४-१-३० ।।

११) कीर्तनें महादोष जाती । कीर्तनें होय उत्तम गती ।
कीर्तनें भगवत्प्राप्ती । यदर्थी संदेह नाहीं ।।४-२-२७ ।।

१२) कीर्तनें वाचा पवित्र । कीर्तनें होय सत्पात्र ।
हरिकीर्तनें प्राणिमात्र । सुशीळ होती ।।४-२-२८ ।।

१३) कीर्तनें अव्यग्रता घडे । कीर्तनें निश्चय सांपडे ।
कीर्तनें संदेह उडे । श्रोतयांवक्तयांचा ।।४-२-२९ ।।

१४) कलौ कीर्तन वरिष्ठ । जेथें होय तें सभा श्रेष्ठ ।
कथाश्रवणें नाना नष्ट । संदेह मावळती ।।१-८-२९ ।।

१५) ऐसिये सभेचा गजर । तेथें माझा नमस्कार ।
जेथें नित्य निरंतर । कीर्तन भगवंताचें ।।१-८-२७ ।।

१६) हरिकथा सांडूं नये । निरूपण तोडूं नये ।
परमार्थास मोडूं नये । प्रपंचबळें ।।२-२-३५ ।।





१७) आपुलिया सुखस्वार्था । केलीच करावी हरिकथा ।
हरिकथेवीण सर्वथा । राहोंचि नये ।।४-२-४ ।।

१८) उदासवृत्तीस मानवे जन । विशेष कथानिरूपण ।
रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी ।।१२-९-२६ ।।

१९) येक मन तें गुंतलें स्वरीं । कोणें चिंतावा श्रीहरी ।
बळेंचि धरूनिया चोरीं । शुश्रूषा घेतली ।।१४-५-३४ ।।

२०) स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें ।
नामस्मरणें पावावें। समाधान ।।४-३-२ ।।

२१) नित्यनेम प्रात:काळीं । माध्यानकाळीं सायंकाळीं ।
नामस्मरण सर्वकाळीं । करीत जावें ।।४-३-३ ।।

२२) उफराटें नाम म्हणतां वाचें । पर्वत फुटले पापाचे ।
ध्वज उभारले पुण्याचे । ब्रह्मांडावरुते ।।१६-१-९ ।।

२३) उफराट्या नामासाठीं । वाल्मीक तरला उठाउठीं ।
भविष्य वदला शतकोटी । चरित्र रघुनाथाचें ।।४-३- १६ ।।

२४) नामें पाषाण तरले । असंख्यात भक्त उध्दरले ।
महापापी तेचिं जाले । परमपवित्र ।।४-३-१८ ।।

२५) कांहीच न करूनी प्राणी । रामनाम जपे वाणी ।
तेणें संतुष्ट चक्रपाणी । भक्तांलागी सांभाळी ।।४-३-२१ ।।

२६) पादसेवन तेंचि जाणावें । कायावाचामनोभावें ।
सद्‌गुरुंचे पाय सेवावे । सद्‌गतीकारणें ।।४-४-२ ।।

२७) काया वाचा आणि मनें । चित्तें वित्तें जीवें प्राणें ।
सद्‌भावें भगवंता अर्चणे । या नांव अर्चनभक्ती ।।४-५-२९ ।।

२८) मनें भगवंतास पुजावें । कल्पून सर्वही समर्पावें।
मानसपुजेचें जाणावें । लक्षण ऐसें ।।४-५-३२ ।।

२९) जें जें आपणास पाहिजे । तें तें कल्पून वाहिजे ।
येणें प्रकारें कीजे । मानसपूजा ।।४-५-३३ ।।

**३०) नमस्कारें दोष जाती । नमस्कारें अन्याय क्षमती ।**
**नमस्कारें मोडलीं जडती । समाधानें ।। ४–६–१५ ।।**

**३१) परम अन्याय करूनि आला । आणी साष्टांग नमस्कार घातला ।**
**तरी तो अन्याय क्षमा केला । पाहिजे श्रेष्ठीं ।।४–६–२० ।।**

**३२) देवाचें वैभव सांभाळावें । न्यूनपूर्ण पडोंचि नेदावें ।**
**चढतें वाढतें वाढवावे । भजन देवाचें ।।४–७–३ ।।**

**३३) देवास जयाची अत्यंत प्रीती । आपण वर्तावें तेणें रीती ।**
**येणें करितां भगवंतीं । सख्य घडें नेमस्त ।।४–८–३।।**

**३४) देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी ।**
**सर्व अपावें सेवटीं । प्राण तोंही वेचावा ।।४–८–८ ।।**

**३५) जाणतां जाणतां जाणीव जाते । आपली वृत्ति तद्रूप होते ।**
**आत्मनिवेदन भक्ति ते । ऐसी आहे ।।१३–२–२८ ।।**

**३६) पदार्थ मनें काया वाचा । मी हा अवघाचि देवाचा ।**
**जड आत्मनिवेदनाचा । विचार ऐसा ।।१२–५–१६ ।।**

**३७) ठावचि नाहीं चंचळाचा । तेथें आधीं आपण कैंचा ।**
**निश्चळ आत्मनिवेदनाचा । विवेक ऐसा ।।१२–५–२० ।।**

**३८) पंचीकरण तत्वविवरण । महावाक्यें वस्तु आपण ।**
**नि:संगपणें निवेदन । केलें पाहिजे ।।१२–३–२६ ।।**

**३९) अनन्य म्हणिजे अन्य नसे । आत्मनिवेदन जैसें ।**
**संगभंगें असतचि असे । आत्मा आत्मपणें ।।९–२–३० ।।**

**– भावार्थ –**

१) देवाशी तादात्म्य झाले – वेगळेपणा संपला तरच त्याने भक्त असे म्हणवावे. खटाटोप करून जर वेगळेपणा संपला नाही, तर केलेले प्रयत्न व्यर्थच म्हणावे लागतील.

२) मी भक्त आहे असे म्हणायचे आणि वेगळेपणाने – विभक्तपणाने भजन करायचे हे सारे विलक्षण आहे – चमत्कारीक आहे.





३) देवापासून विभक्त नसणारे भक्त, देवापेक्षा कधीही वेगळे समजू नये. जे भक्ताच्या मनात, तेच देवाच्या मनात, असे असल्याने भक्ताच्या इच्छा देव आपणहून पुऱ्या करतो.

४) मी जुनाट वैकुंठातही राहात नाही किंवा योग्यांच्या हृदयातही मी रहात नाही, पण ज्याठिकाणी माझे प्रेमळ भक्त नामघोष करतात, नारदा, त्याठिकाणी मी हटकून तिष्ठत उभा असतो.

५) भक्ताबद्दल असलेल्या आपलेपणाच्या भावनेमुळे श्रीसमर्थ दाशरथी रामाने भक्तावर कृपा केली. 'तोच हा आहे हा' बोध केला. ती कृपावचने – बोधवचने म्हणजेच हा दासबोध होय.

६) गुरु–शिष्यांच्या संवादातून दासाला झालेला तत्वबोध म्हणजेच हा दासबोध ग्रंथ असून या ठिकाणी परमात्म्यापासून विभक्त असणाऱ्यांना परमात्मरूप होणेसाठी–भक्त होणेसाठी आचरावा लागणारा भक्तिमार्ग स्पष्टपणे–विस्तृतरूपात सांगितला आहे.

७) श्रवणाने क्रियेचा निर्हेतूक सत्क्रियेत बदल होऊन – भाव धरला जाऊन, संशय मुळासकट नाहीसा होतो.

८) अनुहात नाद श्रवण न होणे हे अनुसंधान सुटल्याचे लक्षण आहे. अशा विलक्षण अवस्थेत साधकाने एकही क्षण घालवू नये .

९) शरीरपोषणासाठी तेच तेच अन्न पुन:पुन्हा खावे लागते, पाणी प्यावे लागते. त्याप्रमाणे नाम दृढ होणेसाठी पुन:पुन्हा त्याच त्याच नाम घट्ट करणाऱ्या विषयांचे श्रवण मनन करावे लागते.

१०) सगळ्यांचे सगळे ऐकावे पण त्यातील सार जे नाम आहे, तेच अंत:करणात घ्यावे व बाकीचे सर्व असार आहे हे समजून त्याग करावा ही श्रवणभक्ती.

११) कीर्तनाने महादोष नाहीसे होतात व सद्‌गती प्राप्त होऊन, साक्षात्काराने भगवत्प्राप्ती होते, याबद्दल तीळमात्र शंका नाही.

१२) कीर्तनाने वाणी पवित्र होऊन तो शीलवान, चारित्र्यसंपन्न होतो. त्याची पारमार्थिक योग्यता वाढते.

१३) कीर्तनाने एकाग्रता साधून श्रोत्यावक्त्यांना समाधानाने निश्चय प्राप्त होतो. अंत:करणातील सारे संशय नाहिसे होतात.

१४) कीर्तनश्रवणाने भाव धरला जाऊन अंत:करणात असणारे विविध संशय नाहिसे होतात, म्हणून कलियुगात कीर्तनच सर्वात श्रेष्ठ साधन मानले जाते. एवढेच नाही तर ज्या ठिकाणी हे कीर्तन चालते ती सभादेखील, इतर सभांहून श्रेष्ठ मानली जाते.

१५) म्हणून ज्या सभेमध्ये निरंतर नित्य भगवंताचे, नित्य कीर्तन चालते त्या सभेला देखील माझा नमस्कार.

१६) वैराग्य अंगी बाणलेले नसल्याने दिननिशी होणाऱ्या षड्‌विकारात्मक आयासांचा जोर वाढतो – प्रपंचाचा प्रभाव वाढतो. या प्रापंचिक अडचणीने हरिकथा ऐकणे वा करणे, निरूपण करणे हे सोडू नये – परमार्थात खंड पडू देऊ नये.

१७) आत्मसुखाचा स्वार्थ साधणेसाठी हरिकथा ही पुन:पुन्हा करावी. हरिकथेशिवाय क्षणभरही राहू नये.

१८) जीवनात उत्कर्ष व्हावा हेच मानवी जीवनाचे ध्येय असते. (उत्+आस = उदास = उत्कर्षाची आस) उर्ध्ववाहिनी हरिकथा साधणे हाच खरा जीवनाचा उत्कर्ष आहे. म्हणून रामकथा ही ब्रह्मांड भेदून निश्चळ परब्रह्मापर्यंत न्यावी.

१९) एक मन आहे तेच जर स्वर लावण्यात गुंतले तर भगवंताचे चिंतन कोण करणार ? चोरांनी जबरदस्तीने वेठीला धरून सेवा करून घ्यावी,





त्याप्रमाणे देवाचे दर्शन घेताना हे रागज्ञान मध्येच आडवे येते व मनाला सुरांच्या नादाला लावते.

२०) श्वासोच्छ्‌वासी असणारे नाम सतत जपले असता देहाचा, मनाचा लय होऊन फक्त वायुरूप देवाचे – प्राणाचे नवल स्मरण होईल. नामाला स्मरणाची जोड मिळेल. या नामस्मरणाने समाधान प्राप्त होईल.

२१) नामस्मरणाचा नित्यनेम प्रात:काळी, माध्यान्हकाळी, सायंकाळी असा त्रिकाल करता करता, सर्वकाळपर्यंत वाढवावा.

२२ व २३) प्राणाचा उलट साधणे – उफराटे नाम साधणे हा अजपाजप साधला असता, पुण्याचा ध्वज ब्रह्मांडावर उभारला जाऊन आत्मप्राप्ती झाल्याने, आत्म्याशी परवत् असणारी वागणूक, हे पर्वताप्रमाणे असणारे पातक नाहीसे होते. या नामाच्या अहर्निश जपानेच वाल्या कोळ्याचा वाल्मिकी झाला व त्याने रामाच्या अवतारापूर्वीच शतकोटी रामायण – रामाच्या अवताराचे भविष्य सांगितले.

२४) या रामनामाने सेतुबंधनाचे प्रसंगी जड शिळा तर तरल्याच, पण असंख्य पापी असणाऱ्या लोकांना परमपवित्र करून – भक्त करून या भवसागरातून तारले.

२५) आपण जे जे कांही करत आहोत ते करणे बंद झाले असता, कर्तेपणाशिवाय कर्म घडले असता, कर्माला अकर्माची मोहोर बसली असता, रामनामाचा जप सुरू होतो व त्यायोगे चक्राचक्रातून अनुभवाला येणारा चक्रपाणी परमात्मा संतुष्ट होऊन, अनन्य असणाऱ्या भक्तांचा – विभक्त नसणाऱ्या भक्तांचा सांभाळ करतो.

२६) सद्‌गती प्राप्त होणेसाठी कायेने, वाचेने, मनापासून भावपूर्वक सद्‌गुरुंची चरणसेवा करणे, याला पादसेवन भक्ती म्हणतात.

२७) काया, वाचा, मन, चित्त, वित्त, जीव, प्राण हे सगळे भगवंताच्या पायी सद्भावाने अर्पण करणे ही अर्चनभक्ती.



|| ती ह्या दासबोध ||

卐 卐 卐

## त्रिगुण

चंचळ वायुरुप आत्म्याच्या ठिकाणी स्वभावत: असणाऱ्या जाणीवेमुळे संसरण – श्वसन हा संसार सुरू होतो व आत्मा संसारी होतो. **''आत्मा गुणसंगे संसारिया''** हे ज्ञानेशवचन याला प्रमाण आहे. ही जाणीव सर्वसाधारणत: सात्विक, राजस, तामस या तीन प्रकारात मोडते. जशी जाणीव असते, त्याप्रमाणे गुणवृत्ती – श्वसन असते व जसे श्वसन असते त्याप्रमाणे जाणीवेचे रूप असते. **''मनें कल्पोनि निजसत्ते । उपजवी नाना वृत्तींतें । त्याचि त्रिगुणा होती येथें । गुणविभागातें गुणवृत्तिं ।।''** हे नाथवचन येथे लक्षात घेण्याजोगे आहे. मनात येणाऱ्या त्रिविध कल्पनांमुळे आपले श्वसन – संसरण हे सुध्दा त्रिविध होते. म्हणून आपले संसरण – संसार हा त्रिगुणात्मक आहे. मनातील त्रिगुणात्मक वृत्ती नाहिशा झाल्यावर – असार भाग नाहिसा झाल्यावर, 'निर्गुण परमात्मा अनुभवाला येऊ शकतो.' हे नाथमहाराज असे सांगतात, **''संसार समस्त त्रिगुण । यांमाजी मी अवघा निर्गुण । हे तुज कळावया निजखूण । गुणनिरूपण म्यां केलें ।''** मनातील त्रिगुणात्मक वृत्ती लोप पावल्यावर, सर्व जाणीवा नाहिशा झाल्यावर, जी श्वसनाची जाणीव शिल्लक राहते, तिला गुण असे म्हणतात. ही श्वसनाचीही जाणीव नाहिशी झाली, जीवन सूक्ष्मतर सूक्ष्मतम झाले की त्याला अगुण म्हणतात. या अगुण अवस्थेत जीवन उर्ध्वगामी होऊन जीवाला सगुणब्रह्माचे नाद, बिंदू, कला, ज्योती या रूपाने वेगळेपणाने जे अनुभव महाकारणदेहात येतात व शून्यत्व पदरात येते, याला शून्यावस्था म्हणतात. **''शून्य मेहेलमें दीप बिराजे । बाजे अनुहत ढोल ।''** हे कबीरसाहेब हेच सांगतात. या सगुण ब्रह्मसाक्षात्कारानंतर मनोवृत्ती पूर्ण नाहिशी होते, हे ज्ञानेश्वर महाराज असे सांगतात, **''गगनी भासले अगणित तारे । तेथे मन मुरे वृत्तीसहित ।।''** अशा तऱ्हेने प्राणापानाच्या ठिकाणी मनाचे मनत्व नाहिसे झाले असता, परमार्थ पूर्ण होत असल्याचे दासराममहाराज असे सांगतात, **''प्राणापानामाजी मनाचे मिलन । परमार्थ पूर्ण तये ठायी ।।''** मग तो साधक





अहंकार नाहिसा होऊन, जाणीवनेणीवरहित ब्रह्मरूपच होतो. द्वैत संपूर्ण लयाला जाते. **''तैसें माझीये साक्षात्कारीं । सरे अहंकाराची वारी । अहंकारलोपीं अवधारीं । द्वैत जाय ।।''** हे ज्ञानेश्वर वचन याला दुजोरा देते.

त्रिगुणापासून निर्गुणापर्यंत जाताना त्रिगुण, गुण, अगुण, शून्य, सगुण, निर्गुण हे सहा टप्पे पार करावे लागतात हे ती. प.पू. दासराममहाराजांचे सांगणे मला जसे समजले तसे मांडले आहे. साधकाच्या या अवस्थेचे वर्णन ज्ञानेश्वरमहाराज असे करतात, **''नभांचे शून्यत्व गिळून । गुणत्रयातें नुरऊन । तें शून्य तें महाशून्य । श्रुतिवचनसंमत ।।''**

त्रिगुणाबद्दल समर्थ श्रीरामकृपेची वचने काय खुलासा करतात हे पाहू.

१) **मूळमायेचें चळण । तेंचि वायोचें लक्षण ।<br>सूक्ष्म तत्वें तींचि जाण । जडत्वा पावलीं ।।८–३–५६ ।।**

२) **ब्रह्मीं मूळमाया जाली । तिच्या पोटीं माया आली ।<br>मग ते गुणा प्रसवली । म्हणोनि गुणक्षोभिणी ।।८–४–२ ।।**

३) **वायोमध्यें जाणीव गुण । तेंचि ईश्वराचें लक्षण ।<br>तयापासून त्रिगुण । पुढें जाले ।। १०–९–११ ।।**

४) **त्रिगुण आणि पंचभूतें । हे वायोमध्यें मिश्रिते ।<br>अनुमानेना म्हणोन त्यातें । मिथ्या म्हणों नये ।। ९–८–१७ ।।**

५) **गुणाचीं रूपें जाणीव नेणीव । पहिलाच पाहावा अभिप्राव ।<br>सूक्ष्मदृष्टीं लाघव । येथून पुढें ।। २०–३–६ ।।**

६) **शुध्द नेणीव तमोगुण । शुध्द जाणीव सत्वगुण ।<br>जाणीवनेणीव रजोगुण । मिश्रित चालला ।। २०–३–७ ।।**

७) **जाणीव म्हणिजे अंत:करण । अंत:करण विष्णुचा अंश जाण ।<br>विष्णु करितो पाळण । येणें प्रकारें ।। १०–१–२६ ।।**

८) **अंत:करण म्हणिजे जाणीव । जाणीव जाणता स्वभाव ।<br>देहरक्षणाचा उपाव । जाणती कळा ।।१०–१–१२ ।।**

१) **सत्क्रिया आचरावी । असत्क्रिया त्यागावी ।**
**वाट भक्तींची धरावी । तो सत्वगुण ।। २–७–७१ ।।**

१०) **सत्वगुणें भगवद्धक्ती । सत्वगुणें ज्ञानप्राप्ती ।**
**सत्वगुणें सायोज्यमुक्ती । पाविजेते ।। २–७–८७ ।।**

११) **कांहीं जाणीव कांहीं नेणीव । हा रजोगुणाचा स्वभाव ।**
**जाणतां नेणतां जीव । जन्मास येती ।। १०–१–२८ ।।**

१२) **जाणीवेनें होतें सुख । नेणीवेनें होतें दु:ख ।**
**सुख दु:ख अवश्यक । उत्पत्तिगुणें ।।१०–१–२९ ।।**

१३) **जें जें दृष्टीं पडिलें । तें तें मनें मागितलें ।**
**लभ्य नस्तां दु:ख जालें । तो रजोगुण ।। २–५–२३ ।।**

१४) **नेणतां प्राणी संव्हारतो । नेणीव तमोगुण बोलिजेतो ।**
**तमोगुणें रुद्र संहारितो । येणें प्रकारें ।। १०–१–२७ ।।**

१५) **संसारी दु:खसंमंध । प्राप्त होतां उठे खेद ।**
**कां अद्भुत आला क्रोध । तो तमोगुण ।। २–६–२ ।।**

१६) **सत्वगुणें भगवद्भक्ती । रजोगुणें पुनरावृत्ती ।**
**तमोगुणें अधोगती । पावति प्राणी ।। २–५–२ ।।**

१७) **पुढें तिजपासाव कोण । सत्वरजतमोगुण ।**
**तमोगुणापासून निर्माण । जालीं पंचभूतें ।। ८–४–३ ।।**

१८) **पाच भूतें तीन गुण । आठ जालीं दोनी मिळोन ।**
**म्हणोनि अष्टधा प्रकृति जाण । बोलिजेते । ११–१–७ ।।**

१९) **पंचभूतें आणि त्रिगुण । ऐसी अष्टधा प्रकृति जाण ।**
**अष्टधा प्रकृतीस नामाभिधान । दृश्य ऐसें ।। ६–२–१४ ।।**

२०) **निश्चळामध्यें चंचळ । तेचि कल्पना केवळ ।**
**अष्टधा प्रकृतीचें मूळ । कल्पनारूप ।। ११–१–५ ।।**





२१) **पंचभूतिक हे माया । माईक जाय विलया ।**
**पिंड–ब्रह्मांड अष्टकाया । नासिवंत ।। १२–३–११ ।।**

२२) **पृथ्वीचें मूळ जीवन । जीवनाचें मूळ दहन ।**
**दहनाचें मूळ पवन । थोराहून थोर ।। १६–४–३० ।।**

२३) **आतां ऐका पवनाचें मूळ । तो हा अंतरात्माचि केवळ ।**
**अत्यंतचि चंचळ । सकळांमध्यें ।। १६–७–२ ।।**

२४) **जें जें जेथें निर्माण होतें । तें तें तेथें लया जातें ।**
**येणें रितीं पंचभूतें । नाश पावतीं ।। १५–४–२२ ।।**

२५) **जडाचें मूळ तें चंचळ । चंचळाचें मूळ तें निश्चळ ।**
**निश्चळासी नाहीं मूळ । बरें पाहा ।।१५–४–२५ ।।**

**– भावार्थ –**

१) निश्चळ ब्रह्माचे ठिकाणी कल्पनेने झालेली हालचाल – मूळमायेचे चळण हे वायूचे द्योतक आहे. या वायूतील सूक्ष्म तत्वेच पुढे स्थूलरूप धारण करतात.

२) ब्रह्मापासून मूळमाया झाली, तिच्या पोटी माया जन्मास आली. मग मायेने गुणाला जन्म दिला, म्हणून तिला गुणक्षोभिणी म्हणतात.

३) वायूपाशी असणाऱ्या जाणीवेला गुण म्हणतात. तेच ईश्वराचे स्वरूप आहे. या गुणांपासूनच पुढे सत्वरजतम हे त्रिगुण निर्माण झाले.

४) तीन गुण आणि पंचमहाभूते ही अशी आठ तत्वे वायूमध्ये – प्रकृतीमध्ये मिसळलेली असतात. बाह्यत: पाहिले असता हे तीन गुण व पंचमहाभूते आपल्या जीवनात – श्वासातच असतात. तसे वाटत नाही – सहज अनुभवता येत नाही, म्हणून त्याला खोटे म्हणू नये.

५) जाणीव व नेणीव या रूपानेच त्रिगुण व्यक्त होतात, हा विचार आरंभीच करावा. सूक्ष्म दृष्टीने पाहण्याची मजा येथून पुढे काही वेगळीच आहे.

६) शुध्द नेणीव – अज्ञान हे तमोगुणाचे रूप असून, शुध्द जाणीव – ज्ञान हे सत्वगुणाचे रूप, तर जाणीव नेणीव मिश्रित – ज्ञान अज्ञान मिश्रित रजोगुणाचे रूप आहे.

७) अंत:करण – जाणीव – सत्वगुण हा विष्णूचा अंश असून जाणीवरूपाने विष्णू सकळांचे रक्षण करतो.

८) जाणत्याच्या ठिकाणी स्वभावत: असणारी जाण – समज म्हणजेच जाणीव – अंत:करण होय. ज्यायोगे प्राण्याला देहरक्षणाचा उपाय समजतो.

९) असत् जे आहे ते दाखविणारी हेतूपूर्वक क्रिया – असत्क्रिया त्यागून, सत्स्वरूपाला दाखविणारी क्रिया – सत्क्रिया – निर्हेतूक क्रिया आचरणे हा परमात्मरूप होण्याचा मार्ग – भक्तिमार्ग क्रमण करणे, हाच सत्वगुण.

१०) सत्वगुणानेच भगवद्भक्ती घडून आत्मज्ञानाची प्राप्ती होते व सायुज्यमुक्ती प्राप्त होते.

११) जाणीव किंवा नेणीव परब्रह्माचे ठिकाणी असत नाही. काही जाणीव व काही नेणीव हे रजोगुणाचे लक्षण आहे. ही जाणीव व नेणीव नाहिशी झाली की जीव हा परब्रह्मरूपच होतो व जर ही जाणीव व नेणीव नाहिशी झाली नाही तर जन्म हा अटळ आहे, अर्थात मरणही अटळ आहे.

१२) थोडी जाणीव व थोडी नेणीव हे रजोगुणाचे लक्षण आहे. म्हणून रजोगुणाचे ठिकाणी थोड्या जाणीवेने होणारे थोडे सुख व थोड्या जाणीवेने होणारे थोडे दु:ख अटळ आहे. पापपुण्य, स्वर्गनरक, ज्ञानअज्ञान, सुखदु:ख, जन्ममरण ही सारी द्वंद्वे रजोगुणाचे ठिकाणी आढळतात.

१३) जे जे चांगले दिसेल, ते ते सारे मनाला हवेहवेसे वाटते व ते प्राप्त झाले नाही की दु:ख होते, हे रजोगुणाचे लक्षण.





१४) अज्ञान हे नाशाचे कारण आहे. या अज्ञानाला – नेणीवेला तमोगुण असे म्हणतात. अशाप्रकारे रुद्र तमोगुणाचे योगाने संहार करतो.

१५) संसारातील दु:खामुळे चित्तास उद्विग्नता प्राप्त होणे किंवा परमावधीचा राग येणे म्हणजे तमोगुण.

१६) सत्वगुणाचेयोगे भगवंताची भक्ती उत्पन्न होते, रजोगुणामुळे जन्ममरणाचे फेरे फिरावे लागतात, तर तमोगुणामुळे जीवाला अधोगती प्राप्त होते.

१७) त्या गुणापासून पुढे सत्वरजतम हे त्रिगुण निर्माण झाले व तमोगुणापासून पुढे पंचमहाभूते निर्माण झाली.

१८ व १९) पंचमहाभूते व तीन गुण मिळून आठ तत्वे होतात. यासाठी तिला अष्टधाप्रकृती म्हणतात. या अष्टधाप्रकृतीलाच दृश्य असे म्हणतात.

२०) निश्चळ परब्रह्माचे ठिकाणी कल्पना हे चंचळत्व निर्माण झाले – मूळमाया निर्माण झाली व त्यातून पुढे अष्टधाप्रकृती निर्माण झाली, म्हणजे अष्टधाप्रकृतीचे मूळ हे मुळी कल्पनेतच आहे.

२१) मायेचा पसारा पंचमहाभूतानी भरलेला आहे, तो नाशिवंत आहे. या दृष्टीने पिंड व ब्रह्मांडातील आठही देह हे सारे नाशिवंतच आहेत.

२२) पृथ्वीचे मूळ आप, आपाचे मूळ अग्नी, तर अग्नीचे मूळ वायू आहे, जो सर्वश्रेष्ठ आहे.

२३) सगळ्यांमध्ये अत्यंत चंचळ असा अंतरात्माच पवनाचे मूळ आहे.

२४) जे जे ज्याच्यापासून निर्माण होते, ते ते अखेर त्याच्यामध्येच लयास जाते. याच नियमाने पंचमहाभूतांचा निरास होतो.

२५) जडाचे मूळ चंचळ अंतरात्मा असून, चंचळ आत्म्याचे मूळ निश्चळ परब्रह्म आहे. निश्चळ परब्रह्म हे अनादि आहे हे लक्षात घ्या.

卐 卐 卐

## साधक

वासना नाहिशी करणारे साधन जो कोणी करतो, तो साधक. ही वासना ज्या मनामध्ये आहे ते मन शांत करणारे साधन जो साधतो, तो साधक. साधकाची अवस्था कशी असावी ते तुकाराममहाराज असे सांगतात,

**''साधकाची दशा उदास असावी । उपाधी नसावी अंतर्बाही ।।१ ।।**
**लोलुप्यता काय निद्रेते जिणावे । भोजन करावे परमीत ।।२ ।।**
**एकांती लोकांती स्त्रियांसी भाषण । प्राण गेल्या जाण करू नये ।।३ ।।**
**तुका म्हणे ऐशा साधनी जो राहे । तोचि ज्ञान लाहे गुरुकृपे ।।४ ।।''**

तर मामामहाराज केळकर साधकाचे वर्णन असे करतात,

**''ऐका साधकाची दशा । जेणे भेटी होय ईशा ।।१ ।।**
**करुनि नामाचे मंथन । हृदयी प्रगटवी नारायण ।।२ ।।**
**नियम शुध्द आचरण । राहे देही उदासीन ।।३ ।।**
**दास म्हणे त्याची ख्याती । देव वाढवी श्रीपती ।।४ ।।''**

'साधकाची दशा उदास असावी' याचा नेमका अर्थ काय आहे ? उदास=उत्+आस, उत्कर्षाची आस असणारा उदास असे ती.प.पू. दासराममहाराज सांगत. तर ज्याची आस–इच्छा नाहिशी झाली आहे तो उदास, हे तुकाराम महाराज असे सांगतात ''आम्ही तरी आस । झालो टाकोनी उदास''

समर्थ श्रीरामकृपेची वचने साधकाबद्दल काय सांगतात ते आता पाहू.

**१) असत्क्रिया ते सोडिली । आणि सत्क्रिया ते वाढविली ।**
**स्वरूपस्थिती बळावली । या नांव साधक ।।५–९–१३ ।।**

**२) प्रत्यक्ष माया अलक्ष करी । अलक्ष वस्तु लक्षी अंतरीं ।**
**आत्मस्थितीची धारणा धरी । या नांव साधक ।।५–९–१६ ।।**





**३) मीपण मागें सांडिलें । स्वयें आपणास धुंडिलें ।**
**तुर्येसही वोलांडिलें । या नांव साधक ।।५–९–२६ ।।**

**४) पुढें उन्मनीचे सेवटीं । आपली आपणा अखंड भेटी ।**
**अखंड अनुभवीं ज्याची दृष्टी । या नांव साधक ।।५–९–२७ ।।**

**५) द्वैताचा तटका तोडिला । भासाचा भास मोडिला ।**
**देहीं असोनि विदेह झाला । या नांव साधक ।।५–९–२८ ।।**

**६) जयास अखंड स्वरूपस्थिती । नाहीं देहाची अहंकृती ।**
**सकळ संदेहनिवृत्ती । या नांव साधक ।।५–९–२९ ।।**

**७) पंच महाभूतांचा विस्तार । जयासि वाटे स्वप्नाकार ।**
**निर्गुणीं जयाचा निर्धार । या नांव साधक ।।५–९–३० ।।**

**– भावार्थ –**

१) असत् जे आहे ते दाखविणारी हेतुपूर्वक क्रिया त्यागून सत्स्वरूपाला दाखविणारी निर्हेतूक क्रिया आचरणे ज्याने वाढविले, आत्म्याशी तदाकार होण्याची स्थिती दिवसेंदिवस ज्याची झपाट्याने वाढत चालली, तो साधक.

२) अंतरात असणारी अलक्ष आत्मवस्तू लक्ष झाल्याने प्रत्यक्ष दिसणाऱ्या– लक्ष असणाऱ्या मायेत अलक्ष होते व 'मी आत्मरूप आहे' हे ज्याचे ठिकाणी ठसते, तो साधक.

३) सर्वसाक्षी मनाचे उन्मन झाल्याने तुर्येतील ज्ञानाचे विज्ञान होऊन, ज्याचा अहंकार नाहिसा झाला आहे – ज्यांचा खोटा मीपणा नाहिसा झाला आहे व खऱ्या 'मी चा' शोध लागला आहे, तो साधक.

४) पुढे शेवटी उन्मनी अवस्थेत आत्मस्वरूपाचे ज्ञान – आत्मज्ञान जो सतत अनुभवतो, तो साधक.

५) ज्याच्या दृष्टीला सृष्टी येतच नाही – ज्याला आकार दिसत नाही, ज्याचेजवळ द्वैत औषधालाही शिल्लक नाही, विश्वाचा आभास नाहिसा होऊन सत्य ब्रह्माचा ज्याला अनुभव येतो, जो देही असून पूर्ण विदेही झालेला असतो, तो साधक.

६) अंत:करणातील सर्व संशय दूर होऊन ज्याचे अखंड स्वरूपाशी तादात्म्य झाले आहे, ज्याला देहाची आठवणही होत नाही, तो साधक.

७) पंचमहाभूतांची भूतसृष्टी ही ज्याला स्वप्नवत वाटते, ज्याचा विश्वास त्यामागे दडलेल्या – लपलेल्या सत्य निर्गुण परब्रह्मावर असतो, तो साधक.

卐 卐 卐

## परमार्थ

प्रपंच हा शब्द निरनिराळ्या अर्थांनी व्यवहारात वापरला जातो. समर्थांनी दासबोधात तो कोणत्या अर्थांनी वापरला आहे हे नीटसे समजले पाहिजे. ते समजल्याशिवाय समर्थांचा समर्थ परमार्थ समजणे अवघड आहे.

'प्रपंच' या शब्दाचा अर्थ सर्वसाधारणत: 'घरदार, बायका मुले यांचेकरिता करावी लागणारी यातायात – प्रयत्न' असा घेतला जातो. हा प्रपंचाचा मर्यादित अर्थ ध्यानी घेऊन जर दासबोधातील ओव्यांचा अर्थ केला तर अनर्थच ओढवेल. 'हे विश्वचि माझे घर' ही ज्ञानेशोक्ती आचरणारे समर्थ, 'चिंता करितो विश्वाची' असे म्हणणारे समर्थ, या अर्थांनी प्रपंचाकडे पाहत असतील असे वाटत नाही. हा अर्थ ध्यानी घेऊन जर दासबोधातील ओव्यांचा अर्थ केला, तर त्याची सत्यता व्यवहारात अनुभवता येत नाही.

आता ''**प्रपंची जो सावधान । तोचि परमार्थ करील जाण**'' या ओवीचा अर्थ हा प्रपंच ध्यानी घेऊन जर केला तर त्याची सत्यता व्यवहारात अनुभवता येते का ? सर्वसामान्य माणूस उपरोक्त प्रपंचात सावधपणे वागतोच की, पण तो परमार्थ करतोच असे नाही. किंबहुना ज्याचा हा प्रपंच ठिकठाक आहे, त्याला परमार्थाची आठवणही होत नाही, असेच सर्वसामान्यत: आढळते. संपन्न परमार्थी संतांची उदाहरणे मोजकीच. याउलट जो या प्रपंचाशी प्रामाणिक नाही त्याचा परमार्थ खोटा आहे हे समर्थ याच ओवीत पुढे असे सांगतात, ''**प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ।**'' शेकडा ९५ संतांचे प्रपंचाकडे दुर्लक्ष होते, मग त्यांचा परमार्थ खोटा म्हणता येईल का ?

समर्थांनी आधी प्रपंच सावधपणे नेटका करावा म्हणून सांगितले आणि नंतर त्याचा वैराग्याने त्याग करावा असेही सांगितले. मग त्यागच करायचा होता, तर तो नेटका, सावधपणे करावयास का सांगितले ? समजा आम्ही या प्रपंचाचा त्याग केला, आम्ही हे सर्व सोडून वनात गेलो, तर परमार्थ घडेल याची खात्री आहे का?





वनात जाऊन जर वनितेचे चिंतन घडले, तर तो त्याग होईल का ?

संतांची चरित्रे पाहिली असता या प्रपंचाचा त्याग बहुतांशी संतांनी केल्याचे आढळत नाही. मग त्यांचा परमार्थ खोटा होता का ? अविवाहितांना हा प्रपंच नसतो ना ? मग त्यांचा परमार्थ होतो का ? का होत नाही ? या साऱ्या गोष्टींचा विचार करून प्रपंच नेमका कोणता समर्थांना अपेक्षित असावा हे ठरविले पाहिजे, समर्थांनी सावधपणे करावयास सांगितलेला प्रपंच किंवा ज्या प्रपंचाचा वैराग्याने त्याग करावयास सांगितले आहे, तो प्रपंच आम्ही समजतो तो नाही हे निश्चित.

प्रपंच म्हणजे नेमके काय हे समर्थ असे सांगितात, ''**प्रपंच पडदा पडली झापड । राम दिसेना डोळा रे ।।**'' ज्यायोगे रामदर्शन होत नाही असा आपण व आत्माराम यांचेमध्ये आलेला पडदा – अडसर म्हणजे हा प्रपंच आहे. कोणता अडसर – पडदा आहे हा? कल्पनेचा पडदा आहे हा. कल्पना सरल्याशिवाय सत्य कधी हाताला येईल का ? कल्पना नव्हे ते सत्य, हे तरी सत्य आहे का नाही? आम्ही सत्याची कल्पना करतो, अशाने सत्य – परब्रह्म कधी हाताला येईल का ? देव हा सत्य असताना काल्पनिक देवाची कल्पनेने पूजा केली असता हाताला कल्पनाच येणार, सत्य हाताला येणार नाही. समर्थ म्हणतात,

**कल्पनेच्या देवा कल्पनेची पूजा । तेथे कोणी दूजा आढळेना ।।१ ।।**
**आढळेना देव आढळेना भक्त । कल्पनेरहित काय आहे ।।२ ।।**
**आहे तैसा आहे कल्पना न साहे । दास म्हणे पाहे अनुभवे ।।३ ।।**

जोवर आम्ही या कल्पनांना कुरवाळत बसलो आहोत तोवर देवदर्शन होणार नाही हे निश्चित. अनुभव आला की कल्पना नाहिशा होतात व कल्पना नाहिशी झाली की देवाचा अनुभव येतो. निवृत्तीनाथ महाराज म्हणतात, ''**कल्पना काजळी कल्पिले कवळी । कैसेनी जवळी देव होय ।।**'' कल्पनेचा निरास झाल्याशिवाय आत्मवस्तूची ओळख होत नाही हेच '**वस्तु ते ओळखा । सांडा रे कल्पना ।**' ही तुकोक्ती स्पष्ट करते.

अंत:करणातील कल्पना नाहिशी होणे हा खरा प्रपंचाचा त्याग आहे, संन्यास आहे. कल्पना नाहिशी झाली असता परमात्म्याचा योग घडतो व संन्यासही घडतो. या अर्थाने परमात्म्याचा योग व संन्यास हे दोन्ही एकरूपच आहेत. **''म्हणोनि कल्पना जैं सांडे । तैंचि गा संन्यासु घडे । या कारणें दोनी सांगडे । संन्यासयोगु ।।''** हे ज्ञानेशवचन याला प्रमाण आहे. आमच्या अंत:करणात निरनिराळ्या कल्पना आहेत म्हणून ही भूतसृष्टी भासमान होत आहे. अंत:करणातील कल्पना नाहिशी झाली असता, निर्विकल्प अवस्थेत, विश्वाचा आभास नाहिसा होऊन विश्वरूप परमात्म्याचे दर्शन झाल्याशिवाय राहणार नाही. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, **''तैसे भूतजात माझ्या ठायीं । कल्पिजे तरी आभासे काही । निर्विकल्पीं तरी नाहीं । तेथे मीचि मी आघवें ।।''**

मी एक कुणीतरी आहे ही एक मुळात कल्पना आहे. या कल्पनेला जे जे काही चिकटते, ते सारे काल्पनिकच की. तो सारा प्रपंच आहे. समर्थ म्हणतात, **''आपण कल्पिले मीपण । मीपण शोधिता नुरे जाण ।।''** हा काल्पनिक 'मी' व त्याला चिकटलेले 'माझे' हा सारा प्रपंच. अंत:करणात मी व माझे याचीच आठवण असणे हा प्रपंच व 'मी व माझे' याची अंत:करणात आठवणच नसणे हा संन्यास.

ही पंचमहाभूतांची सृष्टी – दृश्य हे सुध्दा काल्पनिकच आहे. या अष्टधा प्रकृतीचे मूळच मुळात काल्पनिक आहे. समर्थ म्हणतात, **''निश्चळामध्ये चंचळ । तेचि कल्पना केवळ । अष्टधा प्रकृतीचे मूळ । कल्पनारूप ।।''** व याचा शेवटही कल्पनेतच होणारा आहे. मग ज्याच्या आरंभी कल्पना व शेवटी कल्पना मग मध्ये काय असणार ? कल्पनाच ना? हा सारा प्रपंच आहे. ''कल्पना विस्तार हाच खरा प्रपंच असून मध्यवर्ती कल्पना हा परमार्थ आहे.'' हे दासराममहाराजांचे सांगणे येथे लक्षात घेणेजोगे आहे. कल्पना नाहिशा होऊन डोळ्यातील दृश्य गेल्याशिवाय देव दिसणार नाही हे निश्चित.





कल्पना करणे हा मनाचा धर्म आहे. अर्थात मन आहे तोवर प्रपंच आहे. मन मुरल्यावर जे काही उरते, त्याचा अनुभव घ्यायचा आहे व तोच परमार्थ आहे. मनाचे उन्मन फक्त रामकृष्ण नामाने – रामकृष्ण या जीवनाचे गतीत असणाऱ्या नामाने होऊ शकते. **''रामकृष्णनामी उन्मनी साधली । तयास लाधली सकळ सिध्दी ।।''** हे ज्ञानेशवचन याला प्रमाण आहे.

या मनाचा व श्वसनाचा घनिष्ठ संबंध आहे. मन व श्वसन हे परस्परावलंबी आहेत. मन स्थिर झाले की श्वसन स्थिर होते व श्वसन स्थिर झाले की मन स्थिर होते. म्हणून श्वसन स्थिर होणे महत्वाचे. श्वसनाची गती सूक्ष्मतर सूक्ष्मतम झाल्याने मनाची चंचळता नाहिशी होते व मन स्थिर होते. मन मनपणाला मुकते. **''विषय ते मनाआधीन । मन पवनाशी वश्य जाण ।अभ्यासे वश केला पवन । सहजे मन स्थिरावे ।।''**– नाथमहाराज व **''बळिये इंद्रिये येती मना। मन एकवटे पवना। पवनु सहजें गगना मिळोंची लागे।।''** – ज्ञानेश्वरमहाराज, ही संतवचने यावर प्रकाश टाकतात.

आपल्या मनात निरनिराळ्या षड्‌विकारात्मक कल्पना निर्माण होतात व त्यायोगे श्वसनाची मूळ गती बदलते किंवा श्वसनाची मूळ गती बदलते व मगच विकार निर्माण होतात. श्वसनगती संथ राहिली असता रागवता येत नाही. षड्‌विकारात्मक कल्पनांनी मूळच्या श्वसनगतीत बदल होणे हा प्रपंच. किंबहुना मूळच्या श्वसनगतीत बदल होऊन षड्‌विकार निर्माण होणे हा प्रपंच. दिननिशी या जीवनाचे गतीत होणारे षड्‌विकारात्मक आयास हाच प्रपंच आहे हे ज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, **''सायास करीसी प्रपंच दिननिशी ।।''** तर आपली मूळस्थिती – सहजस्थिती – राखणे हाच परमार्थ. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात,

**''ऐशिया आपुलियाची सहजस्थिती । जया ब्रह्माची नित्यता असती ।**
**तया नाव सुभद्रापती । अध्यात्म गा ।।''**

या अर्थांनी समर्थ श्रीरामकृपेची वचने आपणास काय बोध करतात हे आता पाहू.

**१) प्रपंचीं जो सावधान । तोचि परमार्थ करील जाण ।**
**प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थीं खोटा ।।१२-१-९ ।।**

**२) आधीं प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थ विवेका ।**
**येथें आळस करूं नका । विवेकी हो ।।१२-१-१ ।।**

**३) प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणें तुम्ही कष्टी व्हाल ।**
**प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुम्हीं विवेकी ।।१२-२-२ ।।**

**४) प्रपंच अथवा परमार्थ । जाणतां तोचि समर्थ ।**
**नेणता जाणिजे व्यर्थ । निःकारण ।। ९-४-१९ ।।**

**५) प्रपंच अथवा परमार्थ । प्रचीतीविण अवघें व्यर्थ ।**
**प्रत्ययज्ञानी तो समर्थ । सकळांमध्यें ।।२०-३-२८ ।।**

**६) प्रपंची पाहिजे सुवर्ण । परमार्थी पंचीकरण ।**
**महावाक्यांचे विवरण । करितां सुटे ।।११-३-२९ ।।**

**७) वैराग्यें करावा त्याग । तरीच परमार्थयोग ।**
**प्रपंचत्यागें सर्व सांग । परमार्थ घडे ।।१२-७-९ ।।**

**८) वैराग्यापरतें नाहीं भाग्य । वैराग्य नाहीं तें अभाग्य ।**
**वैराग्य नसतां योग्य । परमार्थ नव्हे ।।१२-७-१७ ।।**

**९) रात्रंदिवस पाहावा अर्थ । अर्थ पाहेल तो समर्थ ।**
**परलोकींचा निजस्वार्थ । तेथेंचि घडे ।।२०-३-२९ ।।**

**१०) आतां स्तऊं हा परमार्थ । जो साधकांचा निजस्वार्थ ।**
**नातरी समर्थांमध्ये समर्थ । योग हा ।।१-९-१ ।।**

**११) अपूर्वता या परमार्थाची । वार्ता नाहीं जन्ममृत्युची ।।**
**आणि पदवी सायोज्यतेची । सन्निधचि लाभे ।।१-९-१३ ।।**





**१२) आकाशमार्गी गुप्त पंथ । जाणती योगिये समर्थ ।**
**इतरांस हा गुह्यार्थ । सहसा न कळे ।।१-९-५ ।।**

**१३) परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाहीं तो भिकारी ।**
**या परमार्थाची सरी । कोणांस द्यावी ।।१-९-२३ ।।**

**१४) आहे तरी परम सुगम । परी जनासी जाला दुर्गम ।**
**कां जयाचें चुकले वर्म ।सत्समागमाकडे ।।१-९-२ ।।**

**- भावार्थ -**

१) प्राणवृत्ती – श्वसन वैषयिक झाल्याने षड्विकारात्मक आयास होणे किंवा षड्विकार निर्माण झाल्याने श्वसनगतीत बदल होणे हा प्रपंच. जो या ठिकाणी अवधान ठेवून आपली श्वसनाची मूळगती बदलणार नाही – आपली सहजस्थिती ढळणार नाही हे पाहतो तो 'प्रपंची सावधान'. तो षड्विकाराचे पलिकडे जातो – त्रिगुणाचे पैल जातो व त्यालाच जीवन उर्ध्वगामी होणे हा परमार्थ साधतो. तर ज्याच्या प्राणवृत्ती – श्वसन वैषयिक आहेत – ज्याचा निःश्वास अप्रमाण खाली येतो आहे, तो 'प्रपंची अप्रमाण' आहे. त्याचा परमार्थ खोटा आहे. त्याला अजून परमार्थ साधलेला नाही.

२) आधी श्वसन – प्रपंच प्रमाणबध्द – नेटके कसे होईल ते पहावे मग विवेकाने परमार्थ साधेल. याकरता हे विवेकी हो, आळस करू नका.

३) एकदम प्रपंचाचा त्याग होणे – कल्पनेचा निरास होणे हे तसे अवघड आहे. म्हणून एकदम प्रपंचाचा त्याग करून जर परमार्थ कराल , तर कष्टच पदरात येतील. भडक वैराग्य हे कामाचे नाही. प्रपंच साधून परमार्थ कराल, तरच भलेपणा मिळून विवेकी – शहाणे ठराल.

४) प्रपंच काय किंवा परमार्थ काय, तो जाणून व्हावा लागतो. जो जाणणारा आहे – जाणता आहे, तोच समर्थ आहे. जो हा जाणणारा – समर्थ जाणत नाही, त्याचे आयुष्य विनाकारण व्यर्थ जाते.

५) प्रपंच असो अथवा परमार्थ असो, प्रचितीशिवाय सारे काही फुकट आहे. स्वानुभवाने ज्ञानसंपन्न झालेल्या पुरुषाला समर्थ म्हणून सारे ओळखतात.

६) प्रपंचातही व परमार्थातही तत्वमसीच महत्वाची. प्रपंचात सुवर्ण ही तत्वमसी तर परमार्थात पंचीकरण ही तत्वमसी. तत्वमसी – 'तत् त्वम् असि' या महावाक्याचा खरा अर्थ समजला की तो ज्ञानी मुक्तच होऊन जातो.

७) विषयांचा मनापासून त्याग घडला – वैराग्याने विषयांचा त्याग घडला, तरच जीवन निर्विषय होऊन – निर्हेतूक सत्क्रिया आचरून, समर्थामध्ये समर्थ योग असा परमार्थयोग साधेल. वैराग्याने प्रपंचाचा त्याग घडल्याशिवाय यथासांग परमार्थ घडणार नाही.

८) वैराग्य नसेल तर योग्य परमार्थ घडणार नाही, हेच मोठे दुर्भाग्य आहे. म्हणून वैराग्यासारखे श्रेष्ठ भाग्य नाही.

९) रात्रंदिवस – अहर्निशी जो अर्थाकडे – ध्येयाकडे लक्ष देईल – अहर्निशी परमार्थ साधेल, तो अर्थरूप, ध्येयरूप होईल, समर्थ होईल. त्यालाच आत्मदर्शनाने आत्मज्ञानाचा निजस्वार्थ साधेल.

१०) रात्रंदिवस अर्थ पाहणे – रात्रंदिवस आत्मरूप अनुभवणे हा परमार्थ साधणे, हा साधकाचा निजस्वार्थ असून, तो सर्व योगांमध्ये श्रेष्ठ असा योग आहे. अशा परमार्थाचे गुणवर्णन आता करुया.

११) पश्चिम दिशेला – जीवन अंतर्मुख झाल्यावर – जीवन उर्ध्वगामी झाल्यावर प्राप्त होणारा परमार्थ, म्हणून तो अपूर्वच आहे – पूर्वी कधीही न अनुभवलेला अनुभव आहे. स्वरूपाकार झाल्यावर, सायुज्यपद आपलेजवळच प्राप्त झाल्यावर, जन्ममरण कुठले राहणार?





१२) ज्ञानप्राप्तीचा हा गुप्त मार्ग – पश्चिमेची वाट, आकाशातून – महाकारणदेहातून जाणारी असून, जीवन अंतर्मुख झाल्यावर सापडणारी आहे. परमश्रेष्ठ योग्यांना हा मार्ग माहित असतो, इतरांना तो सहसा उमगत नाही.

१३) आकाशमार्गातील गुप्त पंथ ज्याला सापडला – अद्वैताची वाट ज्याला सापडली, तो परमार्थी राज्यधारी. ज्याला हे साधले नाही, तो कितीही श्रीमंत असो, भिकारीच. अशा परमार्थाची बरोबरी कोणाशी होईल का?

१४) सत्संगतीत जर परमार्थातील वर्म सापडले तर तो सोपा आहे. वर्माअभावी लोकांना मात्र तो अवघडच आहे.

卐 卐 卐

## तुरिया

जोवर आपणाला जागृती, स्वप्न, सुषुप्ती या त्रिविध अज्ञानात्मक अवस्था अचूक प्राप्त होत आहेत, आपले जीवन जोवर त्रिभागलेले आहे, तोवर आपण त्रिगुणातच घुटमळत आहोत हे ओळखावे. अहो, आम्हाला क्षणात झोप लागते, क्षणात जागृती प्राप्त होते, क्षणात स्वप्ने पाहतो, आम्हांला तुरिया अवस्था कशी प्राप्त होईल ? उन्मनी तर दूरच राहिली. आमच्या या अवस्थेचे वर्णन नाथमहाराज असे करतात,

**''क्षणां जागृती क्षणां सुषुप्ती । क्षणैक स्वप्नांची प्रतीती ।**
**हे त्रिगुणांची मिश्रित वृत्ती । जाण निश्चितीं उध्दवा ।।''**

आपले हे त्रिविध झालेले जीवन एकविध होणेकरिता करावी लागणारी खटपट म्हणजे साधन, असे चिमडचे नारायणमहाराज सांगत. साधनाने त्रिविध झालेले जीवन एकविध होणे, त्रिगुणांचा निरास होणे हे साधल्याशिवाय महाकारणदेहात प्रवेश नाही अर्थात तुरीयेची प्राप्ती नाही हे निश्चित.

जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांना प्रकाशित करणारी चौथी ज्ञानात्मक अवस्था म्हणून तिला 'तुरीय' म्हणतात. नाथमहाराज तुरीयेचे वर्णन असे करतात,

**''जागृति स्वप्न सुषुप्ती । तिन्हीं अवस्थांते प्रकाशिती ।**
**यालागीं ते चौथी । तुरीय म्हणती सज्ञान ।।**
**जे जागृतीतें जागवित । जे स्वप्नीं स्वप्नातें नांदवित ।**
**जे सुषुप्तीते निजवीत । त्यातें तुरीय म्हणती उध्दवा ।।''**

तर मुकुंदराज तुरीयेला असे वर्णितात,

**''तिहीं अवस्थांचे जाणपण । तियेशी तुर्या अवस्था ऐसी खूण ।**
**तिही देहांचे अवलोकन । ते महाकारण देह ।।''**





**''त्रिविध देहे त्रिविध अवस्था । त्रिविध स्थाने त्रिविध भोग त्रिविध भोक्ता ।**
**येया प्रपंचाते तत्साक्षित्वे जाणौनी वेवस्था । ते तुरीया जाणावी ।।''**

ब्रह्मच या तिन्ही अवस्थात साक्षीभूत होऊन राहते किंबहुना ब्रह्मावरच ही अवस्था भासमान होते. ब्रह्मज्ञानाबरोबर अवस्था नाहिशी होऊन तो साधक अविनाशी ब्रह्मस्वरूपच होऊन जातो.

**''वस्तुवरी अवस्था भासे । भासली अवस्था सवेंची नासे ।**
**त्या नाशामाजी वस्तू न नासे । उरे अविनाशें तुरीय ।।''**

हे नाथवचन याला प्रमाण आहे. या तुर्याअवस्थेतच संतमहात्मे सतत असतात. या तुर्याअवस्थेतच मनाचे उन्मन होऊन ते अविनाशी ब्रह्मस्वरूप होतात.

**''तुर्येमध्ये माझा अखंड रहिवास। निवृत्ती म्हणे अविनाश तुर्या करी ।।''** हे निवृत्तीवचन व **''तुरीयेचे अंतरी मनाचे उन्मन । बोलियेले ज्ञानदेव सत्य''** हे ज्ञानेशवचन, ही संतवचने हे स्पष्ट करणारी आहेत. समर्थ श्रीरामकृपेची वचने या तुरीयेबद्दल काय सांगतात हे आता पाहू.

१) **तुर्या जाणावी स्मरण । सुषुप्ति जाणावी विस्मरण ।**
**उभयतां शरीरीं जाण । वर्तती आता ।।१५-७-४२ ।।**

२) **जे महापुरुषाची भार्या । अति सलग्न अवस्था तुर्या ।**
**जयेकरितां महत्कार्या । प्रवर्तले साधु ।।१-३-४ ।।**

३) **जाणे ब्रह्म जाणे माया । ते येक जाणावी तुर्या ।**
**सर्व जाणे म्हणोनिया । सर्वसाक्षिणी ।।७-५-५ ।।**

४) **जाणे ब्रह्म जाणे माया । जाणे अनुभवाच्या ठाया ।**
**ते येक जाणावी तुर्या । सर्वसाक्षिणी ।।७-४-४९ ।।**

५) **सर्वसाक्षिणी अवस्था तुर्या । ज्ञान ऐसें म्हणती तया ।**
**परि तें जाणिजे वायां । पदार्थज्ञान ।।५-६-६ ।।**

**६) येक तुर्येचें लक्षण । जेथें सर्व जाणपण ।**
**सर्वचि नाहीं तें कवण । जाणेल गा ।।७–५–६ ।।**

**७) जेथें सर्वचि नाहीं ठाईंचें । तेथें सर्वसाक्षित्व कैंचें ।**
**म्हणौनि शुध्द ज्ञान तुर्येचें । मानूंचि नये ।। ५–६–८ ।।**

**८) ज्ञान म्हणजें अद्‌वैत । तुर्या प्रत्यक्ष द्वैत ।**
**म्हणौनि शुध्द ज्ञान तें सतत । वेगळेंचि असे ।।५–६–९ ।।**

**९) म्हणोनि सर्वसाक्षी मन । तेंचि जालिया उन्मन ।।**
**मग तुर्यारूप ज्ञान । तें मावळोन गेलें ।।७–५–११ ।।**

## – भावार्थ –

१) महाकारण देहात तुर्या ही ज्ञानात्मक स्मरणरूप अवस्था, तर कारण देहात सुषुप्ती ही अज्ञानात्मक विस्मरणरूप अवस्था कार्यरत असते.

२) मूळमायेच्या ठिकाणी असणारी वायुरूप प्रकृती – शारदा, ही त्या ठिकाणी असणाऱ्या जाणीवेची – पुरुषाची – गणेशाची भार्या आहे. तुर्यावस्थेला ती फार जवळची आहे. तिच्या सत्तेने साधु, सत्पुरुष हे श्रेष्ठ कार्य करण्यास प्रवृत्त झाले.

३ ते ५) तुर्यावस्थेत ब्रह्माचेही ज्ञान व मायेचेही ज्ञान असते. सर्व जाणते म्हणून तिला सर्वसाक्षिणी असे संबोधतात. साक्षित्वाने – वेगळेपणाने जे ब्रह्माचे अनुभव येतात, ते याच अवस्थेमध्ये. जागृती, स्वप्न, सुषुप्ती अशा तिन्ही अवस्थास जाणणारी चौथी महाकारण देहाची अवस्था 'तुर्या' तिला ज्ञान असेही म्हणतात. पण ते पदार्थज्ञान होय. तेही मिथ्याच.

६) सर्व जाणणे हे तुर्येचे लक्षण आहे. पण आहे ते सर्व ब्रह्मच आहे, तर येथे कोणी कोणाला जाणायचे ?





७) मुळात जड (दृश्य) असे काही नसून, सर्व चैतन्यरूप आहे. सर्वत्र परमात्मा भरून राहिला आहे. मग साक्षित्व कसले ? (साक्षित्व असायला दृश्य व द्रष्टा असा भेद असावा लागतो.) म्हणून सर्वसाक्षिणी तुर्येतील ज्ञानाला शुध्दज्ञान म्हणता येत नाही.

८) ज्ञान म्हणजे अद्वैत (चराचराचे मूळ शुध्दस्वरुप) आणि तुर्या ही तर उघड द्वैतातीत आहे. म्हणून शुध्दस्वरूपज्ञान हे नेहमी तुर्येतील ज्ञानाहून वेगळे आहे.

९) म्हणून सर्वसाक्षी मन तेच उन्मन झाले, ईश्वरचरणी अर्पण झाले, त्यामुळे तुर्यावस्था ही मावळली व त्याबरोबर 'मी सर्व जाणतो' हे ज्ञानदेखील मावळून गेले.

卐 卐 卐

## मूळमाया

निर्विकल्प ब्रह्माचे ठिकाणी 'मी' असे म्हणण्याकरिता म्हणणारा तरी कोण आहे का ? अशा ब्रह्माचे ठिकाणी 'मी' चे – 'अहं' चे स्फुरण होणे हीच मूळमाया. नाथमहाराज म्हणतात, **''स्वरूप निर्विकल्प पूर्ण । ते 'मी' म्हणावया म्हणतें कोण । ऐसेही ठायी स्फुरे मीपण । ते मुख्यत्वे जाण मूळमाया ।।''** साधनाचे वेळी सर्व जाणीवा नाहिशा झाल्यावर 'मी अमुक आहे' हे जे स्फुरण शिल्लक राहते, तिलाच 'मूळमाया' समजले जाते. **'मी परब्रह्म' येणें आकारें। ज्ञानस्वरुपीं स्फूर्ति स्फुरे। ते वोळखावी चातुरें। महामाया।।''** हे मुकुंदराजांचे सांगणे व **''एऱ्हवी सर्वांच्या हृदयदेशी । मी अमुक आहे ऐसी । जे बुध्दी स्फुरे अहर्निशी । ते वस्तु गा मी ।।''** हे ज्ञानेशवचन याला प्रमाण आहे.

परब्रह्म हे निर्गुण, निर्विकार, सर्वेश्वराचे निजरूप असून मूळमाया ही परब्रह्माचे ठिकाणी चंचळत्वाने निर्माण झालेल्या चैतन्यातून निर्माण होते. **''हे परब्रह्म निर्गुण । सर्वेश्वराचें निजरूप जाण । मूळमायेसि अधिष्ठान । जाण पूर्ण चैतन्य''** हे मुकुंदराजांचे सांगणे हे स्पष्ट करणारे आहे.

सर्व देव हे वायुरूप असून मूळमायेच्या उपाधीतीलच असतात. **''अरे विठ्या अरे विठ्या । मूळमायेच्या कारट्या ।''** हे संत जनाबाईचे वचन यावर प्रकाश टाकते.

समर्थ श्रीरामकृपेची वचने मूळमायेबद्दल काय सांगतात, हे आता पाहू.

**१) आकाश असतां निश्चळ । मध्यें वायो जाला चंचळ ।**
**तैसी जाणावी केवळ । मूळमाया ।। ८–३–२७ ।।**

**२) अहंपणें जाणीव जाली । तेचि मूळप्रकृती बोलिली ।**
**महाकारणकाया रचली । ब्रह्मांडीची ।। १०–१०–१३ ।।**

**३) तयामध्यें जाणीवकळा । जगज्जोतीचा जिव्हाळा ।**
**वायो जाणीव मिळोन मेळा । मूळमाया बोलिजे ।।१०–९–५ ।।**





**४) वायो जाणीव जगज्जोती । तयास मूळमाया म्हणती ।**
**पुरुष आणि प्रकृती । याचेंच नांव ।।१०–९–७ ।।**

**५) वायोस म्हणती प्रकृती । आणि पुरुष म्हणती जगज्जोती ।**
**पुरुषप्रकृती शिवशक्ती । याचेंच नांव । १०–९–८ ।।**

**६) वायो शक्ति जाणीव ईश्वर । अर्धनारी नटेश्वर ।**
**लोक म्हणती निरंतर । येणें प्रकारें ।।१०–९–१० ।।**

**७) वायोमध्यें जाणीव विशेष । तोचि प्रकृतीमध्यें पुरुष ।**
**ये गोष्टीचा विश्वास । धरिला पाहिजे ।।१०–९–९ ।।**

**८) पुरुषइच्छेमध्यें प्रकृती । प्रकृतीमध्यें पुरुषव्यक्ती ।**
**प्रकृतीपुरुष बोलती । येणें न्यायें ।।१६–७–४० ।।**

**९) निश्चळीं चंचळ चेतलें । म्हणोनी चैतन्य बोलिलें ।**
**गुणसमानत्वें जालें । गुणसाम्य ऐसें ।।२०–५–७ ।।**

**१०) अष्टधा प्रकृतीचें मूळ । ते हे मूळमायाच केवळ ।**
**सूक्ष्मरूप बीज सकळ । मूळींच आहे ।।२०–२–२० ।।**

**११) मुळीं जाली ते मूळमाया । त्रिगुण जाले ते गुणमाया ।**
**जडत्व पावली ते अविद्यामाया । सृष्टीरूपें ।।११–१–९ ।।**

**१२) जागृती स्वप्न सुषुप्ती जाणे । तुर्या ताटस्थ्य अवस्था जाणे ।**
**सुख दुःख सकळ जाणे । मानापमान ।।१०–१०–२६ ।।**

**१३) तैसी मूळमाया भासे । भासे परी ते न दिसे ।**
**पुढें विस्तारली असे । माया अविद्या ।।८–३–३३ ।।**

**१४) मूळमायेपासून सेवटवरी । वायोचि सकळ कांहीं करी ।**
**वायोवेगळें कर्तृत्व चतुरीं । मज निरापावें ।।९–८–२५ ।।**

**१५) गगनीं आली अभ्रच्छाया । तैसी जाणिजे मूळमाया ।**
**उद्भव आणी विलया । वेळ नाहीं ।।१७–२–७ ।।**

**१६) मूळमाया चौथा देह । जाला पाहिजे विदेह ।**
**देहातीत होऊन राहे । धन्य तो साधु ।।१७-३-२० ।।**

**- भावार्थ -**

१) निश्चळ आकाशाचे ठिकाणी जसा चंचळ वायु उत्पन्न होतो, त्याप्रमाणे निश्चळ ब्रह्माचे ठिकाणी कल्पनेच्या चंचळत्वाने मूळमाया उत्पन्न होते.

२) निश्चळ परब्रह्माचे ठिकाणी अहंपणे स्वत:ची अशी जाणीव निर्माण झाली, तिलाच मूळप्रकृती म्हणतात. हाच तो ब्रह्मांडाचा महाकारण देह.

३) त्या वायुमध्ये शुध्द जाणीव वास करते, तिलाच 'जगज्जोतीचा जिव्हाळा' म्हणतात. हा वायु व त्याठिकाणी असणारी जाणीव या दोघांना मिळून 'मूळमाया' म्हणतात.

४ व ५) मूळमायेच्या ठिकाणी असणाऱ्या वायुस 'प्रकृती' म्हणतात, तर वायुच्या ठिकाणी असणाऱ्या जाणीवेस - जगज्जोतीस 'पुरुष' म्हणतात. या पुरुषप्रकृतीला शिवशक्ती असेही संबोधतात.

६) वायु ही शक्ती तर त्याठिकाणी असणारी जाणीव हा ईश्वर - शिव असून या उभयतांना एकत्रितरित्या मूळमाया अर्धनारीनटेश्वर असे संबोधतात.

७) वायुमध्ये असणारी वेगळीच जाणीव हाच प्रकृतीमध्ये असणारा पुरुष होय, या गोष्टीचा विश्वास धरला पाहिजे.

८) पुरुषाची इच्छा हीच प्रकृती असून इच्छेवरुनच पुरुष व्यक्त होत असतो. ह्यावरूनच याला प्रकृतीपुरुष असेही म्हणतात.

९) निश्चळ परब्रह्माचे ठिकाणी चंचळत्व प्रगट झाले म्हणून त्याला चैतन्य म्हणतात. तेथे गुणांचे प्रमाण सारखे असते, म्हणून त्याला गुणसाम्य म्हणतात.





१०) अष्टधाप्रकृतीचे मूळ ही केवळ मूळमायाच असून या मूळमायेच्या ठिकाणीच पंचमहाभूते व त्रिगुण यांची सूक्ष्मरूप बीजे असतात.

११) निश्चळ परब्रह्माचे ठिकाणी कल्पना हे चळण निर्माण झाले ती मूळमाया. तिच्या ठायी असणाऱ्या जाणीवेतून - गुणातून त्रिगुण निर्माण झाले, ती गुणमाया. पुढे तमोगुणातून पंचमहाभूते निर्माण होऊन दृश्य विश्वाच्या रूपाने ती जडत्व पावली, तेव्हा ती अविद्यामाया बनली.

१२) जागृती, स्वप्न, सुषुप्ती व या तिन्ही अवस्थांना साक्षीभावाने जाणणारी तुर्या, या चारी अवस्था जाणणारी, सुखदु:ख मानापमानाचा अनुभव घेणारी ही मूळमायाच होय.

१३) मूळमाया भासते पण ती दिसत नाही. पण या मूळमायेतूनच पुढे दृश्य दिसणारी अविद्यामाया निर्माण झाली आहे.

१४) मूळमायेपासून विश्वाच्या निर्मितीअखेर, सर्व काही वायुच घडवून आणतो. येथे वायुशिवाय आणखी कोणाचे कर्तृत्व आहे ? ते शहाण्या माणसांनी मला दाखवून द्यावे.

१५) आकाशात जसे वाऱ्याने ढग येतात व तत्काळ वाऱ्यानेच ढग जातात, त्याप्रमाणे ब्रह्माचे ठिकाणी कल्पनेने निर्माण झालेली मूळमाया ही निर्विकल्पाच्या कल्पनेनेच लगेच नाहिशी होते.

१६) मूळमाया म्हणजे महाकारण देह - चौथा देह. त्याठिकाणी 'मी ब्रह्म आहे' हीच जाणीव असते, ही जाणीव नाहिशी झाली असता ज्ञानाचे विज्ञान होऊन, 'मी ब्रह्म आहे' ही मनोवृत्ती नाहिशी होऊन, परब्रह्मरुप झाल्याने तो महात्मा देहीच विदेह होतो. अशा रितीने जो चारी देह ओलांडून जातो, तो साधु धन्य होय.

卐 卐 卐

## आत्मदेव

ज्या शास्त्राच्या आदी आत्मा आहे, ज्या शास्त्राचा आरंभच मूळात आत्म्यापासून होतो, त्या शास्त्राला अध्यात्म म्हणतात. मग आम्हाला अध्यात्मातला आत्माच कळला नाही आणि आम्ही अध्यात्ममार्गी आहोत, असे म्हणणे कितपत योग्य आहे.

**''आत्माचि कळला नाही । जपतप साधन तीर्थे खोटी गे ।**
**ज्ञानदेव म्हणे न सुटती । संसाराच्या गोष्टी गे ।।''**

हे ज्ञानेशवचन आमच्या अध्यात्मावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारेच आहे. ज्याच्या सत्तेवर हे शरीर कार्यरत आहे, ज्याच्यामुळे आमचे शरीर हालचाल करते, जो बाहेर पडला असता शरीराचे व्यवहार थांबतात, त्या आत्म्याची आमची ओळख नाही, बाकी आम्ही ज्ञानी. **''चाले हे शरीर कोणाचिया सत्ते । कोण बोलविते हरिवीण । देखवी ऐकवी एक नारायण । तयाचे भजन चुको नका ।।''** व **''प्राण गेलिया शरीर । काय करील व्यवहार ।''** या तुकोक्ती व **'प्राणैवआत्मा'** हे वचन येथे लक्षात घेण्याजोगे आहे. आत्म्यालाच 'नारायण' असे संबोधले जाते हे नाथमहाराज असे स्पष्ट करतात, **''नरांचा समुदाय गहन । त्यासी 'नार' म्हणती जाण । त्याचे आयन म्हणजे स्थान । म्हणौनि म्हणती 'नारायण' आत्मयासी ।।''** हा आत्मा कसा आहे हे ज्ञानेश्वर महाराज असे सांगतात, **''अर्जुना आत्मा कैसा जाणणे । आकाशासारखा देखणे । आकाश होऊनी चिंतणे। आकाशब्रह्म ।।''** हा आत्मा शरीरात सहस्त्रदळस्थानी असणाऱ्या हृदयात वास करतो, आपण समजतो त्या हृदयात आत्मा रहात नाही, हे येथे लक्षात घेणेजोगे आहे.

**'' अष्टोत्तरशत तीर्थे जयाचे चरणी। तो तुझ्या हृदयभुवनी आत्मारामू ।।''** व **''तैसा हृदयामध्यें मी रामु । असतां सर्वसुखाचा आरामु । कीं भ्रांतासि कामु । विषयावरी ।।''** व **''ज्ञानदेव म्हणे आता फार म्हणो काय । सहस्त्रदळी आत्मा निश्चय वसे ।।''** ही ज्ञानेश्वरमहाराजांची तीन वचने एकत्रितरित्या पाहिली असता आत्मा सहस्त्रदली असणाऱ्या हृदयात राहतो याबद् दल संशय राहणेचे कारण नाही.





आत्म्याला स्थूल व सूक्ष्म अशा दोन विपरीतज्ञानमूलक देहांचे जे बंधन आहे, त्याला मूळकारण अज्ञानमूलक कारणदेह हेच आहे. या अज्ञानाचे ज्ञान झाल्याशिवाय, आत्म्याचे बंधन नाहिसे कसे होणार ? हे मुकुंदराज असे सांगतात,

**''आत्मेयासि देह द्वयेबंधन । तयासि आज्ञान मूळकारण ।**
**म्हणौनि आज्ञाननिवृत्तीविण । मोक्षु कैचा ।।**
**इयापरी लिंगदेह निराशु । जालया चुके गर्भवासु ।**
**आत्मा भेटे स्वयंप्रकाशु । म्हणे मुकुंदराजु ।।''**

समर्थ श्रीरामकृपेची वचने आत्म्याविषयी काय सांगतात हे आता पाहू.

१) **जेथें आत्माराम नाहीं । तेथें उरो न शके कांहीं ।**
**त्रैलोकींचे प्राणी सर्वही । प्रेतरूपी ।।१६-१०-२५ ।।**

२) **आत्म्याकरितां देह जाला । देहाकरितां आत्मा तगला ।**
**उभययोगें उदंड चालिला । कार्यभाग ।।१८-४-३२ ।।**

३) **चंचळकर्ता तो जगदीश । प्राणिमात्र त्याचा अंश ।**
**त्याचा तोचि आपणास । ठाव नाहीं ।।१२-५-१७ ।।**

४) **सकळ चाळिता येक । अंतरात्मा वर्तवी अनेक ।**
**मुंगीपासून ब्रह्मादिक । तेणेंचि चालती ।।१०-१०-३५ ।।**

५) **चंचळ आत्मनिवेदन । यांचे सांगितलें लक्षण ।**
**कर्ता देव तो आपण । कोठेंचि नाहीं ।।१२-५-१८ ।।**

६) **कर्ता आपण ऐसें म्हणावें । तरी आपले इच्छेसारिखें व्हावे ।**
**इच्छेसारिखें न होतां मानावें । अवघेंच वाव ।।१३-६-२६ ।।**

७) मी कर्ता ऐसें म्हणसी । तेणे तूं कष्टी होसी ।
राम कर्ता म्हणतां पावसी । यश कीर्ती प्रताप ।।६–७–३६ ।।

८) कर्त्यासी वोळखावें । यास विवेक म्हणावें ।
विवेक सांडितां व्हावें । परम दुःखी ।। १३–७–२९ ।।

९) सकळ करणें जगदीशाचें । आणी कवित्वचि काय मनुष्याचें ।
ऐशा अप्रमाण बोलण्याचें । काय घ्यावें ।।२०–१०–३५ ।।

१०) तो अंतरात्मा म्हणिजे देव । त्याचा चंचळ स्वभाव ।
पाळिताहे सकळ जीव । अंतरीं वसोनी ।।११–४–३ ।।

११) चंचळ देव, निश्चळ ब्रह्म । परब्रह्मीं नाहीं भ्रम ।
प्रत्ययज्ञानें निर्भ्रम । होइजेतें ।।१८–८–१९ ।।

१२) ब्रह्म आकाश निश्चळ जाती । आत्मा वायो चंचळ जाती ।
परीक्षवंत परीक्षिती । खरें कीं खोटें ।।१३–७–७ ।।

१३) ब्रह्म म्हणिजे निश्चळ । अंतरात्मा तो चंचळ ।
द्रष्टा साक्षी केवळ । बोलिजे तया ।।११–४–२ ।।

१४) द्रष्टा म्हणिजे पाहता । साक्षी जाणिजे जाणता ।
अनंतरूपी अनंता । वोळखावें ।।२०–४–१६ ।।

१५) जाणता येक अंतरात्मा । त्याचा काय सांगावा महिमा ।
विद्या कळा गुणसीमा । कोणें करावी ।।१८–२–२३ ।।

१६) ज्ञानी येक अंतरात्मा । सर्वांमध्यें सर्वात्मा ।
त्याचा कळावया महिमा । बुध्दी कैंची ।।१५–८–२८ ।।

१७) निर्गुण म्हणिजे बहुगुण । बहुगुणी अंतरात्मा जाण ।
सकळ त्याचे अंश हें प्रमाण । प्रचीत पाहा ।।१६–९–४ ।।

१८) देवाभक्तांचें पाहाता मूळ । होय भेदाचे निर्मूळ ।
येक परमात्मा सकळ । दृश्यावेगळा ।।८–८–१७ ।।





१९) देवाभक्तांचें मूळ । शोधून पाहातां सकळ ।
उपाधीवेगळा केवळ । निरुपांधी आत्मा ।।१२–३–२७ ।।

२०) सकळ देवांचें मूळ । तो हा अंतरात्माचि केवळ ।
भूमंडळी भोग सकळ । त्यासीच घडे ।। १८–१–१६ ।।

२१) नारायण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी ।
याकारणें तोषवावी । कोणीतरी काया ।।१५–९–२५ ।।

२२) अंतरी वसतां नारायणे । लक्ष्मीस काय उणें ।
ज्याची लक्ष्मी तो आपणें । बळकट धरावा ।।१७–५–२४ ।।

२३) नादरूप ज्योतीरूप । साक्षीरूप सत्तारूप ।
चैतन्यरूप सस्वरूप । द्रष्टारूप जाणिजे ।।१६–८–८ ।।

२४) आत्मयाचे नाना गुण । ब्रह्म निर्विकार निर्गुण ।
जाणणें एकदेशी पूर्ण । गुण आत्मयाचे ।।२०–६–२९ ।।

२५) आकाश म्हणिजे अंतरात्मा । प्रत्ययें पहावा महिमा ।
त्या आकाशापासून जन्मा । वायो आला ।।१२–६–१२ ।।

२६) चंचळेंविण निश्चळ कळेना । चंचळ तरी स्थिरावेना ।
ऐसे हे विचार नाना । बरे पाहा ।।११–४–६ ।।

२७) सकळ दोषांचा परिहार । करितां सूर्यास नमस्कार ।
स्फूर्ति वाढे निरंतर । सूर्यदर्शन घेता ।।१६–२–२२ ।।

२८) सामर्थ्य आहे चळवळींचें । जो जो करील तयांचें ।
परंतु येथें भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे ।।२०–४–२६ ।।

२९) जेथें ज्ञानचि होतें विज्ञान । जेथें मनचि होतें उन्मन ।
तेथें कैचें चंचळपण । आत्मयासी ।।१०–१०–५२ ।।

३०) ऐसा अंतरात्मा बोलिला । परी तोही तत्वांमध्यें आला ।
पुढें विचार पाहिजे केला । महावाक्याचा ।।११–९–१९ ।।

## – भावार्थ –

१) कोणत्याही गोष्टीतील आत्मा – राम वजा केला की राहते ते अर्थहीन मृत शरीर. तो नसेल तर साऱ्या त्रैलोक्यात काही रामच राहणार नाही.

२) या आत्म्याने देह बांधला व देहाच्या आश्रयाने आत्मा टिकला. देह व आत्मा एकत्र आल्यानेच सृष्टीचा कारभार चालला आहे.

३) या दृश्य जड जगाला चालविणारा जगदीश – अंतरात्मा – कर्ता हा चंचळ असून, प्राणीमात्र हे त्याचेच अंश आहेत. सर्वत्र तोच भरून राहिला आहे. मी म्हणून कोणी नाहीच आहे.

४) सर्व विश्वाचा चालक एक अंतरात्मा असून, मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत सर्व त्याच्या सत्तेनेच काम करतात.

५) कर्तृत्व जे आहे, ते सारे वायुचे – अंतरात्म्याचे – देवाचे आहे. आपण निमित्तमात्र आहोत, किंबहुना आपण कोणी नाहीच आहोत, अशी धारणा असणे, हे चंचळ आत्मनिवेदनाचे लक्षण आहे.

६) 'मी कर्ता आहे' असे जर मानले तर आपल्या इच्छेप्रमाणे सारे व्हावयास हवे. पण आपण करतो एक व होते भलतेच, असाच अनुभव बऱ्याचदा येतो. मग मी कर्ता आहे असे म्हणण्यास काही अर्थ राहतो का ?

७) मी कर्माचा कर्ता आहे असे जर मानशील तर कर्मांचा बंध प्राप्त होऊन कष्टच पदरात येतील. चंचळ आत्माराम हा कर्माचा खरा कर्ता आहे, हे जर विवेकाने ओळखले, तर नैष्कर्म्याने यशवंत, किर्तीवंत, प्रतापवंत व्हाल.

८) या कर्त्याला – आत्म्याला ओळखणे म्हणजे विवेक होय. हा विवेक असेल तरच आनंद आहे. विवेक नसेल तर मात्र सारा आनंदच आहे. (सारे दु:खच आहे)

९) सर्व करणे – कर्तृत्व हे जगदीशाचे – अंतरात्म्याचे आहे. तर मग हे कवित्व – ग्रंथकर्तृत्व माणसाचे कसे ? या अशा निराधार बोलण्याला – विवेक सोडून बोलण्याला, काय म्हणावे?





१०) त्या अंतरात्म्यालाच – प्राणालाच देव म्हणतात. तो स्वभावत: चंचळ वायुरूप असून, शरीरात वास करून सकळ जीवांचा सांभाळ तोच करतो.

११) अंतरात्मा देव चंचळ असून परब्रह्म हे निश्चळ, भ्रमरहित आहे. अनुभवजन्य ज्ञानाने सर्व भ्रम – संशय लयाला जाऊन – निर्भ्रम होऊन, भ्रमरहित परब्रह्माची प्राप्ती होते – परब्रह्मच होतो.

१२ ते १४) ब्रह्म व आकाश हे निश्चळ असून आत्मा व वायू हे चंचळ आहेत. अभ्यासू, अभ्यासाने याचे खरेखोटेपण तपासतात. या अंतरात्म्यालाच द्रष्टा म्हणजे पाहणारा व साक्षी म्हणजे जाणणारा असेही म्हणतात. तोच अनंत–अंतरात्मा अनंतरूपाने नटला आहे.

१५) जाणता – जाणणारा – साक्षी एक अंतरात्मा आहे. त्याचा महिमा काय वर्णन करावा ? त्याची अध्यात्मविद्या, त्याची नामकळा, त्याचे ठिकाणी असणारी जाणीव – गुण यांचा अंत कोणाला लागेल ?

१६) ज्याला ज्ञान होते असा ज्ञानी अंतरात्मा सर्वांच्या ठिकाणी सर्वात्मपणे भरून राहिला आहे.त्याच्या प्रकाशाने बुध्दीला ज्ञान होते. त्याचे महत्व कळण्यासाठी ही बुध्दी थोकडी आहे. ज्ञानाने आत्मा सिद्ध होत नाही तर आत्म्याने ज्ञान सिध्द होते.आत्मा हा प्रयोगी असून तो प्रयोगाने सिद्ध होणारा नाही.

१७) निर्गुण परब्रह्मच चंचळत्वाने बहुगुणी अंतरात्मा होऊन अनंतरूपाने अनंतवेषाने नटले आहे. सर्व देव व त्यांची उपासना करणारे सर्व हे त्याचेच अंश आहेत, याचा अनुभव पहा.

१८ व १९) देव कोण आहे व भक्त कोण आहे हे पाहताना देव व भक्त

यांच्यातील वेगळेपणाच समूळ नाहिसा होतो व उपाधीहून वेगळा – दृश्याहून वेगळा एक निरुपाधिक आत्मा – परमात्मा – परब्रह्म आत्मरूपाने देव व भक्त झालेला आहे, हे लक्षात येते.

२०) सगळ्या देवांचे मूळ केवळ निरुपाधिक अंतरात्माच असून, भूमंडळी होत असलेल्या नानाविध उपासना त्यालाच पोहोचतात.

२१) तो नारायण – अंतरात्मा विश्वात भरून राहिला आहे. त्याला सर्वाभूती पाहून, साम्यभावाने त्याची उपासना – पूजा करावी, त्याला संतुष्ट करावे. तो संतुष्ट झाला की काया संतुष्ट होणार आहे. (मुळाला पाणी घातले की फुले, पाने, टवटवीत होतात.)

२२) ज्याच्या अंत:करणात 'नारायण' हा एकच विषय आहे, त्याला काय उणे होऊन, शरीरभाव नाहिसा होऊन, लक्ष 'मी' होइल – 'मी' हा लक्ष होइल म्हणून लक्ष्मीच्या मागे न लागताना लक्ष 'मी' होणेसाठी ज्याची लक्ष्मी आहे तो नारायणच आपण बळकट धरावा.

२३) आत्मा हा नादरूपाने, ज्योतीरूपाने, साक्षीरूपाने, सत्तारूपाने, चैतन्यरूपाने, सस्वरूपाने, द्रष्टारूपाने जाणता येतो.

२४) ब्रह्म निर्विकार निर्गुण असून, अंतरात्मा हा बहुगुणी आहे. एकदेशी (फक्त आत्म्याचीच) किंवा संपूर्ण जाणीव असणे हा आत्म्याचा गुण आहे.

२५) अंतरात्म्याचा अनुभव वेगळेपणाने घेता येतो म्हणून त्याला आकाश म्हणतात. नाद, बिंदू, कला, ज्योती या रूपाने त्याचा अनुभव येतो व त्याचे महत्व समजते. या आकाशापासून पुढे वायू जन्माला आला.

२६) चंचळ वायुरूप आत्म्याच्या साक्षात्काराशिवाय निश्चळ परब्रह्माचे आकलन होत नाही आणि चंचळत्व नाहिसे होणे तसे अवघडच. असे हे अनेक विचार आहेत, त्यांचा तू विचार करू नकोस, त्यांचा तू द्रष्टा होऊन राहा.

२७) अंतर्यामी आत्मसूर्याचा प्रकाश आहे. म्हणून बाहेरच्या सूर्यप्रकाशाचे ज्ञान





होते. आत अंधार असेल तर बाहेरचा सूर्यप्रकाश कुठे उजेड पाडणार ? आत्मसूर्याचे दर्शन घेतले असता, त्याला नमस्कार केला असता, सर्व दोष नाहिसे होऊन निरंतर स्फूर्ती वाढते.

२८) जो आत्म्याची चळवळ जाणतो – भगवंताचे अधिष्ठान ओळखतो, तो ज्ञानी जे जे करील त्या चळवळीत सामर्थ्य प्राप्त होते.

२९) अंत:करणातील सर्व कल्पना नाहिशी होऊन, मनाचा मनपणा नाहिसा होऊन, उन्मन झाल्यावर, ज्ञान झाले असून ज्ञानाची जाणीव नाही अशा विज्ञानावस्थेत, आत्म्याचा चंचळपणा राहिलच कसा ? आत्म्याचा चंचळपणा नाहिसा होऊन निश्चळत्व प्राप्त होते.

३०) आत्तापर्यंत अंतरात्म्याचा विचार सांगितला, पण तोही चंचळ वायुरूप असून मूळमायेच्या उपाधीतलाच आहे. म्हणून आता महावाक्याचे विवरण केले पाहिजे.

卐 卐 卐

## देव

देवाचे अस्तित्व नाकारणारी नास्तिक माणसे या जगात खूप आहेत. पण प्राणाला न मानणारी नि:ष्प्राण कोण असतील असे वाटत नाही. अहो प्राण हाच देव आहे. तो शरीरात आहे, म्हणून तुम्ही त्याचे अस्तित्व नाकारू शकता. तुमचे त्याचे अस्तित्व नाकारणे हाच तो असल्याचा पुरावा आहे. समर्थ म्हणतात, **''देव म्हणजे आपुला प्राण। प्राणास न करावे निर्वाण। परमप्रीतीचे लक्षण। ते हे ऐसे ।।''** या प्राणालाच आत्मा असेही संबोधतात. ''प्राणैव आत्मा'' हे वचन याला प्रमाण आहे. **''ज्ञानदेव म्हणे भजा आत्मदेवा।। अखंडित सेवा करा त्याची।।''** या शब्दात ज्ञानेश्वरमहाराज खऱ्या देवाची ओळख करून देत आहेत. तर हा प्राण किंवा आत्मा वायुरूप आहे म्हणून **''वाराची देव आमुचा''** या शब्दात देवाचे वर्णन दासराममहाराज करतात. हे वारे शरीरात असल्याने आपले अस्तित्व जाणवते. ज्यायोगे आपले अस्तित्व जाणवते असा शुध्द अस्तित्वभाव हाच देव आहे हे नाथमहाराज खात्रीपूर्वक असे सांगतात. **''भाव तोचि देव भाव तोचि देव । ये अर्थी संदेह नका धरू ।।''** मनाचे मनत्व नाहिसे होणे हाच खरा देवाचा अनुभव असून तोच मुख्य भाव असल्याचे नामदेवमहाराज असे सांगतात, **''नमन हाची अनुभव । नमन हाची मुख्यभाव । नमन हाची पै देव । देवाधिदेव तू पावसी ।।''** नामाच्या ठिकाणी रूपाची प्रचिती आल्यावर सर्व मनोवृत्तीचे मौन साधून नमन होऊन भगवंताची – देवाची प्राप्ती होत असल्याने **''नामरूप भगवान माझा नामरूप भगवान''** या शब्दात देववर्णन आमचे श्रीमामामहाराजांची अमृतवाणी करते आहे. समर्थ श्रीरामकृपेची वचने देवाबद्‌दल काय सांगतात हे आता पाहू.

**१) ब्रह्मा विष्णु महेश्वर । चौथा आपण जगदेश्वर ।**
**वायोस्वरूप विचार । विवेकी जाणती ।।१६-६-१९ ।।**





**२) देव देवता देवतें भूतें । पृथ्वीमध्यें असंख्यातें ।**
**परंतु या समस्तातें । वायोस्वरूप बोलिजे ।।१०-३-९ ।।**

**३) परंतु आहे सूक्ष्मरूप । जैसें वायोचें स्वरूप ।**
**सकळ देव वायोरूप । आणी भूतसृष्टी ।। ९-८-१५ ।।**

**४) देव म्हणिजे आपुला प्राण । प्राणासी न करावें निर्वाण ।**
**परम प्रीतीचें लक्षण । तें हें ऐसें असें ।।४-८-१० ।।**

**५) देहपुरामध्यें ईश । म्हणोनी तया नांव पुरुष ।**
**जगामध्यें जगदीश । तैसा वोळखावा ।।११-९-१२ ।।**

**६) मूळमाया तोचि मूळपुरुष । तोचि सर्वांचा ईश ।**
**अनंत नामी जगदीश । तयासीच म्हणावें ।।८-३-२० ।।**

**७) अविद्यागुणें बोलिजे जीव । मायागुणें बोलिजे शिव ।**
**मूळमायागुणे देव । बोलिजेतो ।।८-३-१८ ।।**

**८) अवघी सृष्टी जो कर्ता । तो ते सृष्टीहूनि पर्ता ।**
**तेथें संशयाची वार्ता । काढूंचि नये ।।८-१-३४ ।।**

**९) दृश्यावेगळा दृश्याअंतरी । सर्वात्मा तो सचराचरीं ।**
**विचार पाहातां अंतरीं। निश्चयो बाणे ।।६-९-२३ ।।**

**१०) एवं जगदीश तो वेगळा । जग निर्माण त्याची कळा ।**
**तो सर्वांमध्यें परी निराळा । असोन सर्वीं ।।८-१-४१ ।।**

**११) पदार्थ चांगले दिसती । परी ते सर्वेचि नासती ।**
**अतो भ्रष्ट ततो भ्रष्ट होती । लोक तेणें ।।१७-३-२२ ।।**

**१२) जनांचा लालची स्वभाव । आरंभींच म्हणती देव ।**
**म्हणिजे मला कांहीं देव । ऐसी वासना ।।१८-७-१ ।।**

**१३) देवावेगळें कोणी नाहीं । ऐसें बोलती सर्वही ।**
**परंतु त्यांची निष्ठा कांहीं । तैसीच नसे ।।४-८-१९ ।।**

१४) **आहे तितुकें देवाचें । ऐसें वर्तणें निश्चयाचें ।**
**मुळ तुटे उद्वेगाचें । येणें रीती ।।११–३–२८ ।।**

१५) **स्मरण म्हणिजें देव । विस्मरण म्हणिजे दानव ।**
**स्मरण विस्मरणें मानव । वर्तती आतां ।।१५–७–३५ ।।**

**– भावार्थ –**

१) ब्रह्मा, विष्णू, महेश्वर व चौथा जगदेश्वर – अंतरात्मा हे सारे वायुरूप आहेत, असे सारासार विचाराने विवेकी जाणतात.

२) देव, देवता, दैवते, भूते या भूतलावर खरोखर असंख्यात आहेत. परंतु ही सारी वायुस्वरूपच आहेत.

३) वायू जसा सूक्ष्मरूप आहे तसेच त्याठिकाणी असणारी जाणीवही सूक्ष्मच आहे. सर्व देव आणि ही भूतसृष्टी वायुरूपच आहे.

४) आपल्या सहस्त्रदळी असणारा वायुरूप प्राण – आत्मा हाच देव असून – त्या प्राणाशी आपले सतत तादात्म्य असणे हेच श्रेष्ठ प्रेमाचे – खऱ्या भक्तीचे लक्षण आहे.

५) देहरूपी नगरीत राहणारा अंतरात्मा हाच या नगरीचा ईश – स्वामी असून त्याला पुरुष म्हणतात. त्याप्रमाणे विश्वामध्ये राहणारा विश्वाचा स्वामी विश्वंभर हाच जगदीश या नावाने ओळखला जातो.

६) मूळमायेलाच मूळपुरुष असे संबोधतात. तोच सर्वांचा नियंता, स्वामी, ईश्वर आहे. अनंतरूपाने अनंतवेषाने नटलेला जगदीश त्यालाच म्हणतात.

७) अविद्येच्या – कल्पनेच्या – अज्ञानाच्या उपाधीत सापडलेल्या ब्रह्मांशाला जीव म्हणतात, तर मायेच्या उपाधीत सापडलेल्या ब्रह्मांशाला शिव म्हणतात, तर मूळमायेच्या उपाधीत सापडलेल्या ब्रह्मांशाला देव म्हणतात.





८) ही सबंध सृष्टी ज्याने निर्माण केली तो देव सृष्टीहून वेगळा आहे, सृष्टीच्या पलिकडे आहे याबद् दल यत्किंचितही संशय धरु नये.

९) दृश्याचे मागे दडलेला, पण दृश्यापेक्षा वेगळा असा परमात्मा चराचरात भरून राहिला आहे, हा विचार अंतर्यामी पाहिले असता पक्का होतो.

१०) जगाची निर्मिती ही ज्याची अगाध लीला आहे असा जगदीश, सर्व जगतात गुप्तरूपाने भरून राहिला आहे. पण तो जगातला नसून जगावेगळा आहे, हेच त्याचे वेगळेपण आहे.

११) दृश्य पदार्थ सुंदर दिसला तरी तो नाशिवंत असल्याने तो ही हातचा निसटतो व दृश्यात अडकल्याने दृश्यामागे दडलेला देव तर दूरच राहतो. अशा तऱ्हेने दृश्यात गुंतून राहणाऱ्यांच्या हाताला काहीच लागत नाही.

१२) सामान्य माणसाचा स्वभावच मुळी लालची असतो. ते सुरुवातीलाच देवाला 'देवो' असे संबोधून, मला जे काही हवे आहे, ते तू दे, अशी वासना प्रकट करतात.

१३) देवावेगळे या जगात दुसरे काही नाही, सर्वत्र देवच भरून राहिला आहे, असे सर्वजणच बोलतात. पण त्यांची अवस्था काही तशी असत नाही.

१४) आपल्या देहासकट सारे दृश्य हे भगवंताचे असून त्याने आपणास ते उपलब्ध करून दिले आहे, अशा निश्चयाने जो वागतो, तो स्वस्थ होतो – त्याचा अस्वस्थपणा नाहिसा होतो.

१५) ज्याचे ठिकाणी परमेश्वराचे अखंड स्मरण आहे तो देव, तर ज्याचे ठिकाणी परमेश्वराचे अखंड विस्मरण आहे तो दानव, तर काही काळ स्मरण व काही काळ विस्मरण, असे जेथे आढळते तो मानव होय.

卐 卐 卐

## अनुभव

आपण ज्याला पारमार्थिक अनुभव समजतो, त्याला संतमहात्मे अनुभव मानीत नाहीत. आपण जे अनुभव म्हणून सांगतो ते बहुतांशी जगाचे अनुभवच असतात. जगाचा अनुभव हा पारमार्थिक अनुभव नाही. ''**अनुभवेवीण साचा अनुभव जगताचा ।।**'' ही मामामहाराजांची अमृतवाणी हेच उघडपणे सांगते आहे.

मग पारमार्थिक अनुभव कोणते ? चंचळ असणारे मन स्थिर होणे हा खरा अनुभव आहे. ''**अनुभवे अनुभव अवघाची साधिला । तरीच स्थिरावला मनु ठायी ।।**'' ही तुकोक्ति हे स्पष्ट करणारी आहे. चंचळ असणारे मन स्थिर झाले की जीवनाची गती स्थिर होऊन उर्ध्वगामी होते व प्रकाशरूप परमात्म्याचा साक्षात्कार होतो. ''**दिव्या वाऱ्या घाली खेव । यांचा घ्यावा अनुभव ।।**'' या तुकाराम महाराजांच्या वचनाचा त्याला अनुभव येतो. ''**गगनी भासले अगणित तारे । तेथे मन मुरे वृत्तीसहीत ।।**'' या ज्ञानेश वचनाचा त्याला अनुभव येतो व मनाचा संपूर्ण लय होऊन नमन होते व ''**नमन हाची अनुभव**'' या नामदेव महाराजांच्या वचनाचा अनुभव येतो. मन मुरल्यानंतर काय उरते, त्याचा अनुभव त्याला येतो. यच्चयावत विश्वाचा अनुभव घेणारा अनुभवी अनुभवला जातो, ''**ज्ञानदेव म्हणे अनुभवी जाणे । संत ये खुणे पारुषले ।।**'' या ज्ञानेशवचनाचा त्याला अनुभव येतो. सर्व विश्व ब्रह्मरूप असल्याची अनुभूती येते. ''**हा गे माझा अनुभव । विश्व देव सत्यत्वे ।।**'' ही तुकोक्ती अनुभवाला येते. ''**दृश्य जाऊनीयां द्रष्टें । द्रष्ट्यासीचि जैं भेटे । तैं एकलेपणेंन घटे द्रष्टेपणही ।।**'' या ज्ञानेश वचनाप्रमाणे द्रष्टेपणा नाहिसा होऊन तो साधक जाणीवनेणीवरहित ब्रह्मच होऊन जातो. तेथे अनुभव घेणारा म्हणून निराळा कोणी शिल्लक रहात नाही. वेगळेपणा रहातच नाही. येथे अनुभवी, अनुभव्य, अनुभव ही त्रिपुटी रहातच नाही. हा नि:शब्द ब्रह्माचा अनुभव साधकाला नि:शब्द करणाराच असतो. तो शब्दाने





व्यक्त करता येत नाही. तो ''**शब्देविण संवादीजे ।**'' असाच असतो. हा अनुभव अनुभवूनच घेता येतो. तो ज्याच्या त्याच्या पुरता असतो. आपण कितीही वर्णन केले तरी त्याचा फारसा उपयोग दुसऱ्याला होत नाही.

समर्थ श्रीरामकृपेची वचने अनुभवाबद्‌दल काय सांगतात ते आता पाहू.

१) **स्वप्नीं वाटे जागेपण । तैसी अनुभवाची खूण ।**
**आली परी तें सत्य स्वप्न । भ्रमरूप ।।६-१०-५८ ।।**

२) **दुजेविण अनुभव । हें बोलणेंचि वाव ।**
**याकारणें नाहीं ठाव । अनुभवासी ।।६-१०-२९ ।।**

३) **अनुभवें त्रिपुटी उपजे । अद्वैतीं द्वैतचि लाजे ।**
**म्हणोनि बोलणें साजे । अनिर्वाच्य ।।६-१०-३० ।।**

४) **प्रचितीवीण जें बोलणें । ते अवघेंचि कंटाळवाणे ।**
**तोंड पसरून जैसें सुणें । रडोन गेलें ।।९-५-१५ ।।**

५) **शब्दचि नि:शब्द होती । श्रुती नेति नेति म्हणती ।**
**हें तों आलें आत्मप्रचिती । प्रत्यक्ष आतां ।।९-२-३५ ।।**

६) **जे मनबुध्दी अगोचर । जें कल्पनेहून पर ।**
**तें अनुभवितां साचार । द्वैत कैंचें ।।७-५-१६ ।।**

७) **ऐक अनुभवाचें लक्षण । अनुभव म्हणिजे अनन्य जाण ।**
**ऐक अनन्याचें लक्षण । ऐसें असे ।।९-२-२९ ।।**

८) **आपुलिया स्वानुभवें । आपणास निवेदावें ।**
**आत्मनिवेदन जाणावे । ऐसें असे ।।८-८-८ ।।**

९) **जे अनुभवेंचि जाणावें । सृष्टीचेनि अभावें ।**
**आपुलेन स्वानुभवें । पाविजे ब्रह्म ।।७-४-४७ ।।**

१०) **मुक्यानें गूळ खादला । गोडी न ये सांगायाला ।**
**याचा अभिप्राव मजला । निरोपण कीजे ।।६-१०-२ ।।**

## – भावार्थ –

१) निश्चळ परब्रह्माने मी एक कोणीतरी आहे असे कल्पनेने स्वप्न पाहिले. तो हा चंचळ वायुरूप आत्मा. हा आत्मा गुणाच्या संगतीने – त्याच्या ठिकाणी निर्माण झालेल्या जाणीवेने – कल्पनेने संसारी होतो. म्हणजे हा आंत्म्याचा संसार म्हणजे परब्रह्माचे दृष्टीने स्वप्नी स्वप्नाचा विचार आहे. अंत:करणातील सर्व कल्पना नाहिशी झाली असता – मनोवृत्तीचा निरोध झाला असता – जीवन सूक्ष्मतर सूक्ष्मतम झाले असता, जीवन उर्ध्वगामी होऊन , महाकारण देहात त्याला वेगळेपणाने आत्म्याचा – सगुण ब्रह्माचा अनुभव येतो. हा अनुभव म्हणजे स्वप्नात स्वप्न पडले आहे व त्या ठिकाणी आपण जागे झालो आहोत असा आहे. हा अनुभव म्हणजे स्वप्नात जागे होणे असा आहे. म्हणजे हा अनुभव खरा नाही, एक स्वप्नच आहे, भ्रमरूप आहे.

२) द्वैताशिवाय अनुभव घेणे हे बोलणे खोटे आहे. आम्ही जे अनुभव सांगतो ते सारे, आपण व परब्रह्म वेगळे आहोत असे दाखविणारे – द्वैतद्योतकच असतात. परमार्थात असल्या अनुभवांना जागा नाही. आम्ही सांगतो ते, पारमार्थिक अनुभव नव्हेत.

३) त्रिपुटीशिवाय अनुभव नाही आणि अद्वैत स्वरूपाचे ठिकाणी द्वैतही खपत नाही, मग त्रिपुटी कुठली चालणार ? म्हणून स्वरूपाचा अनुभव आपण समजतो तसा अनुभव नाही. हा अनुभव अनिर्वाच्य असतो – शब्दाने सांगता येत नाही. हा अनुभव 'शब्देविण संवादिजे' असाच असतो.

४) निशब्द परमात्म्याचा अनुभव नि:शब्द करणारा असल्याने, आमचे बोलणे हे प्रचितीवीण – अनुभवावाचूनच असते. आमची बडबड ही अनुभव नसल्याचेच द्योतक आहे. म्हणून ते कंटाळवाणेच ठरते – परिणामकारी होत नाही. तोंडाचा 'आ' करून एखादे कुत्रे रडले, तर ते जसे ऐकवत नाही तसाच हा प्रकार होतो.





५) स्वरूपानुभव शब्दात सांगता येत नाही. नि:शब्द परमात्म्याचा अनुभव, अनुभव घेणाऱ्याला नि:शब्द करणाराच असतो. म्हणूनच अनंत बोलणाऱ्या वेदांनी अनुभवाअंती मौन धारण केले, हे प्रचितीने अनुभवता येते.

६) जे मनाला व बुध्दीला आकलन होत नाही, म्हणजेच जे कल्पनेच्या पलिकडे, तर्काच्या पलिकडे आहे, अशा स्वरूपाचा अनुभव घेतल्यावर द्वैत कुठले राहील ? कल्पनेचा निरास झाल्यावर, वस्तुरूप झाल्यावर, द्वैत कुठले ?

७) स्वरूपाशी अनन्य होणे – स्वरूपी मिळून जाणे हे स्वरूपाचे अनुभवाचे लक्षण आहे. स्वरूपाशिवाय अन्य काही न जाणणे हाच तो अनन्यपणा.

८) 'स्व' च्या अनुभवाने 'मीपणा' देवाला अर्पण होणे, हेच आत्मनिवेदन.

९) आपल्या स्वानुभवाने ब्रह्मरूप झालेल्या महात्म्यांच्या दृष्टीला सृष्टी येत नाही, हा अनुभव सांगून समजणारा नसून तो अनुभवानेच जाणता येणार आहे.

१०) अहो, मुक्याने गुळ खाल्ला, तर त्याला येणारा त्याचा अनुभव – त्याची गोडी त्याला कशी व्यक्त करता येईल ? अहो, अनुभव हा नि:शब्द असल्याने आपल्यासारख्या बडबड्या माणसाला पण ती गोष्ट नीटशी व्यक्त करता येणार नाही. मग मुक्याला ती कशी व्यक्त करता येईल ? तरीपण मुक्याने गूळ खाल्यावर, त्याला होणारा आनंद हा लपून रहात नाही, तो त्याच्या चेहऱ्यावर व्यक्त होतोच, त्याप्रमाणे पारमार्थिक अनुभव हा जरी शब्दात व्यक्त करता येत नसला, तरी त्या व्यक्तीला काही अपूर्व अनुभव आलेला आहे, हे लपून रहात नाही.

卐 卐 卐

## सगुण-निर्गुण

सगुण श्रेष्ठ का निर्गुण श्रेष्ठ हा वाद पूर्वापार आहे. अहो, सगुण हे निर्गुणातूनच निर्माण झाले आहे. अस्तित्वभावाच्या मंथनातून निर्गुण साचले की सगुण परब्रह्म आकार घेते हे तुकाराम महाराज असे सांगतात, ''**भावाचे मथिले निर्गुण संचले । ते हे उभे ठेले विटेवरी ।।**'' तर सगुणाच्या आधाराशिवाय निर्गुणापर्यंत पोहोचता येत नाही हे समर्थ असे सांगतात, ''**सगुणाचेनी आधारे निर्गुण पाविजे निधारे ।।**'' म्हणून सगुण व निर्गुण ही दोन्ही आपापल्या परिने श्रेष्ठच आहेत. ''**निर्गुणाहूनी सगुण न्यून । म्हणे तो केवळ मूर्ख जाण । सगुण निर्गुण दोनी समान । न्यून पूर्ण असे ना ।।**'' हे नाथवचन हे स्पष्ट करणारे आहे.

हे सगुणनिर्गुण आपण समजतो तसे नाही. आपण मंदिरात मूर्ती ठेवली की सगुण व पोथी ठेवली की निर्गुण इतक्या स्थूल दृष्टीने या सूक्ष्म विषयाकडे पाहतो. संतांना अभिप्रेत असलेले सगुण हे निर्गुणाला चिकटलेले आहे. सगुण व निर्गुण या दोन्हींचे आनंदरूप हरीच्या ठायी ऐक्य होते.'' **सत्पद ते निर्गुण । चित्पद ते सगुण । सगुणनिर्गुण निर्माण । की जे आनंदपदें ।।**'' हे विवेकसिंधूवचन व ''**सत्पद ते ब्रह्म । चित्पद ते माया । आनंदपदी तया म्हणती हरी ।।**'' हे संतवचन, ही दोन्ही संतवचने एकत्रितरित्या याला प्रमाण आहेत. ज्ञानेश्वरमहाराज हे सगुण निर्गुणाचे ऐक्य असे मांडतात, ''**तुज सगुण म्हणो की निर्गुण रे । सगुण निर्गुण एकू गोविंदु रे ।।**'' सगुणानिर्गुणाविषयी समर्थ श्रीरामकृपेची वचने काय सांगतात ते आता पाहू.

**१) तैसी मूळमाया जाली । आणी निर्गुणता संचली ।<br>येणें दृष्टांतें फिटली । मागील आशंका ।।८–३–२९ ।।**

**२) विघुरले तुप थिजलें । तैसे निर्गुणचि गुणा आलें ।<br>तेथें काय वेगळें केलें । द्रष्टेपणें ।। ८–१०–५८ ।।**





**३) चंचळपणें विकारलें । सगुण ऐसें बोलिलें ।<br>येर तें निर्गुण उरलें । गुणातीत ।।१६–९–१३ ।।**

**४) सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें ।<br>सारासारविचारें । संतसंगे ।।६–६–५५ ।।**

**५) आपण कल्पिलें मीपण । मीपण शोधिता नुरे जाण ।<br>मीपण गेलियां निर्गुण । आत्माचि स्वयें ।।६–३–२९ ।।**

**६) जालिया तत्वांचें निरसन । निर्गुण आत्मा तोचि आपण ।<br>कां दाखवावें मीपण । तत्वनिरसनाउपरी ।।६–३–३० ।।**

**७) तत्वांमध्यें मीपण गेलें । तरी निर्गुण सहजचि उरलें ।<br>सोहंभावें प्रत्यया आलें । आत्मनिवेदन ।। ६–३–३१ ।।**

**८) निर्गुणास नाही जन्ममरण । निर्गुणास नाही पापपुण्य ।<br>निर्गुणी अनन्य होतां आपण । मुक्त जाला ।। ६–३–३३ ।।**

**९) निर्गुण नेलें संदेहाने । सगुण नेलें ब्रह्मज्ञानें ।<br>दोहींकडे अभिमानें । वोस केलें ।।१४–५–९ ।।**

### – भावार्थ –

१) निर्गुणता साठली की मूळमाया – सगुणब्रह्म – आत्मरूप उदयाला येते. या दृष्टांताने मागील शंकांचे निरसन झाले.

२) पातळ झालेले तूप घट्ट व्हावे, त्याप्रमाणे गुणातीत असणारे निर्गुणच जाणीवेवर येऊन, चंचळत्वाने सगुण आत्मरूप झाले, त्याला द्रष्टा, साक्षी म्हणतात. या सगुणरूपाचा– द्रष्ट्याचा अनुभव 'काय' वेगळे केले असता – शरीरभाव उणा झाला असता येतो.

३) निश्चळ परब्रह्माचे ठिकाणी 'मी' चे स्फुरण निर्माण झाले. चंचळत्व हा विकार निर्माण झाला. चंचळत्वाने व्यक्त झालेल्या वायुरूप आत्म्याला सगुणब्रह्म

म्हणतात. गुण आटला असता, जाणीव नाहिशी झाली असता, जे उरले ते निर्गुणब्रह्म होय.

४) संतांचे संगतीत सारासार विचार – विवेक प्राप्त होऊन, सगुण चंचळ आत्मरूपाच्या आविष्काराने, मनाचे उन्मन व ज्ञानाचे विज्ञान होऊन, निश्चळ, निर्गुण परब्रह्म निश्चित प्राप्त होते.

५) आपल्याच कल्पनेने आपण मीपणा – जीवपणा निर्माण केलेला असतो. विवेकाने त्याचा शोध घेतला असता, तो उरत नाही. 'मी' ची जाणीव संपूर्णपणे नाहिशी झाली असता – तोच आहे असा अनुभव आला असता, ज्ञानाचे विज्ञान झाले असता, स्वत: चंचळ सगुण आत्माच निश्चळ निर्गुण परब्रह्म होऊन जातो.

६) आपल्या जीवनातील पंचमहाभूतांचा निरास झाला असता, जीवनातील स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण या देहांचा निरास झाला असता, चिद्‌गुण शुध्द झाला असता, राहते ते मीपणा नाहिसा होऊन – वेगळेपणा नाहिसा होऊन, निर्गुण परब्रह्म.

७) तत्वे लय पावली व त्याबरोबर मीपणा – अहंकारही गेला, मग उरलेले निर्गुण परब्रह्म म्हणजेच 'मी' आहे, मी कोणी वेगळा नाही, हे आत्मनिवेदन सोहंभावाने प्रत्ययाला आले.

८) निर्गुण परब्रह्माशी समरस होतो, तो मुक्तच होतो. जन्ममरण, पापपुण्यादि द्वंद्वे त्याठिकाणी उरत नाहीत.

९) जोवर देहाभिमान नाहिसा होत नाही – देहभाव जात नाही – चत्वार देहाचा निरास होत नाही, तोवर संशय जात नाही. अर्थात निर्गुण परब्रह्माची प्राप्तीही होत नाही व शाब्दिक ब्रह्मज्ञानाने सगुण परमात्म्याविषयी प्रेम वाटत नाही, त्याबद्‌दलही संशय वाटू लागतो. याप्रमाणे अभिमानाचे पायी 'ना घरका ना घाटका' अशीच त्याची अवस्था होते.

卐 卐 卐

## उन्मनी

तुर्या अवस्था परिपक्व दशेला आली की तिला उन्मनी अवस्था म्हणतात. तुर्येची परिणती उन्मनी अवस्थेत होते, म्हणून उन्मनी ही वेगळी अवस्था आहे असे वेद मानत नाहीत. मुकुंदराज सांगतात, **''आवस्ता पंचमी नास्ती । यैसें बोले वेदश्रुती ।। म्हणौनि तुर्याचि परिणती ।। उन्मनी गा ।।''** वासना शुध्द होणे ही तुर्यावस्था तर वासनारहित होणे ही उन्मनी अवस्था. **''तुर्या ते शुध्द वासना । तेथ तोचि कडुवटपणा । उन्मनी बुझ निर्वासना । म्हणौनि गोड ते ।।''** हे मुकुंदराजांचे सांगणे हेच स्पष्ट करणारे आहे. तुर्या अवस्था स्वरूपाचे ठिकाणी मुरली की तीच उन्मनी अवस्था.

उन्मनी अवस्था म्हणजे नेमके काय हे दासराममहाराज असे सांगतात, **''ज्ञानमयी निद्रा तेचि गा उन्मनी । दासरामा धणी आत्माराम ।।''** तर मामा महाराज उन्मनी म्हणजे काय हे असे स्पष्ट करतात, **''विषयातून निघे मन । तेचि जाणावे उन्मन ।।''**

उन्मनी अवस्था कशी प्राप्त करून घ्यावी हे मुक्ताबाई ताटीच्या अभंगात असे सांगतात, **''मन मारूनी उन्मन करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।''** तर ज्ञानेश्वरमहाराज हरिपाठात असे सांगतात, **''रामकृष्णनामी उन्मनी साधिली । तयासी लाघली सकळ सिध्दी ।।''**

समर्थ श्रीरामकृपेची वचने उन्मनीबद्दल काय सांगतात ते आता पाहू.

**१) साक्षत्व वृत्तीचें कारण । उन्मनी ते निवृत्ति जाण ।**
**जेथें विरे जाणपण । विज्ञान तें ।।७-४-५० ।।**

**२) वृत्तीस न कळे निवृत्ति । गुणास कैंची निर्गुणप्राप्ती ।**
**गुणातीत साधक संतीं । विवेकें केलें ।।११-१-४० ।।**





**३) मीपण तें बुडालें । विवेकें वेगळेपण गेलें ।**
**निवृत्तिपदास प्राप्त जालें । उन्मनीपद ।।१२-३-२८ ।।**

**४) विचारेंचि अनन्य जाला । पाहणाराविण प्रत्यय आला ।**
**तेही वृत्ति निवृत्तिला । बरें पाहा ।।११-९-२४ ।।**

**५) अनिर्वाच्य ते निवृत्ति । तेचि उन्मनीची स्थिती ।**
**निरोपाधी विश्रांति । योगियांची ।।७-३-४४ ।।**

**६) उन्मनी आणी सुषुप्ति अवस्था । सारिखेच वाटे तत्वता ।**
**परी विवंचून पाहों जातां । भेद आहे ।। ८-५-६३ ।।**

**- भावार्थ -**

१) उन्मनी - निवृत्ती अवस्थेत कोणतीही वृत्ती उरत नाही. अर्थात तुर्येतील साक्षित्व ही एक वृत्ती असल्याने, तीही याठिकाणी उरत नाही. तुर्यावस्थेत असणारी ज्ञानाची जाणीव, ती ही या ठिकाणी उरत नाही. म्हणून तिला विज्ञान असेही संबोधतात.

२) जोवर मला ज्ञान झाले ही वृत्ती आहे, ज्ञानाची जाणीव आहे, तोवर निवृत्ती होता येत नाही. जोवर गुण - जाणीव आहे, तोवर जाणवनेणीवरहित असणारा निर्गुण परमात्मा कसा भेटणार ? संत हे विवेकाने साधकाला जाणीवेच्या पलिकडे नेतात. परब्रह्मरूप करतात.

३) मीपणा गेला - अहंभाव गेला - 'मी अमुक आहे' ही जाणीव नाहिशी झाली की, विवेकाने वेगळेपणा नाहिसा होऊन, ब्रह्माचाच, जाणीवरहित अनुभव त्याला येतो व वृत्तीरहित निवृत्ती अवस्था - उन्मनी अवस्था प्राप्त होते.

४) स्वरूपचिंतनाने स्वरूपाकार होणे - वस्तुरूप होणे असे पाहणारा वेगळा न राहता अनुभव येणे म्हणजेच मी पाहणारा वेगळा ही वृत्ती नाहिशी होणे - निवृत्ती अवस्था - उन्मनी अवस्था प्राप्त होणे होय.

५) अनिर्वचनीय निवृत्ती अवस्था – उन्मनी अवस्था म्हणजेच योग्यांना निरुपाधिक परब्रह्मापासून प्राप्त होणारी निरुपाधिक विश्रांती होय.

६) उन्मनी व सुषुप्ती या दोन्ही अवस्थेत कल्पनेचा निरास झालेला असतो, म्हणून या दोन्ही अवस्था सारख्याच वाटतात. पण या दोन्हींत विचारपूर्वक पाहिल्यास भेद आहे. उन्मनी अवस्था ही विज्ञानात्मक असून तेथे संसार – संसरण शिल्लक राहत नाही, तर सुषुप्ती ही अज्ञानात्मक असल्याने या अवस्थेत संसरण – संसार नाहिसा होत नाही.

卐 卐 卐

## विपरीत ज्ञान/अज्ञान/ज्ञान/विज्ञान

व्यवहारात विपरित ज्ञान, अज्ञान, ज्ञान, विज्ञान हे शब्द आम्ही ज्या अर्थाने वापरतो, त्या अर्थाने ते शब्द परमार्थात वापरले जात नाहीत. संतवाङ्मयातील या शब्दांचा व्यावहारिक दृष्टीने अर्थ केल्यास अनर्थच ओढवतो.

ज्याच्यामुळे ज्ञान व ज्याच्यामुळे अज्ञान त्याचे ज्ञान म्हणजे पारमार्थिक ज्ञान होय. व ज्याच्यामुळे ज्ञान व ज्याच्यामुळे अज्ञान त्याचे अज्ञान म्हणजे पारमार्थिक अज्ञान होय. हे दासराममहाराजांचे सांगणे ज्ञान व अज्ञान हे नेमके काय हे स्पष्ट करणारे आहे. आपला आपल्याला विसर होणे हे अज्ञान, आपण आपणाला जाणणे हे ज्ञान तर ज्ञान असून ज्ञानाची जाणीव नसणे हे विज्ञान. **''ज्ञान म्हणजे काय आपणा जाणणे । जाणोनि नेणणे विज्ञान तें ।।''** ही तुकोक्ती व **''आपला आपणपेया । विसरू जो धनंजया । तेंचि रूप यया । अज्ञानासी ।।''** हे ज्ञानेशवचन, ही वचने अज्ञान, ज्ञान, विज्ञान म्हणजे काय हे स्पष्ट करणारीच आहेत.

विज्ञान म्हणजे काय हे नाथमहाराज असे सांगतात,

**''जागृती सुषुप्ती आणि स्वप्न । संसाराचे मिथ्याज्ञान ।**
**हे ज्यासी ठसावलें संपूर्ण । विज्ञान जाण त्या नांव ।।''**
**''मुख्य विज्ञानाचे लक्षण । साधक होय ब्रह्म पूर्ण ।**
**जगीं न देखे मीतूंपण । 'उपशम' जाण या नांव ।।''**

ज्ञान आणि विज्ञान यातील फरक नाथमहाराज असा सांगतात,

**''जीवु परमात्मा दोनी एक । ऐसें जाणणें तें 'ज्ञान' देख ।**
**ऐक्यें भोगणें परमात्मसुख । 'विज्ञान' सम्यक त्या नांव ।।''**

जोवर अज्ञान नाहिसे होत नाही, तोवर विपरीतज्ञानात्मक – भ्रमात्मक जागृती, स्वप्न या अवस्था प्राप्त होऊन संसार – संसरण संपूर्ण नाहिसे होणार नाही. **''जंव आज्ञान न फिटे । तव संसार नि:शेष न तूटे । विपरितज्ञानाचा**





**कोंबु फुटे । माघौता म्हणौनि ।।''** हे मुकुंदराजांचे वचन यावर प्रकाश टाकते.

जोवर अज्ञानाचे ज्ञान होऊन अज्ञान नाहिसे होत नाही, नेणीवेची जाणीव होऊन नेणीव खोटी ठरत नाही, संसरण – संसार नाहिसा होत नाही, तोवर प्राप्त होणाऱ्या जागृती, स्वप्न या अवस्थांत जे ज्ञान प्राप्त होतें, ते सारे विपरितज्ञान होय.

जर अज्ञानाचे ज्ञान झाले, झोपेत जागे राहता आले तर विपरीत ज्ञानात्मक अवस्था प्राप्त न होता, तो साधक जाणीवरहित वस्तुरूपच होतो. ज्ञानेश्वरमहाराज हे असे सांगतात,

**''तैसे अज्ञान ज्ञानें नेले । आपण वस्तु देऊनि गेलें ।**
**ऐसे जाणणेनिवीण उरलें । जाणते जें ।।''**

समर्थ श्रीरामकृपेची वचने या विपरितज्ञान, अज्ञान, ज्ञान, विज्ञान याबद्‌दल काय सांगतात, ते आता पाहू.

१) **ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान म्हणजे आत्मज्ञान ।**
**पाहावें आपणासि आपण । या नांव ज्ञान ।।५–६–१ ।।**

२) **आठवें देह ब्रह्मांडीचें । तें हें ज्ञान साचें ।**
**विज्ञानरूप विदेहाचें । पद पाविजें ।।२०–१–३० ।।**

३) **तुम्ही श्रोते जगदीशमूर्ती । तेथें माझी व्युत्पत्ति किती ।**
**बुध्दिहीण अल्पमती । सलगी करितों ।।१–६–१७ ।।**

४) **आपलेन ज्ञातेपणें । सकळांस शब्द ठेवणें ।**
**प्राणीमात्रांचें पाहे उणें । तो येक पढतमूर्ख ।।२–१०–५ ।।**

५) **म्हणोनी जितुका भोळाभाव । तितुका अज्ञानांचा अभाव ।**
**अज्ञानें तरी देवाधिदेव । पाविजे कैंचा ।।२०–९–११ ।।**

६) **आपण म्हणिजे मीपण । मीपण म्हणिजे जीवपण ।**
**जीवपण म्हणिजे अज्ञान । संग जडला ।।७–२–२० ।।**

७) तैसें ज्ञानाचेनि प्रकाशें । मिथ्या कल्पना हे नासे ।
मग हें तुटे आपैसें । द्वैतानुसंधान ।।७–५–३० ।।

८) ज्ञान म्हणिजे जाणणें । अज्ञान म्हणिजे नेणणें ।
विपरितज्ञान म्हणिजे देखणें । येकाचें येक ।।२०–१–२३ ।।

९) येक ज्ञान येक अज्ञान । येक जाणावें विपरीतज्ञान ।
हे त्रिपुटी होय क्षीण । तेंचि विज्ञान ।।१४–९–१६ ।।

१०) तें नुमजतांच उमजे । उमजोन कांहींच नुमजे ।
तें वृत्तीविण पाविजे । निवृत्तिपद ।।७–७–२४ ।।

११) ज्ञान आणि अज्ञान । वृत्तिरुपें हें समान ।
निवृत्तिरूपे विज्ञान । जालें पाहिजे ।। २०–१–२८ ।।

१२) अज्ञानशक्ति निरसली । ज्ञानशक्ति मावळली ।
वृत्तिशून्यें कैसी जाली । स्थिती पाहा ।। १५–१०–१२ ।।

१३) जेथें जाणपण खुंटलें । तेथें बोलणेंही तुटलें ।
हेतुरहित जालें । समाधान ।।९–४–४२ ।।

१४) वृत्तिरहित जें ज्ञान । तेंचि पूर्ण समाधान ।
जेथें तुटे अनुसंधान । मायाब्रह्मीचें ।।७–५–१४ ।।

१५) उत्पत्ति स्थिती संहार जाण । त्याहून वेगळा निरंजन ।
येथे ज्ञानाचें विज्ञान । होत आहे ।।११–९–२२ ।।

१६) जेथें अज्ञान सरे । ज्ञान तेंहि नुरे ।
विज्ञानवृत्ति मुरे । परब्रह्मीं ।।७–४–५१ ।।

१७) विज्ञानीं राहिलें ज्ञान । ध्येयें राहिलें ध्यान ।
सकळ कांहीं कार्याकारण । पाहोन सांडिलें ।।१२–३–२९ ।।

१८) जें या चराचराचें मूळ । शुध्द स्वरूप निर्मळ ।
यां नांव ज्ञान केवळ । वेदांतमतें ।।५–६–१८ ।।





१९) ऐक शुध्द ज्ञानाचें लक्षण । शुध्द स्वरूपचि आपण ।
या नांव शुध्द स्वरूपज्ञान । जाणिजे श्रोती ।। ५–६–१० ।।

२०) दृश्य पदार्थ वोळखिजे । त्यास पदार्थज्ञान बोलिजे ।
शुध्द स्वरूप जाणिजे । या नांव स्वरूपज्ञान ।।५–६–७ ।।

२१) जेथें नाहीं दृश्यभान । जेथें जाणीव हें अज्ञान ।
विमळ शुध्द स्वरूपज्ञान । यासि बोलिजे ।।५–६–५ ।।

२२) शब्दाकरितां कळे अर्थ । अर्थ पाहतां शब्द व्यर्थ ।
शब्द सांगे तें यथार्थ । परी आपण मिथ्या ।।६–१०–१९ ।।

२३) संगत्याग आणी निवेदन । विदेहस्थिती अलिप्तपण ।
सहजस्थिती उन्मनी विज्ञान । हे सप्तही येकरूप ।।४–४–८ ।।

२४) मनबुध्दी अगोचर । बुध्दीवीण अंधकार ।
जाणीवेचा पडो विसर । नेणीव खोटी ।।१४–१–७३ ।।

### – भावार्थ –

१) आपण कोण आहोत हे जाणून, सर्वत्र आपण आपल्यालाच अनुभवणे हे ज्ञानाचे लक्षण असून या ज्ञानाला आत्मज्ञान म्हणतात.

२) ब्रह्मांडातील आठवा देह – मूळमाया म्हणजेच खरे ज्ञान आहे. ज्ञानाची जाणीव नाहिशी होऊन विज्ञान झाले असता, देहीच विदेहता प्राप्त होऊन, निर्गुण ब्रह्मच तो होतो.

३) ज्ञानरूपाने आत्मा सर्वत्र भरलेला आहे. अर्थात श्रोते हो, तुम्हीही ज्ञानसंपन्न आहात. तुमच्यात जे ज्ञान आहे, तेच ज्ञान माझ्या ठिकाणी भरून राहिले आहे, हे ज्ञान होण्यासाठी आपण समजतो ती बुध्दी थोकडी आहे, हेच तुम्हाला मित्रत्वाने मला सांगायचे आहे.

४) आपल्यालाच सारे काही कळते असे समजून जो सर्वांना नावे ठेवतो, प्रत्येकाची उणीदुणी काढतो, तो पढतमूर्ख.

५) भोळ्याभावाने देव पावतो म्हणून जितका भोळाभाव जास्त, तितका तो आत्मज्ञानसंपन्न असतो, तिथे अज्ञान अभावानेच आढळते. अज्ञान असेल तर तो देवाधिदेव परब्रह्म कसा होणार ? (परमार्थातील भोळा हा व्यवहारातील भोळ्यापेक्षा वेगळा असतो. कळिकाळाला जिंकण्याचे सामर्थ्य त्या भोळ्यात असते. ''तुका म्हणे भोळा। जिंकू शके कळिकाळा ।।'' हे तुकोपनिषद हेच सांगते. तर हा भोळा पिंड ब्रह्मांडाहून निराळा असतो हे एक थोर सत्पुरुष भीमदास असे सांगतात, ''आम्ही भोळे आम्ही भोळे। पिंड ब्रह्मांडावेगळे।।'' साम्यदशा हा भोळाभाव अंत:करणाच्या निर्विकार अवस्थेत उदय पावतो, या शब्दात आमचे चिमडचे नारायणमहाराज या भोळ्या भावाचे महत्व सांगतात. ह्या भोळ्याने 'भ' ची ओळ जाणलेली असते हे ती.प.पू.मामामहाराज केळकर अमृतवाणीत असे सांगतात, ''भ ची ओळ भोळा भाव। ओळ देही दावी ठाव।।'' समर्थशिष्य भोळाराम हे भोळे होतेच की, पण त्यांचा पारमार्थिक अधिकार सर्वश्रूत आहे.)

६) आपण म्हणजे मीपणा, मीपणा म्हणजे जीवपणा, व जीवपणा हेच अज्ञान. या अहंकाराचाच संग जीवास झाला आहे.

७) आत्मज्ञानाचे प्रकाशाने वेगळेपणाची खोटी कल्पना – अज्ञानाचा अंधार नाहिसा होतो व मग हे द्वैताचे अनुसंधान आपोआपच सुटते.

८ व ९) आपण आपल्यालाच पाहणे – जाणणे हे ज्ञान, तर आपला आपल्याला विसर पडणे हे अज्ञान, तर एकच असताना दुसरे पाहणे, हे विपरितज्ञान होय. या विपरितज्ञान, अज्ञान, ज्ञान या त्रिपुटीचा निरास झाला असता विज्ञान प्रगट होते.

१०) ज्ञान झाले असून ज्ञानाची जाणीव नसेल (नुमजून) तरच ते उमजते. याउलट ज्ञान झाले असून त्या ज्ञानाची जाणीव असेल (मला समजले, उमजले ही भावना) तर ते उमजत नाही. ते निवृत्तीपद वृत्तीरहित होऊनच प्राप्त होते.





११) ज्ञान आणि अज्ञान वृत्तीरूपाने दोन्ही सारखेच आहे. या दोन्ही वृत्ती नाहिशा होऊन – निवृत्ती होऊन ज्ञानाचे विज्ञान झाले पाहिजे.

१२ ते १५) अज्ञानवृत्ती नाहिशी होऊन, ज्ञानाची मला कळले ही वृत्ती नाहिशी झाल्यावर– निवृत्ती आल्यावर, आत्म्याचे चंचळपण नाहिसे होते व तो महात्मा देहीच विदेही होतो. नि:शब्द परब्रह्मरूप होऊन तो नि:शब्द होतो. त्याला निर्हेतुक समाधान प्राप्त होते. याठिकाणी तुर्यावस्थेत असणारे मायाब्रह्माचे अनुसंधान संपते. निरंजन परब्रह्माचे ठिकाणी उत्पत्ती, स्थिती, लय हे विकार असत नाहीत.

१६) परब्रह्माचे ठिकाणी अज्ञान चालत नाही, ज्ञान टिकत नाही. विज्ञानवृत्ती (अनुभव) सुध्दा ठायीच मुरून जाते.

१७) विज्ञानप्राप्ती झाल्यावर ज्ञानाची उर्मी नाहिशी होऊन, केवळ ज्ञानस्वरूप राहिले. ध्येय साध्य झाल्यावर वेगळ्या ध्यानाची गरज राहिली नाही, कार्य साध्य झाल्यावर कारणाचे कारण रहात नाही.

१८) या चराचराचे मूळ असे जे शुध्द निर्मळस्वरूप आहे, त्यालाच वेदांतमताप्रमाणे केवळज्ञान असे संबोधतात.

१९) शुध्दस्वरूपच – चराचराचे मूळच आपण आहोत हे जाणणे, हे शुध्द ज्ञानाचे लक्षण असून या ज्ञानाला 'शुध्दस्वरूपज्ञान' असे म्हणतात. हे श्रोत्यांनी लक्षात घ्यावे.

२०) दृश्य पदार्थ जाणणे याला पदार्थज्ञान, तर शुध्दस्वरूप होणे याला स्वरूपज्ञान म्हणतात.

२१) जेव्हा 'मी ब्रह्म आहे' (सोहं) ही जाणीव नाहिशी होते, तेव्हा दृश्याचे भान संपूर्ण नाहिसे होते व सर्व जग ब्रह्मरूप असल्याची जाणीव निर्माण होते. ही

एकपणाची जाणीव हे अज्ञान जेव्हा विरते तेव्हा जे होते त्याला 'विमलशुध्दस्वरूपज्ञान' म्हणतात.

२२) शब्द – देह – दृश्य – माया आहे म्हणून आत्म्याचे ज्ञान होऊ शकते. आत्मज्ञान झाले की शब्द – देह – दृश्य – माया हे अर्थशून्य वाटतात. शब्दाच्या मागे – देहाच्या मागे – दृश्याच्या मागे दडलेला अर्थ – आत्मा – हा सत्य असतो पण शब्द – देह – दृश्य – माया हे सारे असत्य असते.

२३) संगत्याग – अहंपणा टाकणे, निवेदन – परमात्मरूप होणे, विदेहस्थिती – देहाला सुटून असणे, अलिप्तपणा – संसारात असून नसल्यासारखे असणे, सहजस्थिती – निर्हेतूक सत्क्रिया आचरणे, उन्मनी – मनाचे मनत्व न उरणे, विज्ञान – ज्ञान असून, ज्ञानाची जाणीव नसणे ही अवस्था, या सातही अवस्था एकरूपच आहेत.

२४) परब्रह्म हे मनाला व बुद्धीला आकलन होत नाही. मन, बुद्धी तेथपर्यंत पोहचू शकत नाही. जगासह जगाचे ज्ञान लोपल्यावर राहणारे निजत्वाचे ज्ञान जाणणारी जी बुद्धी आहे, देहांती – चत्वारदेह निरसनाअंती जी नवलबुद्धी – प्रज्ञा आहे, तिला परमात्मा आकलन होतो. तिच्याशिवाय सारा अंध:कारच आहे. ज्ञानच नसणे हे काही कामाचे नाही, तर ज्ञान असून ज्ञानाची जाणीव नसणे हेच इथे महत्त्वाचे. सगळ्या जाणीवा गेल्यावर जी नेणीव शिल्लक राहते, त्या नेणीवेचे ज्ञान असले की नेणीव खोटी ठरते. नेणीवेची जाणीव असणे – झोपेत जागे असणे हे ज्ञान. या जाणीवेचा विसर म्हणजेच झोप लागणे नव्हे, तर परब्रह्मस्वरूप होवून – विज्ञानरूप होवून ही जाणीव न राहणे. ही अवस्था – अनुभव शब्दात सांगता येणार नाही. जाणीवेची नेणीव होण्यासाठी – जाणीवेचा विसर होण्यासाठी आधी नेणीवेची जाणीव होणे गरजेचे आहे.

卐 卐 卐

## भेदाभेद

वरवर उपाधीकडेच जर आपण पाहिले तर भेद हा आहेच. अंतरंगात पाहिले तर मात्र भेद नाही. आपण कुठे पाहतो त्यावर सारे काही आहे.

आमचे लक्ष उपाधीकडे असल्याने आम्हाला भेद जाणवतो. जोवर आम्हाला आकार दिसतो आहे, तोवर भेद हा राहणारच. **''आकार पहाणे द्वैताचे देखणे । विसरुन राहणे आपणासी''** हे दासराममहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे असे आहे. संतांना आकार दिसत नाही. त्या आकारामागे निराकार गुप्तरूपाने असणाऱ्या अद्वय चैतन्याचेच ज्ञान संतांना होते. या वैष्णवांना सर्व जग विष्णुमयच दिसत असते. मग अमंगळ भेदाभेदाचा स्पर्श त्यांना कसा होईल ? **''विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।।''** ही तुकोक्ती व **''म्हणोनि विश्व भिन्न । परि न भेदे तयांचें ज्ञान ।। जैसे अवयव तरी आन आन । परि एकेचि देहींचे ।।''** हे ज्ञानेशवचन हे स्पष्ट करणारेच आहे.

हे विश्वात भरून राहिलेले चैतन्य आम्हास केव्हा जाणवेल हो ? जेव्हा आमच्या आत असणाऱ्या चैतन्याची जाणीव आम्हाला होईल तेव्हा. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, **''म्हणोनि आपणपें विश्व देखिजे । आणि आपण विश्व होईजे । ऐंसे साम्यचि एक उपासिजे । पांडवा गा ।।''** हे विश्वातले आणि आपल्यातले असणारे साधर्म्यच हा भेद नाहिसा करणारे आहे.

उपाधीभेद हा राहणारच. मिरची ही तिखट राहणार. ती कधीही गोड होणार नाही. साखर ही गोडच राहणार. ती कधीही कडू होणार नाही. पण सर्वत्र सारखे असणारे चैतन्य, तेथे मात्र अणुमात्र भेद नाही. नाथ महाराज म्हणतात, **''तुझ्या निजस्वरूपाच्या ठायीं । भेदाची तव वार्ताही नाहीं । तेथील शुभाशुभ काहीं । तुज सर्वथा पाहीं स्पर्शेना ।।''** समर्थ श्रीरामकृपेची वचने याबददल काय म्हणतात ते आता पाहू.



|| ती हा दासबोध ||

**१) भेद ईश्वर करून गेला । त्याच्या बाचेन न वचे मोडिला ।**
**मुखामध्यें घांस घातला । तो अपानीं घालावा ।।१७-४-२७ ।।**

**२) सकळ करणें ईश्वराला । म्हणोनि भेद निर्माण केला ।**
**उर्ध्वमुख होतां भेदाला । ठाव कैंचा ।।२०-८-१६ ।।**

**३) अधोमुखें भेद वाढतो । उर्ध्वमुखें भेद तुटतो ।**
**नि:संगपणें निर्गुणी तो । महायोगी ।।२०-३-२२ ।।**

**- भावार्थ -**

१) वास्तविक भेद हा ईश्वरानेच निर्माण केला आहे, तो कोणाच्या बापालाही नाहिसा होणार नाही. जगात हा जो मायेतील भेद आहे तो भेद रहाणारच. तोंडाचे काम कधीही गुदद्वाराला करता येणार नाही.

२) विविध कार्य करणेसाठी विविधता हा उपाधीभेद ईश्वराने निर्माण केला पण जीवन उर्ध्वमुख - अंतर्मुख झाले असता, सर्व उपाधीमध्ये गुप्तरूपाने असणारे एकच एक चैतन्य अनुभवाला येते व हा भेद नाहिसा होऊन, अभेदत्व प्रत्ययाला येते.

३) जीवन अधोमुख आहे तोवर आपण व परब्रह्म यातील भेद वाढतो, तर उर्ध्वमुख झाले असता, 'प्राणापान उर्ध्वची वाहता' असे झाले असता हा भेद नाहिसा होतो. गुणातीत होऊन - जाणीवनेणीवरहित होऊन - सर्व संग सोडून, निर्गुणी तादात्म्य होतो, तो महायोगी होय.

卐 卐 卐

## भ्रम

भ्रम म्हणजे विपरित ज्ञान. आपल्याला जागृती, स्वप्न या विपरीत ज्ञानाच्या अवस्थेत जे ज्ञान होते त्याला भ्रम – विपरित ज्ञान म्हणतात. सर्व जग हे ब्रह्मरूप असताना ब्रह्म न पाहताना नाना आकारानी जगाची प्रचिती येणे हा भ्रम.

**''नानाकारे जगाची प्रचिती । तेचि मुख्यत्वे सोलीव भ्रांती ।**
**ते भ्रांतीची निजस्थिती । ऐक तुजप्रती सांगेन ।।''**
**''जग देखणे परमभ्रम । जग न देखणे परब्रह्म ।**
**हे ज्ञानगुह्य निजवर्म । तू पुरुषोत्तम परमात्मा ।''**

ही नाथवचने व **''तें आघवेचि दिसणे । जयातें का न देखणे । विश्व भासतसे जेणें । लपालेनी ।।''** हे ज्ञानेशवचन, ही संतवचने भ्रम म्हणजे काय हे स्पष्ट करणारीच आहेत.

जगामध्ये एक चैतन्य भरून राहिले असताना दुसरे काहीतरी पाहणे हा भ्रम. वाराच देव आणि वाराच भक्त असे असताना देवाला आपल्यापेक्षा वेगळे मानून त्याची वेगळेपणाने उपासना करणे हा भ्रम.

**''भ्रमेणाहं भ्रमेणत्वं भ्रमेणोपासकोजना: ।**
**भ्रमेणेश्वर भावत्वं भ्रम मूलमिदं जगत ।।''**

हा भावार्थ रामायणातील श्लोक हेच स्पष्ट करतो. नाथ महाराज हेच असे सांगतात,

**''देव भक्त दोनी भिन्न । ऐसे जे का उपासन ।**
**ते ज्ञानाचे मुख्य अज्ञानपण । सुक्ष्म भ्रम पूर्ण अतर्क्यत्वे ।।''**

जोवर अज्ञानाचे ज्ञान होत नाही – झोपेत जागे राहता येत नाही – नेणीवेची जाणीव होत नाही, तोवर हा विपरितज्ञानाचा कोंब फुटतच राहतो, त्यामुळे संसरण–संसार नाहिसे होत नाही.





**''जव आज्ञान न फिटे । तव संसार नि:शेष न तुटे ।**
**विपरीत ज्ञानाचा कोंभु फुटे । माघौता म्हणौनि ।।''**

हे मुकुंदराजांचे सांगणे, याला प्रमाण आहे. झोपेत जागे राहणे अर्थात जागृतीतही स्वरूपाचे अनुसंधान असणे, तिन्ही अवस्थांची एक अवस्था होणे हे साधनाने साध्य झाल्यावर विपरीत ज्ञान – भ्रम नाहिसा होणारा आहे. समर्थ श्रीरामकृपेची वचने याबद्दल काय सांगतात ते आता पाहू.

१) **जें जें रूप आणि नाम । तो तो अवघाचि भ्रम ।**
**नामरूपातीत वर्म । अनुभवें जाणावें ।।६–२–१३ ।।**

२) **वस्तु आपणापासीं असतां । गेली म्हणोनि होय दुश्चिता ।**
**आपलें आपण विसरतां । या नांव भ्रम ।।१०–६–१८ ।।**

३) **मी तूं हा भ्रम । उपासना हाही भ्रम ।**
**ईश्वरभाव हाही भ्रम । निश्चयेंसी ।।१०–६–११ ।।**

४) **येक अस्तां येक वाटे । येक सांगतां येक निवटे ।**
**येक दिसतां येक उठे । या नांव भ्रम ।।१०–६–२३ ।।**

५) **भ्रमरूप विश्व स्वभावें । तेथें काय म्हणोनी सांगावें ।**
**निर्गुण ब्रह्मावेगळें आघवें । भ्रमरूप ।।१०–६–३६ ।।**

**– भावार्थ –**

१) ज्याचा ज्याचा नाम व रूप याने निर्देश होतो, ते ते सारे भ्रमरूपच आहे. नामरूपातीत असणारा अनंत, अनुभवाने जाणावा.

२) आपला आपल्याला विसर पडल्याने, वस्तु (चैतन्य) आपणापाशी असताना, ती आहे की हरविली आहे, या विचाराने दु:खी व्हावे हा भ्रम.

३) वस्तुत: परमेश्वरापेक्षा वेगळे काही नसताना, मी कोणीतरी वेगळा आहे व माझ्यापेक्षा परमेश्वर (तू) कोणी वेगळा आहे हे मानणे हा भ्रम. अर्थात मी कोणी जो आहे, तो वेगळेपणाने परमेश्वराची उपासना करतो हाही एक भ्रमच. वेगळेपणा असेल तर उपासना, वेगळेपणा नसल्याने उपासना हाही भ्रमच. भक्त हा वेगळा मानल्याने, ईश्वराला वेगळे मानणे हाही भ्रमच.

४) ब्रह्म असताना मायाच भासमान होणे, ब्रह्माचे वर्णन शब्दात कितीही सांगितले तरी बोध मायेचाच होणे, वस्तुत: चैतन्यच चैतन्याला पहात असून, ज्ञान उपाधीचेच – देहाचेच होणे, हा सारा भ्रमच.

५) हे सारे डोळ्याला दिसणारे, मनाला भासणारे भ्रमरूप आहे. कशाकशाचे नाव सांगावे ? थोडक्यात एका निर्गुण ब्रह्माशिवाय बाकीचे सारे भ्रमरूपच आहे.

卐 卐 卐

## ब्राह्मण

संतवाङ्मयात ज्या ब्राह्मणांचे वर्णन आले आहे, ते आम्ही समजतो त्या ब्राह्मणांचे आहे का ? हा मोठा प्रश्न आहे. आम्ही जे ब्राह्मण समजतो, ते त्या पध्दतीचे आहेत का ? नाहीत ना ? मग ते त्यांचे वर्णन कसे असेल ?

ब्राह्मण ही जात नसून ती पदवी आहे. ती पदवी त्या पदावर बसूनच कोणासही प्राप्त करून घेता येते. अशा पदावर बसून पदवी घेतलेल्या ब्राह्मणाचे वर्णन संतवाङ्मयात आले आहे. अहो जन्माला आलेला जीव हा शूद्रच असतो, त्याच्यावर संस्कार केले की त्याचा दुसरा जन्म होतो, द्विज होतो. संस्काराप्रमाणे कर्म केले की तोच विप्र होतो व ब्रह्म जाणले – ब्रह्मरूप झाला की तोच ब्राह्मण होतो. **''जन्मना जायते शुद्रः। संस्कारात् द्विज उच्यते। कर्मणा याती विप्रत्वं। ब्रह्म जानाति ब्राह्मणः।।''** हे वचन हेच स्पष्ट करणारे आहे.

देव जाणला नाही तर त्या ब्राह्मणपणाला काहीही अर्थ नाही, असे भ. स. तात्यासाहेब महाराज कोटणीस खालील पदात स्पष्ट करत आहेत, **''सांगा तुम्ही ब्राह्मण देव कोणे ठायी। देव ठावा नसता ब्राह्मणपण नाही।।''** जात पात कुठपर्यंत? ब्रह्म जाणेपर्यंत –ब्रह्मरूप होईपर्यंत. (जिवंत असतानाच ब्रह्मरूप व्हायचे असते) एकदा का ते ब्रह्मरूप झाले की ते ब्राह्मणच. **''तैसे क्षत्री, वैश्य, स्त्रिया। कां शुद्र अंत्यजादि इया। जाती तंवची वेगळालिया। जंव न पवती माते।।''** हे स्पष्ट करणाऱ्या या ज्ञानेशवचनात बाकी सर्व जातींचा उल्लेख आहे. फक्त ब्राह्मणांचा का उल्लेख नाही ? कारण ब्राह्मण ही पदवी आहे. ती कोणत्याही जातीच्या, वर्णाच्या माणसाला ब्रह्मरूप होऊन प्राप्त करून घेता येते हे त्यांना दाखवायचे आहे.अशा बह्मरूप झालेल्या ब्राह्मणांचे वर्णन, ज्ञानेश्वरमहाराज असे करतात,

**''ऐसे पूण्य पूज्य जे ब्राह्मण। आणि माझां ठायीं अतिनिपुण।**
**आता मातें पावती हें कवण। समर्थणें।।''**





**''मग वर्णामाजी छत्रचामर। स्वर्ग जयांचे अग्रहार।**
**मंत्रविद्येसि माहेर। ब्राह्मण जे ।।''**
**''म्हणोनि राजर्षि कां ब्राह्मण। जया गती मती मीचि शरण।**
**तयां त्रिशुध्दी मीचि निर्वाण। स्थितिही मीचि।।''**

तर नाथमहाराज या ब्राह्मणांचे वर्णन असे करतात,

**''जे ज्ञानघनें अतिसंपन्न। परमपवित्र विज्ञानें जाण।**
**ऐसे ब्रह्मभूत जे ब्राह्मण। यज्ञद्वारा यजन करिती माझे।।''**
**''तेवीं आत्मतत्व एकचि जाण। अविकारी निजनिर्गुण।**
**तेथ नाना तत्वांचे व्याख्यान। बोलती ब्राह्मण मायायोगें।।''**

समर्थ श्रीरामकृपेची वचने या ब्राह्मणांबद्दल काय सांगतात हे आता पाहू.

१) **जया अंतरीं भगवंत। अचळ राहिला निवांत।**
**तो स्वभावें जें बोलत। ते ब्रह्मनिरूपण।।१४–३–२५।।**

२) **करिती ब्रह्मनिरूपण। जाणती ब्रह्म संपूर्ण।**
**तेचि जाणावे ब्राह्मण। ब्रह्मविद।।६–४–२४।।**

३) **ब्राह्मण वेद मूर्तिमंत। ब्राह्मण तोचि भगवंत।**
**पूर्ण होती मनोरथ। विप्रवाक्येंकरूनि।।५–१–१२।।**

४) **ब्राह्मणाची मुख्य दीक्षा। मागितली पाहिजे भिक्षा।**
**ॐ भवति या पक्षा। रक्षिलें पाहिजे।।१४–२–१।।**

५) **भिक्षेऐसें नाहीं वैराग्य। वैराग्यापरतें नाहीं भाग्य।**
**वैराग्य नसतां अभाग्य। येकदेसी।।१४–२–१९।।**

६) **भिक्षा मागोन जो जेविला। तो निराहारी बोलिला।**
**प्रतिग्रहावेगळा जाला। भिक्षा मागतां।।१४–२–२।।**

७) **आतांचे ब्राह्मणीं काय केलें। अन्न मिळेना ऐसें जालें।**
**तुम्हा बहुतांचे प्रचीतीस आलें। किंवा नाहीं।।१४–७–३९।।**

**– भावार्थ –**

१) जो शरीराच्या उपाधीत भगस्थानी – विवरस्थानी राहतो, अशा आत्मदेवाला समर्थांनी परमेश्वर – भगवंत अशा निरनिराळ्या नावांनी संबोधले आहे. हा आत्मदेव चंचळ वायुरूप असून याचा साक्षात्कार ज्याला महाकारणदेहात वेगळेपणाने होतो – ज्याला या भगवंताचा अनुभव येतो, त्याला संतांनी 'देही' असे संबोधले आहे. महाकारणदेहातील 'मी अमुक आहे' ही एकमेव असणारी जाणीव लोप पावली असता – ज्ञानाचे विज्ञान झाले असता – मनाचे उन्मन झाले असता, निवांत अवस्थेत आत्म्याचे चांचल्य नाहिसे होऊन तो अचळ राहिला असता, जाणीवनेणीवेच्या पलिकडे तो ब्रह्मरूप होतो – तो विदेही होतो. मग तो जे स्वभावे बोलतो, ते सारे ब्रह्मनिरूपणच असते.

२) असे ज्यांनी ब्रह्म संपूर्णपणे जाणले आहे, जे महात्मे ब्रह्मरूप झालेले आहेत, ते जे बोलतात ते ब्रह्मनिरूपणच असते, अशांना समर्थ 'ब्राह्मण' म्हणतात.

३) असे भगवद्रूप झालेले ब्राह्मण हे मूर्तिमंत वेदच – ज्ञानच असतात. त्यांच्या आशिर्वादाने सर्व मनोरथ पूर्ण होतात.

४) अशा भगवद्रूप झालेल्या ब्राह्मणांचे देहाकडे लक्ष असत नाही. ते देहभरणाची चिंता करीत नाहीत. 'दैवास्तव देहाचे पालन' हा त्यांचा निश्चय असतो. पण घोड्याकडून काम करून घ्यायचे म्हणजे त्याला चंदी वैरण केले पाहिजे, म्हणून ब्राह्मणांनी देहभरणाकरिता भिक्षा ही मागितलीच पाहिजे. मौजीबंधनाचेवेळी स्वीकारलेल्या 'ॐ भवति भिक्षां देही' या व्रताचे पालन केले पाहिजे.

५) अंगी वैराग्य असल्याशिवाय परमार्थ घडत नाही. म्हणून वैराग्याहून श्रेष्ठ भाग्य नाही. याकरिता वैराग्य नसेल तो अभागी. म्हणून वैराग्यप्राप्तीकरिता भिक्षा मागितली पाहिजे.





६) जो भिक्षा मागून उदरनिर्वाह करतो, तो निराहारीच समजला जातो. भिक्षा मागितल्याने दान ग्रहणाचा दोष त्याला लागत नाही.

७) आता जे स्वत:ला ब्राह्मण समजतात – ब्रह्म जाणले आहे असे समजतात, त्या ब्राह्मणांनी 'काय नोहे केले' असे न करताना – शरीरभाव उणा न करताना, 'काय केले' – शरीरभाव घट्ट केला, म्हणून त्याना ज्ञान अन्न प्राप्त होत नाही – आत्मज्ञान होत नाही. ही त्यांची अवस्था आपण आता अनुभवत आहोत की नाही ?

卐 卐 卐

## सिध्द

साधनाच्या अभ्यासाने पूर्णावस्थेस पोहोचलेल्या साधकाला सिध्द म्हणतात. परमार्थातील ही अखेरची स्थिती आहे. त्यानंतर त्या सिध्दाला मिळवायचे असे काही उरत नाही. त्याच्या सर्व इच्छा मनोरथे पूर्ण झालेली असतात. जीवनाला कृतार्थता प्राप्त झालेली असते. ज्ञानेश्वरमहाराज या सिध्दाचे वर्णन असे करतात, **''तरी होऊनियां कृतार्थ । राहिले सिध्दाचे मनोरथ । तैसे जयाचे हात । निर्व्यापार ।।''**

पण आजकाल प्रसिध्दीच्या मागे लागलेल्या, आमच्यासारख्या जीवांना सिध्द व्हावयास वेळ लागतच नाही. आज अनुग्रह घेतला की झाला साधक (समर्थांनी वर्णिलेला साधक पहा), जरा शब्दज्ञान झाले, पेपरला नाव आले, प्रसिध्द झाला, की झाला सिध्द. इतका सोपा बोलघेवडा परमार्थ नाही आहे. हे असले सिध्दपणाचे सोंग परमार्थात टिकत नाही. समर्थ पंचसमासीत म्हणतात,

**''शब्दज्ञान हातासी आलें । मीं सीध ऐसें कल्पिलें ।**
**बळेंचि धारिष्ट धरिलें । सीधपणाचें ।।**
**तें धारिष्ट अंती उडे । प्राणी महा संशई पडे ।**
**सेखी जन्ममृत्य घडे । भोगणें संशयें ।।''**

अहो, साधन केल्याशिवाय देहभाव जात नाही, संशय जात नाही, अनुभव येत नाही, हे त्रिवार सत्य आहे. मग साधनेवाचून असणारी बडबड ही काय कामाची? **''अनंत वाचाळ बरळती बरळ । त्या कैसा दयाळ पावे हरी ।।''** ज्ञानेश्वरमहाराज या आमच्या बडबडीला 'बरळ' असे म्हणतात, कारण ती अनुभवावाचून असते.

बरे साधन करून सिध्द झाला, आपल्याला वाटते सिध्द झालो, आता साधनाची गरज नाही, असे इथे अध्यात्मात असत नाही, जेवढी वरची पदवी,





तेवढे साधन जास्त. अहो, ते सिध्द सर्वकाळ साधनातच असतात. समर्थ म्हणतात,

**''जो सीधांचा हि सीध । ज्ञानवैराग्यें प्रसीध ।**
**सामर्थ्येसिंधु अगाध । कैलासराणा ।।''**
**तो सीध परी करी साधन । सर्वकाळ रामचिंतन ।**
**ध्यानधारणा अनुष्ठान । चुकोंचि नेदी ।।**
**ऐसे अपार माहांमति । जाले तरी साधन करिती ।**
**तेथे मानव तें किती । बापुडें किंकर ।।''**

सिध्दांचे सिध्द भगवान शंकर अजून साधन करत आहेत, अजून मोक्षमार्गाचा प्रवास त्यांचा सुरु आहे.

**''प्रवृत्तितरुच्या बुडी । दिसती निवृत्तीफळाचिया कोडी । मोक्ष मार्गीचा कापडी । महेशु अजुनी ।।''** हे ज्ञानेशवचन हे स्पष्ट करणारे आहे. अहो तुकाराम महाराज देवरूप झाले – पांडुरंग झाले तरी त्यांनी मूळस्वभाव – भजन सोडले नाही. मग आपण साधन न करणाऱ्यांनी साधन करावयास सुरुवात तरी करायला नको का ?

समर्थ श्रीरामकृपेची वचने सिध्दवर्णन काय करतात ते आता पाहू.

१) **संदेहरहित साधन । तेंचि सिध्दाचें लक्षण ।**
**अंतर्बाह्य समाधान । चळेना ऐसें ।। ८–९–१३ ।।**

२) **संशयरहित ज्ञान । तेंचि साधूचें लक्षण ।**
**सिध्दाआंगीं संशय हीन । लागेल कैंसा ।।५–१०–१३ ।।**

३) **सिध्दस्वरूपीं नाहीं देहों । तेथें कैंचा हो संदेहो ।**
**याकारणें सिध्द पाहा हो । नि:संदेही ।।५–१०–४१ ।।**

४) **स्वरूप होऊन राहिजे । तया नांव सिध्द बोलिजे ।**
**सिध्द स्वरूपींच साजे । सिध्दपण ।।८–९–४ ।।**

**५) साधु वस्तु होऊन ठेला । संशय ब्रह्मांडाबाहेरी गेला ।**
**निश्चये चळेना ऐसा जाला । या नांव सिध्द ।।५–१०–१० ।।**

**– भावार्थ –**

१) आयुष्याची वाटचाल आपण ज्या साधनाने करतो, त्या श्वासोच्छ्वासातील पंचमहाभूतांचा व त्यांचे चार देह यांचा निरास होणे – साधन संदेहरहित होणे हेच सिध्दाचे लक्षण आहे. अशा सिध्दांना वृत्तीरहित ज्ञानाने अंतर्बाह्य कधीही भंग न पावणारे समाधान प्राप्त होते.

२) चत्वार देह निरसनाअंती राहणारे संशयरहित वृत्तीरहित ज्ञान हेच साधुचे लक्षण आहे. तर सिध्द पुरुषांच्या अंगी संशयासारखा हीन दोष असेल का ?

३) सिध्द हे स्वरूपाचे ठिकाणी असतात. देहात ते असत नाहीत, मग कुठला संदेह असणार ? (देहाची जाणीव असेल तरच संदेह असतो) म्हणून सिध्द हे सतत नि:संदेहीच असतात.

४) जे स्वरूपाकार झालेले असतात, त्यांना सिध्द म्हणतात. स्वरूपाचे ठिकाणी सिध्द असणाऱ्यांनाच सिध्दपण शोभते.

५) निश्चयाने अंत:करणातील सर्व कल्पना नाहिशा होऊन, निर्विकल्प अवस्थेत सकल संदेह निवृत्ती होऊन, जो साधु वस्तुरूपच झालेला आहे, त्याला सिध्द म्हणतात.

卐 卐 卐

## परब्रह्म

जे आकाश वेगळेपणाने अनुभवता येत नाही, असे उपाधीरहित आकाश – गगन म्हणजेच परब्रह्म. परब्रह्म हे नित्य असून सत्य आहे. **''नित्यत्वेकं ब्रह्म''** हे उपनिषदवचन **''तो नित्यरुप पार्था''** हे ज्ञानेशवचन तर **'ब्रह्मं सत्यं जगन्मिथ्या'** हे आचार्यांचे सांगणे याला प्रमाण आहे. परब्रह्माचे वर्णन नाथमहाराज असे करतात.

**''त्या आकाशाशी अलिप्त । जे क्षराक्षराशी अतीत ।**
**ते अक्षर परब्रह्म सदोदित । त्रिगुणातीत चिन्मात्र ।।''**

तर मुकुंदराज असे करतात,

**''द्रष्टा दृश्ये दर्शन । हे त्रिपुटी जेथ क्षीण ।**
**तें परब्रह्म जाण । अनिर्देश्य ।।''**
**''ज्ञान म्हणों तऱ्ही नाहीं जाणीव ।अज्ञान म्हणों तरी नाहीं नेणीव ।**
**आभाव म्हणों तऱ्ही नवल ठेव । आनंदाची ।।''**
**''जें ध्यानेंवीण ध्याइजें । जें चिंतिणेंवीण चिंतिजे ।**
**जें जाणणेंवीण जाणिजें । तें परब्रह्म गा ।।''**
**''तें ज्ञानाज्ञाना वेगळ । तें परमज्ञान केवळ ।**
**तें स्वयंज्योति निर्मळ । परब्रह्म ।।''**
**''जें जें मने जाणिजे । तें तें परब्रह्म नोहिजे ।**
**मनांतेही प्रकाशिजे । प्रकाशें तेथिचेनी ।।''**

परब्रह्म हे इंद्रियांना जाणवणारे नसून जीवनातील अहंकार नाहिसा होऊन, कल्पनेचा निरास झाला असता, 'सोहं तेही अस्तावले' या अवस्थेत स्वानुभवाने परब्रह्म आकलन होते. हा अनुभव नि:शब्द असून, शब्दात तो सांगता येत नाही. 'शब्देवीण संवादिजे' असेच ते आहे. नाथमहाराज सांगतात,





**''ब्रह्म इंद्रिया गोचर नसे । गुण गेलिया डोळा दिसे ।**
**हे अनुभव्यासीचि भासे । बोलावें ऐसें तें नव्हे ।।''**

तर मुकुंदराज असे सांगतात,

**''म्हणौनि अहंकारू गळे । कल्पना किरु मावळे ।**
**तैंच ब्रह्म आकळे । स्वानुभवासि पैं।।''**

स्वानुभवाने ब्रह्मरूप झालेले महात्मे कसे असतात ते नाथमहाराज असे सांगतात,

**''जग अवघे ब्रह्म पूर्ण । तेथ कैचे दोषगुण ।**
**ऐसे कां जे ज्ञानसंपन्न । त्या दोषदर्शन असे ना ।।''**
**''भूती पाहता भगवद्भाव । कामक्रोधासी कैचा ठाव ।**
**ऐसा ज्याचा निजसद्भाव । तोची स्वयमेव परब्रह्म ।।''**

तर केशवस्वामी असे सांगतात,

**''स्वयंब्रह्म जो आपणची झाला । देव मस्तकी वंदिती त्याला ।।धृ ।।**
**ज्याच्या दृष्टीस सृष्टी नाही । देही असून पूर्ण विदेही ।।१ ।।**
**जेथे जाणीव नेणीव नाही । तेथे काहीच उरले नाही ।।२ ।।**
**ब्रह्म होऊनी ब्रह्मीच खेळे । केशव त्याच्या चरणी लोळे ।।३ ।।''**

समर्थ श्रीरामकृपेची वचने परब्रह्माबद्दल काय सांगतात हे आता पाहू.

१) **ब्रह्मा विष्णु आणी हर । त्यांसी निर्मिता तोचि थोर ।**
**तो वोळखावा परमेश्वर । नाना यत्नें करोनी ।।६–१–१२ ।।**

२) **तो देव ठाईं पडेना । तरी यमयातना चुकेना ।**
**ब्रह्मांडनायक चोजवेना । हें बरें नव्हे ।। ६–१–१३ ।।**

३) **जें चळेना ना ढळेना । जें तुटेना ना फुटेना ।**
**जें रचेना ना खचेना । परब्रह्म तें ।। ६–३–४ ।।**

४) **जें दिसेना ना भासेना । जें उपजेना ना नासेना ।**
**जें येईना ना जाईना । परब्रह्म तें ।। ६–३–३ ।।**

५) ब्रह्म म्हणिजे निराकार । गगनासारिखा विचार ।
विकार नाहीं निर्विकार । तेंचि ब्रह्म ।। ११–४–१ ।।

६) अरे जें आकारासी येतें । तें अवघेंच नासोन जातें ।
मग गलबल्यावेगळें तें । परब्रह्म जाणावें ।। १८–८–१८ ।।

७) जें जें कांहीं साकार दिसें । तें तें कल्पांती नासे ।
स्वरूप तें असतचि असे । सर्वकाळ ।।९–२–१ ।।

८) दृष्टीस दिसे तें निरसे । येतद्विषईं श्रुति असे ।
म्हणोन जें दृष्टीस दिसे । तें स्वरूप नव्हे ।।९–२–८ ।।

९) दृश्यास दिसे तें दृश्य । मनास भासे तो भास ।
दृश्यभासातीत अविनाश । परब्रह्म तें ।। १४–९–१९ ।।

१०) दृष्टीस दिसे मनास भासे । तितुकें काळांतरीं नासे ।
म्हणोनि दृश्यातीत असे । परब्रह्म तें ।। ६–८–४७ ।।

११) निश्चळ तें परब्रह्म । जेथें नाही दृश्यभ्रम ।
विमल ब्रह्म ते निर्भ्रम । जैसें तैसें ।। १३–७–१० ।।

१२) अस्थींचा देहीं मांसाचा डोळा । पाहेन म्हणे ब्रह्माचा गोळा ।
तो ज्ञाता नव्हे आंधळा । केवळ मूर्ख ।। ६–८–४६ ।।

१३) अष्टदेह थानमान । जाणोन जालियां निरसन ।
पुढें उरे निरंजन । विमळ ब्रह्म ।। ११–९–२३ ।।

१४) देहचि होऊन राहिजे । तेणें देहदुःख साहिजे ।
देहातीत होतां पाविजे । परब्रह्म तें ।। ८–८–२५ ।।

१५) आधीं देखिला देहधारी । मग पाहावें जगदंतरीं ।
तयाचेनियां उपरी । परब्रह्म पावे ।।११–९–२०।।

१६) परब्रह्म म्हणिजे सकळांपरतें । तयास पाहतां आपणचि तें ।
हें कळे अनुभवमते । सद्गुरु केलियां ।।९–१–२९ ।।



|| ती ह्या दासबोध ||

१७) सद्रुप चिद्रुप आणि तद्रुप । स्वस्वरूप म्हणिजे आपलें रूप ।
आपलें रूप म्हणिजे अरूप । तत्वनिरसनाउपरी ।। १३–२–३० ।।

१८) ब्रह्म सर्वासी व्यापक । ब्रह्म अनेकीं येक ।
ब्रह्म शाश्वत हा विवेक । बोलिला शास्त्रीं ।। ७–२–२ ।।

१९) भूगोळ आहे ब्रह्मामध्यें । ब्रह्म आहे भूगोळामध्यें ।
पाहतां येक येकांमध्यें । प्रत्यक्ष दिसे ।। ९–९–५ ।।

२०) आकाशाबाहेरी पळों जातां । पुढे आकाशचि तत्वतां ।
तैसा तया अनंता । अंतचि नाहीं ।। ७–४–७ ।।

२१) पंचभूतांमध्यें वास । म्हणोन बोलिजे आकाश ।
भूतांतरीं जो ब्रह्मांश । तेचि गगन ।। ९–९–२१ ।।

२२) घटीं व्यापक जें आकाश । तया नांव घटाकाश ।
पिंडी व्यापक ब्रह्मांश । त्यास जीवात्मा बोलिजे ।। ८–७–४९ ।।

२३) मठीं व्यापक जें आकाश । तया नांव मठाकाश ।
तैसा ब्रह्मांडीं जों ब्रह्मांश । त्यास शिवात्मा बोलिजे ।। ८–७–५० ।।

२४) मठाबाहेरील आकाश । तया नांव महदाकाश ।
ब्रह्मांडाबाहेरील ब्रह्मांश । त्यास परमात्मा बोलिजे ।। ८–७–५१ ।।

२५) उपाधीवेगळें आकाश । तया नांव चिदाकाश ।
तैसा निर्मळात्मा परेश । तो उपाधीवेगळा ।। ८–७–५२ ।।

२६) आकाश अनुभवा येतें । स्वरूप अनुभवापरतें ।
म्हणोनिया आकाशातें । साम्यता न घडे ।। ८–५–६८ ।।

२७) वेगळेपणें पाहावें । तयास आकाश म्हणावें ।
अभिन्न होतां स्वभावें । आकाश ब्रह्म ।। ९–९–१७ ।।

२८) भिन्नपणें अनुभविलें । तयास शून्य ऐसें बोलिलें ।
वस्तु लक्षितां अभिन्न जालें । पाहिजे आधीं ।। ८–१०–७२ ।।

२९) वेगळेपणें पाहाणें घडे । तेणें वृत्ति शून्यत्वीं पडे ।
पोटीं संदेह पवाडे । शून्यत्वाचा ।। ८–१०–७१ ।।

३०) आकाश वेगळेपणें पाहावें । स्वरूपीं स्वरूपचि व्हावें ।
वस्तूचें पाहाणें स्वभावें । ऐसें असे ।। ८–५–६६ ।।

३१) वस्तु आपणचि होणें । ऐसें वस्तूचें पाहाणें ।
निश्चयेसीं भिन्नपणें । शून्यत्व लाभे ।। ८–१०–७३ ।।

३२) आहाच पाहतां कल्पनेसी । सारिखेंच वाटे निश्चयेंसी ।
परी आकाश स्वरूपासी । भेद आहे ।। ८–५–६२ ।।

३३) तैसें आकाश आणि स्वरूप । पाहातां वाटती येकरूप ।
परी दोहींमध्यें विक्षेप । शून्यत्वाचा ।। ८–५–६१ ।।

३४) इकडे दृश्य तिकडे देव । मध्यें शून्यत्वाचा ठाव ।
तयास प्राणी मंदबुध्दीस्तव । ब्रह्म म्हणे ।। ८–१०–६६ ।।

३५) उपाधीमध्यें सापडलें । सूक्ष्म पाहातां भासलें ।
इतुक्यासाठीं आकाश जालें । भूतरूप ।। ९–६–३६ ।।

३६) आधीं दृश्य सोडिलें । मग शून्यत्व वोलांडिलें ।
मूळमायेपरतें देखिलें । परब्रह्म ।। ८–१०–७० ।।

३७) उपाधीविण जें आकाश । तें ब्रह्म निराभास ।
ते निरामासीं मूळमायेस । जन्म जाला ।।१०–३–१ ।।

३८) आकाश अवकाश तो भकास । परब्रह्म तें निराभास ।
उपाधी नस्तां जे आकाश । तेंचि ब्रह्म ।। ९–६–३७ ।।

३९) निर्विकल्पासी कल्पितां । कल्पनेची नुरे वार्ता ।
नि:संगास भेटों जातां । नि:संगचि होइजे ।। ७–३–५१ ।।

४०) असोन माईक उपाधी । तेचि सहजसमाधी ।
श्रवणें वळावी बुध्दी । निश्चयाची ।। ११–१–४४ ।।





४१) वस्तु जे कां निरोपाधी । तेचि सहजसमाधी ।
जेणें तुटे आधीव्याधी । भवदु:खाची ।। ७–३–४५ ।।

४२) पहिलें तें शब्दब्रह्म । दुजें मितिकाक्षरब्रह्म ।
तिसरें खंब्रह्म । बोलिली श्रुती ।। ७–३–६ ।।

४३) चौथें जाण सर्वब्रह्म । पांचवें चैतन्यब्रह्म ।
साहावें सत्ताब्रह्म । साक्षब्रह्म सातवें ।।७–३–७ ।।

४४) आठवें सगुणब्रह्म । नववें निर्गुणब्रह्म ।
दहावें वाच्यब्रह्म । जाणावें पैं ।। ७–३–८ ।।

४५) अनुभव तें आक्रावें । आनंदब्रह्म तें बारावें ।
तदाकार तेरावें । चौदावें अनिर्वाच्य ।। ७–३–९ ।।

**– भावार्थ –**

१) ब्रह्मदेव, विष्णु, शंकर हे तीन देव ज्याने निर्माण केले, त्या थोरल्या देवास – परब्रह्मास हरप्रयत्नाने ओळखले पाहिजे.

२) तो देवांचा देव जोवर प्राप्त होत नाही, तोपर्यंत यमयातना चुकत नाहीत. आपल्या ब्रह्मांडाचा ब्रह्मांडनायक आपणास माहीत नाही, हे बरे आहे का ?

३) चळणे किंवा ढळणे म्हणजे बदल होणे हा दृश्याचा धर्म ज्या ठिकाणी आढळत नाही ते, जे तुटत नाही किंवा फुटत नाही अर्थात जे अखंड आहे ज्याचे खंड होत नाहीत असे ते, जे निर्मिले जात नाही, अर्थात त्याचा नाशही होत नाही ते, परब्रह्म आहे.

४) जे इंद्रियांना जाणवत नाही व मनाला भासतही नाही, जे जन्माला येत नाही अर्थात ज्याला मरणही नाही, ज्या ठिकाणी येण्याजाण्याची क्रिया (श्वसन) असत नाही, ते परब्रह्म.

५) भूतांतरी असणारा ब्रह्मांश – गगन हे निराकार असल्याने – उपाधीरहित असल्याने, त्याठिकाणी कोणताही विकार उत्पन्न होत नाही – ते निर्विकार असते.

६) अरे, जे जे काही आकाराला येते, ते ते सगळे नाश पावते. आकाराच्या मागे लपलेले निराकार जे आहे ते किंवा नामरूपात्मक उपाधी ज्याला नाही असे ते, परब्रह्म जाणावे.

७) जे जे काही कल्पनेने आकारलेले आहे, ते ते सारे अंत:करणातील कल्पना नाहिशी झाली की नाश पावणारेच आहे. स्वरूप मात्र सदासर्वकाळ जसेच्या तसे असते. नित्य नवे असते.

८) जे जे डोळ्याला दिसते, ते ते सारे नाश पावते असे श्रुतीवचन आहे. म्हणून डोळ्याला दिसणारे ते अविनाशी स्वरूप नव्हे, हे निश्चित.

९-१०) दृष्टीला दिसणारे दृश्य, मनास भासणारा भास, हे सारे कालांतरी नाश पावणारे आहे. म्हणून अविनाशी असणारे परब्रह्म दृश्यभासातीत असते.

११) परब्रह्म हे निश्चळ असून भ्रामक दृश्यरूपाने ते दृग्गोचर होत नाही. विमलब्रह्म हे जसेच्या तसे भ्रमरहित असते.

१२) अस्थीच्या देहात असलेल्या मांसाच्या डोळ्यांनी, दृश्यभासातीत अविनाशी परब्रह्म पाहीन असे समजणारा डोळस, ज्ञानी नसून अज्ञानी, आंधळा, मूर्ख आहे.

१३) पिंडातील चार व ब्रह्मांडातील चार असे आठ देह हे कशाचे बनलेले आहेत, त्यांची ठिकाणे कोठे आहेत, हे जाणून त्याचे निरसन झाल्यावर, पुढे विमळ असे निरंजन परब्रह्मच उरते.

१४) देहाशी तादात्म्य असेल तर देहदु:ख सोसावे लागेल, तर देहभाव - 'मी देह' हा भाव जर लयाला गेला तर परब्रह्माची प्राप्ती होईल.

१५) आधी आपल्या देहातील आत्मरूप अनुभवावे. मग आपल्याआत असणारे चैतन्य - वासुदेव-विश्वंभर विश्वात कसे भरून राहिले आहे, हे अनुभवावे. मग ही एकपणाची जाणीव नाहिशी झाली असता, अद्वैताचा बोध ओलांडला असता, तो जाणीवनेणीव रहित परब्रह्मच होऊन जातो.

१६) परब्रह्म हे सर्वापलिकडचे सर्वाहून भिन्न आहे. सद्गुरुंची कृपा झाली





असता, परब्रह्माचे अनुभवाने परब्रह्माशी अनन्य होऊन परब्रह्मस्वरूप होणे हे वस्तुचे पाहणे घडून, आपणच परब्रह्मवस्तुरूप आहोत हे कळते.

१७) सद्रूप, चिद्रूप, तद्रूप आणि स्वस्वरूप म्हणजे आपले रूप होय. आपले रूप म्हणजे देहाचे रूप नव्हे, तर देहाचा निरास झाल्यावर (तत्व निरसनानंतर उरलेले) जे अरूप, निराकार, निर्विकल्प परब्रह्मस्वरूप राहते ते आपले रूप.

१८) या भिन्न विश्वामध्ये शाश्वत असे एकच ब्रह्म व्यापून राहिले आहे असा विवेक-विचार, शास्त्रात सांगितला आहे.

१९) अनंत ब्रह्मांडे ही ब्रह्माच्या उदरामध्ये आहेत. तर ब्रह्म हे अनंत ब्रह्मांडात भरून राहिले आहे. नीट ज्ञानदृष्टीने पाहिले असता, ब्रह्मांड व ब्रह्म एकमेकामध्ये आहेत, असे प्रत्यक्ष आढळते.

२०) आकाशाच्या पलिकडे जावे म्हणून कोणी धावू लागला तर कितीही धावले तरी आकाश तेवढेच पुढे असते, त्याप्रमाणे अनंत ब्रह्माला अंत नाही.

२१) पंचमहाभूतातले आकाश हे वेगळे. पंचमहाभूतातले आकाश हे ब्रह्म नव्हे. ते वेगळेपणाने अनुभवता येते. सर्व भूतमात्रांचे हृदयस्थानी असणारे उपाधीरहित आकाश - ब्रह्मांश, त्याला गगन ही संज्ञा आहे.

२२) घटामध्ये व्यापून असलेल्या आकाशाला घटाकाश म्हणतात, त्याप्रमाणे पिंडात व्यापून असणाऱ्या ब्रह्माच्या अंशाला जीवात्मा म्हणतात.

२३) मठामध्ये व्यापून असलेल्या आकाशाला मठाकाश म्हणतात, त्याप्रमाणे ब्रह्मांडामध्ये व्यापून असलेल्या ब्रह्माच्या अंशाला शिवात्मा म्हणतात.

२४) मठाबाहेरील आकाशाला महदाकाश म्हणतात, त्याचप्रमाणे ब्रह्मांडाबाहेरील ब्रह्मांशाला परमात्मा म्हणतात.

२५) ज्या आकाशाला वेगळेपणाने जाणता येत नाही, त्या आकाशाला चिदाकाश म्हणतात, त्याचप्रमाणे जो सर्व उपाधीहून वेगळा आहे, अशा निरुपाधिक श्रेष्ठ अशा निर्मळात्म्याला परेश म्हणतात.

२६) आकाशाचा वेगळेपणाने अनुभव घेता येतो व स्वरूप हे वेगळेपणाने अनुभवता येत नाही. म्हणून आकाश वेगळे व ब्रह्म वेगळे.

२७) जे वेगळेपणाने अनुभवता येते, त्याला आकाश म्हणतात. आकाशाशी तादात्म्य झाले असता, आकाशरूप झाले असता – वेगळेपणा संपला असता, आकाश हेच ब्रह्म आहे.

२८–२९) वेगळेपणाने येणारा अनुभव हा आकाशाचा – शून्याचा असतो. वस्तुचा अनुभव हा वेगळेपणाने घेता येत नाही. 'डोळ्याला दिसणारे अथवा मनास भासणारे ब्रह्म नव्हे' या वचनाप्रमाणे या अनुभवाबद्‌दल – शून्यत्वाबद्‌दल संशय निर्माण होतो. म्हणून वस्तूला पाहताक्षणी आपण वस्तुरूपच व्हायला हवे.

३०–३१) आपण परब्रह्मवस्तुरूप होणे–आपण स्वरूपाकार होणे, हेच स्वरूपदर्शन–वस्तुदर्शन होय. महाकारणदेहात वेगळेपणाने येणारा अनुभव हा आकाशाचा – शून्याचा असतो.

३२–३३) वरवर पाहता आकाश व ब्रह्म यात भेद नाही, अशी निश्चितपणे कल्पना होते. पण आकाश व ब्रह्म यात भेद आहे. महाकारणदेहातील आकाश हे वेगळेपणाने अनुभवता येते, म्हणून त्याला शून्य असेही म्हणतात. वेगळेपणाने पाहता येणे हीच त्याची उपाधी आहे. म्हणून हे आकाश पंचमहाभूतांतले गणले गेले आहे. तर ब्रह्म हे वेगळेपणाने अनुभवता येत नाही. ब्रह्म हे आकाशरूपच आहे. पण ते उपाधीरहित आकाश – चिदाकाश आहे. वेगळेपणाने अनुभवणे ही उपाधी तेथे नाही.

३४) महाकारण देहात जे वेगळेपणाने आत्म्याचे दृश्य अनुभव येतात – शून्यत्व अनुभवास येते – त्यालाच प्राणी अज्ञानाने ब्रह्म समजतात. दृश्य, द्रष्टा, दर्शन ही त्रिपुटी लय पावल्यावर परब्रह्म अनुभवता येते.

३५) उपाधीमध्ये सापडल्याने आकाश हे सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास वेगळेपणाने अनुभवता येते. किंबहुना वेगळेपणाने अनुभवता येते याचा अर्थच ते





आकाश उपाधीभूत आहे. म्हणून या आकाशाची पंचमहाभूतामध्येच गणना केली आहे.

३६) दृश्य नाहिसे होऊन द्रष्टा जेव्हा द्रष्ट्यालाच भेटतो, तेव्हा द्रष्टा एकमेव रहात असल्याने द्रष्टेपण नाहिसे होते – वेगळेपणाने अनुभवणे थांबते. शून्यत्व नाहिसे होते, एकपणाची जाणीव नाहिशी होते व ज्ञानाचे विज्ञान होऊन, मनाचे उन्मन होऊन, आत्म्याचा चंचळपणा नाहिसा होऊन, मूळमायेच्या पलिकडे परब्रह्माचे पाहणे घडते – निश्चळ परब्रह्मच तो होतो.

३७) ज्या आकाशाचा वेगळेपणाने अनुभव घेता येत नाही, असे उपाधीरहित आकाश म्हणजेच ते निराभास ब्रह्म होय. या निरुपाधिक आकाशामध्येच – गगनामध्येच मूळमायेचा जन्म झाला.

३८) आकाश – अवकाश हे शून्यरूप, भकास आहे. शून्य नाहीपणाने भासते, अनुभवता येते. हे शून्य जे अनुभवते ते निराभास, वेगळेपणाने न अनुभवता येणारे, असणेपणाने सतत असणारे, उपाधीरहित आकाश म्हणजे ब्रह्म.

३९) अंत:करणात कोणतीही कल्पना न उरणे हीच निर्विकल्पाची कल्पना, तर आपण नि:संग होणे हीच नि:संगाची भेट.

४०) नादश्रवणाचे ठिकाणी बुध्दी निश्चयाने निश्चळ झाल्याने मायीक उपाधी असूनही स्वरूपाचे ठिकाणी असणारे तादात्म्य न ढळणे, हीच सहजसमाधी होय.

४१) कल्पनेची उपाधी संपूर्णपणे नाहिशी होऊन निरूपाधिक वस्तुरूप होणे म्हणजेच सहजसमाधी. यायोगे संसारातील दु:ख देणाऱ्या आधीव्याधी नाहिशा होतात.

४२ ते ४५) चौदा ब्रह्मांची नांवे : १) शब्द २) अक्षर ३) खं ४) सर्व ५) चैतन्य ६) सत्ता ७) साक्षी ८) सगुण ९) निर्गुण १०) वाच्य ११) अनुभव १२) आनंद १३) तदाकार १४) अनिर्वाच्य.

卐 卐 卐

## ॥ श्रीदासबोधाची आरती ॥

रामकृपावचने तो हा दासबोध।
बध्दालागी जाला भक्तिमार्ग सुबोध।
निंबर्गी संप्रदायी हाची निजबोध।
पठणी प्रगटे मूर्त हनुमंत सिध्द॥१॥
जयदेव जयदेव जय ग्रंथराया।
आरती करिता चित्त पालटे काया॥ध्रु॥
ग्रंथपारायणी नुरे संशयपाप।
आचारविचारक्रिया दावी स्वरूप।
ऐसा दासबोध ग्रंथ हा अनूप।
रामप्रभूच्या अनिला पठणी हुरूप॥२॥

– अनिलप्रभू





## ॥ श्रीसमर्थांची आरती ॥

आरती रामदासा। परात्पर सर्वेशा।
रामदास्य करूनिया। दिली सकळासी दीक्षा॥१॥
ब्रह्मचारी राहोनिया। पुरश्चरणी रंगला।
महाराष्ट्र जागा करूनी। कर्तव्यासी युक्त केला॥२॥
मातेची इच्छा पूर्ण। करण्या आलासे आपण।
नाम धरूनी हनुमान। दासराम आला शरण॥

– श्रीदासराम महाराज

## ॥ श्रीदासराममहाराजांची आरती ॥

आरती रामराया। करी कृपेची छाया।
दावोनी दीनी दया। धन्य धन्य महाराया॥ध्रु॥
सद्‌गुरु हनुमंत। पिता गोविंद संत।
बोधी गुरुलिंग सिध्द। धरूनि रूप सिध्दानंद॥१॥
सिध्द साधनाने। स्वये ब्रह्मची झाले।
भावादरे केशवाने। चरणी मस्तक ठेविले॥२॥

– के. वा. आपटे

## श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| चिमड संप्रदाय | १ | २००५ |
| श्रीरामदासस्वामी चरित्र | २ | २००६ |
| भजन तरंग | ३ | २००६ |
| हरिपाठ संकीर्तन | ४ | २००७ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | ५ | २००७ |
| दासबोधातील तत्वज्ञान | ६ | २००७ |
| श्रीदासराममहाराजांचा वचनसंग्रह | ७ | २००८ |
| श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | ८ | २००९ |
| साधन संध्या | ९ | २००९ |
| अनंत अमृत स्मरण | १० | २००९ |
| श्रीगुरु महिमा | ११ | २००९ |
| श्रीज्ञानेश्वरी प्रसाद | १२ | २००९ |
| श्रीदासराम गाथा : पुरवणी | १३ | २००९ |
| श्रीदासराममहाराज : आत्मचरित्र | १४ | २०१० |
| श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र | १५ | २०१० |
| श्रीदासराममहाराज : श्लोकरचना | १६ | २०१० |
| ज्ञानदेवकृत अनुभवामृत (ओवी टीकेसहित) | १७ | २०१० |
| श्रीदासराममहाराज सहस्त्रनामस्तोत्रम् | १८ | २०१० |





## श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | १९ | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २० | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २१ | २०१० |
| श्रीरामनिकेतन | २२ | २०११ |
| श्रीरामनिकेतनमधील आराधना | २३ | २०११ |
| ग्रंथत्रयी | २४ | २०११ |
| उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | २५ | २०११ |
| अभंग दरबार | २६ | २०११ |
| सद्बोध दशक (श्रीदासरामरक्षास्तोत्रासह) | २७ | २०११ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र (आवृत्ति ३ री) | २८ | २०११ |
| श्रीगुरुराज कथित ज्ञान आणि बोध | २९ | २०११ |
| प.पू.श्रीमाईसाहेब यरगट्टीकर यांचे चरित्र | ३० | २०११ |
| पाठांतरसुलभ भगवद्गीता (आवृत्ति २ री) | ३१ | २०११ |
| श्रीदासराममहाराज लिखित लघुचरित्रे | ३२ | २०११ |
| श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस कृत मनोबोध व निवडक अभंग (विवरणासह) | ३३ | २०११ |
| प.पू.सद्गुरु श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर ऊर्फ श्रीचिमडमहाराज | ३४ | २०११ |
| महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का | ३५ | २०११ |